# हिंदुबोध

॥ इदं शास्त्रं, इदं शस्त्रम् ॥


विश्व हिन्दू परिषद

धर्मो रक्षति रक्षितः

संपादक : रविकांत कळंबकर

■ शके १९४६ ■ वर्ष २४ ■ अंक १० ■ जानेवारी २०२५ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/– ■ पृष्ठ संख्या ४४

■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 24 ■ ISSUE NO 10 ■ January 2025 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 44




## मकर संक्रांती १४ जानेवारी २०२५ ते महाशिवरात्री २५ फेब्रुवारी २०२५

अंक www.vhp.org वर उपलब्ध

E-mail : hindubodh.pmp@gmail.com




प्रत्येकाचे
गृहस्वप्न
आता होईल
साकार!

घर घेणं झालं आता
एकदमच सोप्पं!

जनता
गृहकर्ज
योजना

आकर्षक व्याजदर

₹1.40 कोटींपर्यंत अर्थसहाय्य

*अटी व नियम लागू

रु. 35 लाख रुपयांपर्यंत 8.45 %

रु. 35 लाख पेक्षा जास्त रु. 140 लाख पर्यंत कर्ज 8.75 %

* सिबिल CIBIL स्कोअर 700 पेक्षा जास्त असल्यास 0.15% अतिरिक्त सवलत

जनता सहकारी बँक लि., पुणे
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक

टोल फ्री क्रमांक :
1800 233 3258
www.janatabankpune.com

मासिक
**हिंदुबोध**
वर्ष – चोविसावे : अंक १० वा
शके १९४६
जानेवारी २०२५

संपादक
श्री. रविकांत कळंबकर
९८२२२६१६६२
ravi.kalambkar@gmail.com

निवास
एबीसी जंक्शन, ए बिल्डींग, फ्लॅट नं. ६,
आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ,
निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४

अंक www.vhp.org संकेतस्थळावर उपलब्ध

संपादक मंडळ
श्री. किशोर चव्हाण – प्रांत मंत्री
श्री. ॲड. सतिश गोरडे – प्रांत सहमंत्री
श्री. कृष्णकांत चांडक – प्रांत कोषाध्यक्ष
श्री. श्रीपाद रामदासी – प्रांत प्रचार-प्रसार प्रमुख
श्री. अनिल सांबरे – नागपूर
श्री. विजयकुमार पिसे – सोलापूर

संपादक मंडळ सदस्य
श्री. नितीन वाटकर
प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी

पत्र व्यवहार
व्यवस्थापक
मनिषा राठोड
मोः ९०४९३९६३६३

अंकमूल्य रु. २०/-, वार्षिक वर्गणी रु. २००/-

मुद्रण स्थळ
संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५, शनिवार पेठ, पुणे – ३०.
दूरभाष : २४४८ ५६ ३२
sanwadpvt@gmail.com

## अनुक्रमणिका

✦ संपादकीय.... प्रयागराज – महाकुंभ २०२५
रविकांत कळंबकर ................................ ०५

✦ वि. हिं. परिषद प्रांत वृत्त ................................ ०६

✦ श्री क्षेत्र प्रयागराज महाकुंभमेळा
माधवदास महाराज राठी ........................ २१

✦ मकरसंक्रांत-खगोलीय महत्त्व सांगणारा एक हिंदू सण
ॲड. स्वाती जेरे ................................ २४

✦ महाराष्ट्र निवडणुक
पंकज जयस्वाल ................................ २६

✦ आता फक्त जनसेवा
रमेश पतंगे ................................ २८

✦ भारतीय संस्कृती व १६ संस्कार
यशवंत लिमये ................................ ३०

✦ फाळणीची घोषणा व सत्तेची समीकरणे
डॉ. गिरीश आफळे ................................ ३१

✦ चौथी मिती – लेखांक १०
हणमंत नाडगौडा ................................ ३५

✦ वाचनशिल्प
सतीश निरंतर ................................ ३७

✦ कृष्णायन भाग १७ – श्रीकृष्ण – सुदामा भेट
उल्का खळदकर ................................ ३८

✦ स्मरण क्रांतिवीरांचे
राजन वडके ................................ ४०

प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
'हिंदुबोध' मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विवेक सोनक यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी – ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : रविकांत कळंबकर (पीआरबी ॲक्टनुसार संपादकीय जबाबदारी)

**"Hindu Bodh" Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vivek Sonak, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Ravikant Kalambkar**

हिंदुबोध संबंधीचे सर्व कायदेशीर खटले अंक प्रकाशनाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत केवळ पुण्याच्या न्यायालयातच चालतील.

**संस्कृती सबकी एक चिरंतन खून रगों मे हिंदु हैं**
**विराट सागर समाज अपना हम सब इसके बिंदू हैं ।।धृ।।**

राम कृष्ण गौतम की धरती, महावीर का ज्ञान यहां
वाणी खंडन मंडन करती, शंकर चारों धाम यहां
जिसने दर्शन राहें उतनी, चिंतन का चैतन्य भरा
पंथ खालसा गुरू पुत्रों की बलिदानी यह पुण्य धरा
अक्षय वट अगणित शखाऐं, जड में जीवन हिंदु हैं ।।१।।

कोटी हृदय हैं भाव एक हैं, इसी भूमि पर जन्म लिए
मातृभूमि यह कर्मभूमि यह, पुण्यभूमि हित मरे जिये
हारे – जीते संघर्षों में, साथ लढे बलिदान हुए
कालचक्र की मजबूरी में रिश्ते नाते बिखार गये
एक बडा परिवार हमारा, पुरखे सब के हिंदु हैं ।।२।।

सबकी रक्षा धर्म करेगा, उसकी रक्षा आज करें
वर्ण–भेद मत–भेद मिटा कर नव रचना निर्माण करें
धर्म हमारा जग में अभिनव, अक्षय है अविनाशी हैं
इसी कडी से जुडे हुए, युग युग से भारतवासी हैं
थाय अथाह जहां की महिमा, गहरा जैसे सिंधु हैं ।।३।।

हरिजन गिरिजनवासी बन के, नगर ग्राम सब साध चलें
उंच नीच का भाव घटा कर, समता के सद्भाव बढें
ऊपर दिखते भेद भले हों, जैसे वनमें में फूल खिले
रंग बिरंगी मुस्कानों से, जीवन रस पर एक मिले
संजीवनी रस अमृत पीकर, मृत्युंजय हम हिंदु है ।।४।।

# आवाहन...

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे प्रांत स्तरावर निघणारे एकमेव मासिक म्हणजे **''हिंदुबोध.''** कोरोनाचे पहिल्या लाटेनंतर म्हणजे फेब्रु. २०२१ पासून नवीन स्वरूपात निघणे सुरू झाले आहे. हा अंक ४४ पानांचा असून याचे मासिक मूल्य रु. २०/– फक्त आहे. वार्षिक रु. २००/– तर त्रैवार्षिक रु. ५००/– वर्गणी आहे. पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.

देव, देश अन् धर्मासाठी कार्यरत असलेल्या या कार्यासाठी आपण **हिंदुबोध** मासिकाचे नियमित वाचक व्हावे, ही विनंती. वर्गणी खात्यात भरून नोंद (नांव, पत्ता, पिनकोड क्र., संपर्क क्र.) कार्यालयाकडे कळवावी. आपल्याला दरमहा **''हिंदुबोध.''** ' दि. १ ते ५ काळात पोस्टाने मिळेल.

तसेच आपण नवीन वर्गणीदार वाचक व अंकासाठी जाहिरात मिळवून देण्यात योगदान द्यावे. ही नम्र विनंती. योग्य ते मानधन देण्यात येईल. कळावे, धन्यवाद!

| **श्री. रविकांत कळंबकर** | **श्री. किशोर चव्हाण** | **श्री. पांडुरंग राऊत** |
|---|---|---|
| (संपादक) | (प्रांत मंत्री) | (प्रांत अध्यक्ष) |

# प्रयागराज - महाकुंभ २०२५

## संपादकीय

प्रयागराज येथे जाने. १३ ते २६ फेब्रु. २०२५ या कालावधीत 'महाकुंभ' संपन्न होणार आहे. प्रयाग या शब्दाचा अर्थ नद्यांचा संगम. गंगा, यमुना आणि सुप्त स्वरुपात सरस्वती अश्या महान नद्यांचा संगम या ठिकाणी आहे. पौराणिक कथेनुसार भगवान विष्णू अमृताचा कुंभ (पात्र) घेवून जात असताना त्यातील एक एक थेंब काही ठिकाणी पडले गेले ती स्थाने पवित्र झाली. यातील चार थेंब चार संगम स्थानी पडले म्हणून ती तीर्थक्षेत्रे झाली. प्रयाग, हरिद्वार, नाशिक व उज्जैन या ठिकाणी क्रमाक्रमाने महाकुंभाचे आयोजन केले जाते. प्रयागांचा राजा व महान नद्यांचा संगम असल्याने 'प्रयाग राज' तीर्थांचा राजा म्हणून 'तीर्थराज.' दर बारा वर्षांनी हा भरत असल्याने त्याचा महाकुंभ उल्लेख केला जातो. जाणकारांच्या म्हणण्यानुसार १२ तपानंतर म्हणजेच १४४ वर्षांनी हा योग येत आहे.

या सुमारे दिड महिन्याचे कालावधीत सहा प्रमुख स्नानांचे महत्त्व जास्त असते. त्यातील अमावस्येला मौनी म्हणतात आणि या दिवसाचे महत्त्व तर फारच मानले जाते. गंगेत डुबकी मारुन पवित्र भाव जागृत करण्यासाठी प्रचंड मोठा जनसागर प्रयागराज तीर्थापाशी लोटलेला असतो. सुरुवातीचे दोन दिवस पौर्णिमा व संक्रात दि. १३ व १४ प्रारंभीचे स्नान असणार आहे. २९ जाने. मौनी अमावस्या, ३ फेब्रु. वसंत पंचमी, १२ फेब्रु. माघ पौर्णिमा व महाशिवरात्री २६ फेब्रु. हे सहा दिवस महत्त्वाचे (शाहीस्नानाचे) असणार आहेत. या शाही स्नानाचे दिवसातील योग्य वेळ ज्योतिषांकडून जाहीर केली जाते, मग सर्वप्रथम नागा साधू किंवा त्यांचा समूह डुबकी मारण्यासाठी गंगेच्या पाण्यात उतरतो. धार्मिक तपस्वी, साधू, महंत मोठ्या संख्येने यानंतर तिथे हजेरी लावतात. विविध आखाड्यांशी संबंधित पुरुष स्नानघाटापर्यंत शाही मिरवणुकीने जातात, फुलांनी सजवलेले रथ, भव्य पालखी सोहळा, मंत्रोच्चार व संगीतमय असा खरोखरीच मंत्रमुग्ध करणारा उत्साहाने भरलेला असतो. हर हर गंगे असा गजर करत त्यावेळी हे साधू गंगेत उतरतात, तो क्षण अध्यात्म, भक्ती व आत्म सामर्थ्याची साक्ष देणाराच असतो.

साधारणपणे दरवर्षी प्रयाग राजला भेट देणाऱ्यांची संख्या ही पाच कोटींपर्यंत असते. यावर्षी तर पहिल्या सहा महिन्यातच साडेचार कोटी भेट देऊन गेले आहेत. या नगरीचे ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक वैभव अनुभवण्यासाठी परदेशी नागरिक गेल्या सहा महिन्यात चार हजारच्यावर येवून गेले आहेत. २२ जाने. २०२४ अयोध्येतील रामललांच्या स्थापनेनंतर प्रयागराजला भेट देणाऱ्यांची संख्या वाढत आहे. या वाढत्या पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थाही सुधारली आहे. व्यवसाय वाढल्यामुळे कमाईतही वाढ झाल्याने यजमान नगरी आदरातिथ्यही मनापासून करत आहे. आता हा केवळ धार्मिक उत्सव राहिला नसून पर्यटन, सांस्कृतिक, वैज्ञानिक संशोधन, शैक्षणिक माध्यमातून परदेशी पत्रकारांची उपस्थिती ही मोठी रहाणार आहे.

या महाकुंभासाठी सुमारे ४० कोटींचे वर संख्या येण्याचा मानस आहे. स्वाभाविकच स्वच्छतेचेही नियोजन हे मोठे आव्हान आहे. या साठीचे नियोजन शासन व प्रशासन गेली दोन वर्षापासून करत आहे. हजारो टन जमा होणारा रोजचा कचरा जमा करून त्याची विल्हेवाट लावणे ठरवले गेले आहे. कचरा कमी व्हावा म्हणून रोजच्या जेवणासाठी पर्यटकांना थाळी (पत्रावळी ऐवजी) देणार असून प्लॅस्टीकच्या वापरावर बंदी ठेवली आहे. अद्ययावत मोठे हॉस्पिटल, हजारो डॉक्टर्स, वैद्यकीय सेवेसाठी सज्ज आहेत. सुरक्षा व्यवस्थाही चोख रहाणार असून ड्रोनचे माध्यमातून अखंड देखरेख केली जाणार आहे.

भारतातील हा महाकुंभ मेळा जगातील 'मानवी मेळावा' म्हणून प्रसिद्ध आहे. जन्म मृत्यूच्या चक्रातून मुक्ती मिळण्यासाठी आध्यात्मिक व दैवी मार्गातून मोक्षाकडे जाण्याचा हा एक मार्ग असल्याची श्रद्धाळूंची भावना आहे. सामान्यांना मात्र येथे आत्मशुद्धी करण्याची निश्चितच प्रचिती येते. मानवतेच्या वैचारिक गोंधळात असलेल्यांना हा महाकुंभ अनुभूती दाखवणारा असणार आहे. मानवतेचा हा महाकुंभ प्रत्येकाने आपापल्या वैचारिक स्तरानुसार जरुर अनुभवावा.

**रविकांत कळंबकर, हिंदुबोध संपादक**







# समर्थ भारत होण्यासाठी साधु-संतांचे संपूर्ण सहकार्य!

विहिंपच्या केंद्रीय मार्गदर्शक मंडळ बैठकीत ग्वाही! समर्थ भारत बनण्यासाठी विहिंपने आखलेल्या कुटुंब प्रबोधन, धर्मांतर रोखणे व सामाजिक समरसता या संदर्भातील धोरणाला विविध संप्रदायांतील सर्व साधुसंत, संपूर्णपणे पाठिंबा देतील व विविध उपक्रमात पूर्णतः सहभागी होतील! अशी ग्वाही विहित गाव – देवळालीतील कलापूर्णम तीर्थधाम मध्ये झालेल्या मुंबई क्षेत्राच्या केंद्रीय मार्गदर्शक मंडळाच्या बैठकीत मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या विविध साधुसंतांनी एकमुखाने दिली.

३० नोव्हेंबर व १ डिसेंबर रोजी ही बैठक पार पडली. पहिल्या दिवशी जगद्गुरू रामानंदाचार्य यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत केंद्रीय महामंत्री मिलिंदजी परांडे यांनी कुटुंब प्रबोधन, धर्मांतर रोखणे आणि सामाजिक समरसता ही हिंदू समाजापुढील प्रमुख आव्हाने आहेत, असे सांगून याबाबत संतांनी सक्रिय होण्याची गरज मांडली. शहर जितके मोठे तितकी कुटुंब समस्या बिकट. वैवाहिक व्यवस्था धर्माच्या आधाराने उभी आहे. ही पवित्र परंपरा खंडित झाली तर संकट ओढवेल. त्यापासून वाचण्यासाठी जागृती आवश्यक आहे. भोगवाद वाढला असून, संस्कार कमजोर ठरत आहेत. सात फेरे घेणारे विवाह सात वर्षे देखील टिकत नाही. ड्रग, दारूचे व्यसन स्त्रियांना त्रास देणे, कन्या भ्रूण हत्या सामाजिक कुरीतींना प्रतिष्ठा देऊन आचरण केले जाते, याला संतांनी आळा घालावा. जन्मदर घटत आहे. रिप्लेस रेट इतका आहे. कुटुंबात किमान दोन तरी मुले हवीत तरच समुदायाचे रक्षण होईल. असे परांडे यांनी स्पष्ट केले. सामाजिक समरसता निर्माण करण्यासाठी संतांनी प्रयत्न करावे हे सांगताना श्री. परांडे यांनी अनेक शक्ती हिंदूंना पुढे येऊ देत नाहीत. जाती, प्रांत, भाषा यांचे निमित्त करून एकमेकांत वाद निर्माण करुन लढाई लावली जाते. अस्पृश्यता निर्मूलनाची गरज आहे. अस्पृश्यता ही एक सामाजिक कूरीत आहे त्याविरोधात सर्वांना एकत्रित येण्याची गरज आहे धर्म–भेदभाव शिकवत नाही हे जनतेच्या मनावर ठसविण्याची गरज आहे. असे त्यांनी स्पष्ट केले. हिंदू धर्मातून इतर धर्मात होणारे धर्मांतर रोखण्यासाठी साधू संत वृदाने प्रयत्न करावेत. १९४७ मध्ये वीस लाख हिंदूंची हत्या झाली. लाखो महिलांवर अत्याचार झाले. नागालँड, मिझोराम, मेघालय यासाठी राज्य ख्रिश्चन बहुल झाली आहेत. केरळमधील हिंदूंचे प्रमाण खूपच घटले आहे. धर्मांतर, लव्ह जिहाद, अपहरण, घटता जन्मदर यामुळे हिंदू असंतुलित होत आहे. आपल्या धर्मांतून अन्य धर्मांत गेलेल्याना परत आणणे, परत येणाऱ्यांना सर्वांसारखी समान वागणूक देणे, महिला व मुलींना मार्गदर्शन करणे अशा सर्व बाबींवर संतांनी लक्ष द्यावे. संतांचे कार्य प्रभावित होऊ शकते. गावागावांत, घराघरात जाऊन संतांनी आजच्या भाषेत समजावून सांगणे आवश्यक आहे. असे विचार परांडे यांनी मांडले. या दिवशीच्या बैठकीत कुटुंब प्रबोधन या विषयावर विविध संतांनी परखडपणे आपले विचार मांडले. त्यामध्ये जनार्दन हरीजी महाराज, अंधेरीचे शिवानंदजी भारती महाराज, दिगंबर आखाड्याचे भक्तीचरण दासजी महाराज, स्वामीनारायण संप्रदायाचे धर्मप्रकाशजी शास्त्री, नीलकंठ शिवाचार्यजी, वारकरी संप्रदायाचे ह.भ.प. रामकृष्ण महाराज लहवितकर, महानुभाव संप्रदायाचे विजयराज महाराज, समर्थ संप्रदायाचे मंदारबुवा रामदासी, बौद्ध समाजाचे धर्मरत्न महाथेरो, जैन साधू निलेश मुनीजी महाराज आदींनी आपापले मनोगत व्यक्त केले. कौटुंबिक प्रबोधनासाठी संत समाज सर्वतोपरी सहकार्य करील असे त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात जगद्गुरू राजराजेश्वरजी महाराज यांना प्रभू श्रीरामचंद्रांच्या कुटुंबाचे उदाहरण देत कुटुंबातील प्रेम कसे असावे, हे प्रभू रामचंद्र, लक्ष्मण, भरत, दशरथ यांच्या वर्तनातून दिसून येते. आपल्या देशातील विविध संप्रदायांमध्ये परिवाराचे महत्त्व सांगण्यात आले आहे. वसुधैव कुटुम्बकम हा आपल्या संस्कृतीचा संदेश असून ऋषी परंपरेचे अनुसरण केले तर संस्कृती व कुटुंबाचे जतन होईल असे सांगून संतांच्या सर्वतोपरी सहकार्याची ग्वाही दिली.

दुसऱ्या दिवशी केंद्रीय मार्गदर्शक मंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान संकेश्वर करवीर पीठाचे शंकराचार्य अभिनवविद्या नरसिंह महाराज यांनी भूषविले. परिषदेचे संरक्षक दिनेशचंद्रजी यांनी बीजभाषणातून सामाजिक समरसता हा विषय १९६१ मध्ये पू.गोळवलकर गुरुजी यांच्याकडे दलित नेत्यांनी मांडला होता असे सांगून त्यावर पूज्य गुरुजींनी यासंदर्भात हिंदू साधू संतांनी संपूर्ण समाजाला आवाहन केल्यास सुधारणा होऊ शकेल असे सांगून मी स्वतः त्यासाठी प्रयत्न करेल असे सांगितले व त्या दिशेने प्रयत्न केले. १९६६ च्या कुंभमेळ्यामध्ये २३ व २४ जानेवारी रोजी झालेल्या संमेलनामध्ये एकाच व्यासपीठावर चारही शंकराचार्य उपस्थित होते, त्या वेळी सामाजिक समरसता, तसेच हिंदू स्वगृही यायला हवा, असे विचार पूज्य गुरुजींनी मांडले. त्यामध्ये आपले सोने आभूषण हे चोरीला गेले तर ते आपण पुन्हा परत आणायची इच्छा करतो त्याप्रमाणे धर्मांतर केलेल्यांना पुन्हा परत आणणे हे आपले कर्तव्य आहे. दागिना चिखलात पडला तरी आपण धुवुन तो वापरतो त्याप्रमाणे धर्मांतर करणाऱ्यांची घर वापसी केली पाहिजे. यासाठी सवर्ण, ठाकूर, गुज्जर, हिंदू मुखिया यांचे मन परिवर्तन करण्याची गरज त्यांनी मांडली. रामानंदाचार्यांनी पन्नास हजार हिंदूंना परत आपल्या धर्मात आणले. १९६९ मध्ये झालेल्या संत संमेलनामध्ये उच्चनीचता, अस्पृश्यता, जातिभेद भाषाभेद यांचा निषेध करणारा ठराव करण्यात आला. संतांबद्दल समाजामध्ये श्रद्धा असते, त्यामुळे संतांनी सांगितलेले लोक ऐकतात त्यामुळे यासंदर्भात संतांनी सक्रिय होऊन घराघरात काढायची गरज त्यांनी व्यत करुन अशाप्रकारे प्रयत्न केल्यास भारत लवकर विश्वगुरू होईल! असा विश्वासही व्यक्त केला. करवीर पीठाच्या शंकराचार्यांनी छ. शिवाजी महाराजांच्या काळात मुस्लिम झालेल्या नेताजी पालकर यांचे हिंदू धर्मात पुन्हा धर्मांतर कसे करण्यात आले या संदर्भातील प्रक्रिया व कागदपत्रे आपल्या मठामध्ये उपलब्ध असल्याचे सांगून या सगळ्यांना धर्माचा आधार आहे असे स्पष्ट केले. परिषदेने या विषयावर सकारात्मक चर्चा घडवून आणली त्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. बैठकीमध्ये वारकरी संप्रदायाचे ह भ प नारायण महाराज शिंदे, स्वामी भारतानंद सरस्वती मुंबई, जैन मुनि प्रीतिशजी महाराज, आनंद चैतन्य जी बापू, नागपूरचे भागीरथी महाराज, महानुभाव संप्रदायाचे सुदर्शन महाराज कपाटे, देवगिरी प्रांताचे लक्ष्मण महाराज मेंगडे, पराग बुवा रामदासी, प्रशांत कांदळकर जी महाराज, लातूरचे महंत विद्यानंद सागर, ह.भ.प. मारुती महाराज कोल्हटकर, पडघा येथील शिवस्वरूपानंद सरस्वती, स्वामी हरिश्रद्धानंदजी महाराज, ह.भ.प. करपेजी महाराज, दिगंबर आखाड्याचे राम कृष्ण दास जी शास्त्री, रायगड कर्जतचे मैत्रेय दादाश्री, पोहरादेवी संस्थानाचे राज्यपाल नियुक्त आमदार महंत बाबू सिंग महाराज, श्रीपादजी कुलकर्णी, राणा वासकर, बीडचे अमृताश्रामजी महाराज आदींनी विचार मांडले. केंद्रीय धर्माचार्य प्रमुख श्री अशोकजी तिवारी यांनी आपल्या भाषणातून विहिंपच्या विविध योजनांची माहिती दिली. बैठकीचे सूत्र संचालन क्षेत्र धार्मिक पुंज प्रमुख श्री संजय मुरदाळे व प्रांत धर्माचार्य प्रमुख ह. भ. प. माधवदास राठी यांनी केले. क्षेत्र मंत्री गोविंदराव शेंडे यांनी आभार प्रदर्शन केले. या बैठकीसाठी प्रांत मंत्री श्री किशोर चव्हाण, नागनाथ बोंगारगे, धनाजी शिंदे, समीर पायगुडे उपस्थित होते. बैठकीसाठी योगेश बहाळकर, मनोज लोणकर, प्रमोद बोकारे, प्रशांत बोकारे, पंकज अटल, रोहिणी मोरे, प्रदिप क्षिरसागर, किशोर बारटक्के, प्रशांत कुलकर्णी, द्वारकानाथ तिवारी, मोहित चौधरी आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.



## नाशिक वृद्धाश्रमाला श्री. मिलिंद परांडे यांची भेट

विहिंप व वनवासी दुर्लभ घटक संचालित आणि नव्याने उभे राहिलेले आनंदालय, नाशिक या वृद्धाश्रमाला आपले केंद्रीय संघटन महामंत्री मा. श्री मिलिंदजी परांडे यांनी भेट दिली. नवीन इमारत व प्रकल्पाची पूर्ण पाहणी करून प्रकल्पात उभ्या केलेल्या विविध सेवांची पाहणी करून प्रकल्पाचे कौतुक केले.

सदर संस्थेच्या सर्व विश्वस्त मंडळी यांचा परिचय कार्यक्रम झाला. त्याचबरोबर नाशिक विभागातील नाशिक शहर व ग्रामीण जिल्ह्यातील आपली ४ छात्रावास, २ रुग्णपयोगी सेवा केंद्र, तसेच त्रंबक ते पंढरपूर वारीसाठी आरोग्य सेवेतील कार्यकर्ते यांच्या समवेत झालेल्या बैठकीला मा. मिलिंदजी यांनी मार्गदर्शन केले. त्यामध्ये त्यांनी सध्या सेवा कार्य असलेल्या जिल्ह्यात विश्व हिंदू परिषदेचे कार्य वाढीबाबत आवाहन केले. तसेच पुढील काळात नाशिक जिल्ह्यात मोठ्या प्रकल्पऐवजी छोटे प्रकल्प उभे करून त्याचा उपयोग आपल्या कार्याचा विस्तार करण्यासाठी करावा असे नमूद केले. मा. गोविंदजी शेंडे, मा. रामुकाजी, किशोर चव्हाण, नाना गोविलकर, धनाजी शिंदे, नागनाथ बोंगरगे, ॲड शाम घरोटे, जिल्हा अध्यक्ष विवेक लोमटे, डॉ निरंजन नंदन, रामभाऊ महाजन, विनीत महाजन इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# हिंदू हाच देशाचा केंद्रबिंदू - मिलिंद परांडे





पिंपरी (दिनांक : २६ नोव्हेंबर २०२४) हिंदू हाच देशाचा केंद्रबिंदू असून हिंदुत्व समाजाच्या केंद्रस्थानी आहे! असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे यांनी कॅप्टन कदम सभागृह, पेठ क्रमांक २५, निगडी प्राधिकरण येथे सोमवार, दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ रोजी केले. विश्व हिंदू परिषद, पिंपरी चिंचवड जिल्हा – विशेष संपर्क विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या संवाद सेतू या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून मिलिंद परांडे बोलत होते. प्रांत मंत्री किशोर चव्हाण, प्रांत सह मंत्री ॲड. सतिश गोरडे, इस्कॉनचे गोपीदास प्रभू, विश्व हिंदू परिषद जिल्हा अध्यक्ष शरद इनामदार, पश्चिम महाराष्ट्र प्रांत सम्पर्क प्रमुख श्रीकांत पोतनीस यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती; तसेच समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांची सभागृहात उपस्थिती होती.

मिलिंद परांडे पुढे म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा हा काळ हिंदू समाजासाठी अनुकूल आहे. जागतिक स्तरावर भारताचे महत्त्व वाढले आहे. रामजन्मभूमी आंदोलनापूर्वी हिंदूंना स्वतःला हिंदू म्हणवून घेण्यात न्यूनगंड वाटत होता; परंतु आंदोलनाच्या यशानंतर परिस्थिती पालटली आहे. २०३० पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर तिसऱ्या क्रमांकावर येण्याची सुचिन्हे दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर विश्वात भारत अग्रेसर होऊ नये म्हणून अनेक परकीय आणि देशांतर्गत शक्ती प्रयत्नशील आहेत. जागतिक महाशक्ती जगात सर्वत्र कळसूत्री सरकारे असावीत अशी इच्छा बाळगून आहे किंबहुना बांगलादेशाप्रमाणे भारताची दुर्दशा व्हावी असेच कुटिल डाव खेळले जात आहेत. यासाठी अशांती, सांस्कृतिक मार्क्सवाद, भोगवाद बोकाळावा म्हणून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. या आव्हानांचा सामना करताना आपल्या हिंदूंनी संघटित होणे आवश्यक आहे. श्रेष्ठ तत्त्वज्ञान अन् भ्रष्ट आचरण ही हिंदू समाजाची शोकांतिका आहे. सुसंस्कारांची कमतरता हे त्यातील प्रमुख कारण आहे. हिंदूंचा घटता जननदर, मोठ्या प्रमाणावर झालेले धर्मांतरण, स्त्रीला देवत्व बहाल करणे पण प्रत्यक्षात कौटुंबिक पातळीवर दुय्यम वागणूक या बाबतीत अंतर्मुख होऊन कृतिशील होणे गरजेचे आहे. देव, देश आणि धर्म याच्या पुनरुत्थानासाठी प्रत्येकाने प्रामाणिक प्रयत्न केल्यास हिंदुस्थान वैभवाच्या शिखरावर जाऊन पोहोचेल! असा आशावाद मांडत रवींद्रनाथ टागोर यांच्या कवितेने परांडे यांनी समारोप केला.

दीपप्रज्वलन आणि अखंड भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. श्रीकांत पोतनीस यांनी प्रास्ताविकातून समाजात प्रभाव असलेल्या उच्चशिक्षित वर्गाला समाजातील समस्या आणि आव्हाने यांचे आकलन व्हावे म्हणून विश्व हिंदू परिषद कार्यरत असल्याची माहिती दिली. कार्यकम नियोजन डॉ. शर्वरी एरगट्टीकर, शारदा रिकामे, नितीन वाटकर, विजय रामाणी, रवि कळंबकर, मा प्रांत मंत्री विजय देशपांडे, भास्कर रिकामे यांनी केले. जिल्हा मंत्री धनंजय गावडे यांनी सूत्रसंचालन केले. जिल्हा सहमंत्री विशाल मासुळकर यांनी आभार मानले.

## बजरंग दल, रक्तदान महायज्ञ २०२४

आज भागात एकूण १७ ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सर्व केंद्रावर सकाळ पासून मोठ्या प्रमाणावर भागातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ,विविध सामाजिक संस्था, राजकीय पक्ष यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

अभिरुची ८५, सन सिटी १२१, धायरी फाटा ५३, आनंद नगर २२७, राजयोग ९३, सुदत्त संकुल ६३, विठ्ठल रखुमाई गृ. संस्था १०१, हिंगणे मनपा शाळा १०६, वडगांव २२२, सिल्व्हरक्रिस्ट १०८, नऱ्हे ३०५, नवशा मारुती ३४, माणिकबाग १६१, नांदेड ६०, वांजळे तलाव २०१, धायरी ९२, सोबा ऑप्टिमा २२ – एकूण रक्तदान – २०५४

**करुनि दान रक्ताचे, ऋण फेडू समाजाचे**

# पिंपरी - चिंचवड कार्यकर्त्यांची खाण! - दादा वेदक



पिंपरी – चिंचवड कार्यकर्त्यांची खाण असून या भूमीने सुनीता फाटक यांच्यासारखे असंख्य समर्पित कार्यकर्ते विविध संघटनांना दिले आहेत! असे भावपूर्ण उद्गार विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय संयुक्त मंत्री दादा वेदक यांनी विश्व हिंदू परिषदेच्या नुकत्याच दिवंगत झालेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्या स्वर्गीय सुनीता सुधीर फाटक यांच्या श्रद्धांजली सभेत बोलताना कॅप्टन कदम सभागृह, पेठ क्रमांक २५, निगडी प्राधिकरण येथे शनिवार, दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ रोजी काढले. विश्व हिंदू परिषद जिल्हा अध्यक्ष शरद इनामदार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जिल्हा संघचालक विनोद बन्सल, स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळ महिला विभाग कार्याध्यक्षा वैदेही पटवर्धन यांची व्यासपीठावर तसेच विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची सभागृहात उपस्थिती होती.

दादा वेदक पुढे म्हणाले की, निरलस, ध्येयनिष्ठ आणि निर्मळ मनाची कार्यकर्ती असे सुनीता फाटक यांचे व्यक्तिमत्त्व होते. १९८७ पासून २०२० पर्यंत त्यांनी संघटनेच्या कार्यासाठी अविरत भ्रमंती केली. आपल्या सामाजिक कार्यातून त्यांनी असंख्य कुटुंबांतील माणसे जोडली. प्रपंचात राहूनही वयाच्या ८१ व्या वर्षांपर्यंत कार्याचा वसा निष्ठेने जोपासला. सुधीर फाटक आणि कुटुंबीयांची त्यांना उत्तम साथ लाभली. सतत व्यस्त असूनही त्यांनी कौटुंबिक घडी कधी विस्कळीत होऊ दिली नाही. भ्रमणध्वनीवरून कार्यकर्ते निर्माण होत नाहीत, तर त्यासाठी सहप्रवास, सत्संग आवश्यक असतो. सुनीता फाटक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बालसंस्कार वर्ग सुरू करावेत! असे आवाहनही त्यांनी केले.

स्वर्गीय सुनीता फाटक यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. रविकांत कळंबकर यांनी प्रास्ताविकातून सुनीता फाटक यांच्या सुमारे चाळीस वर्षांच्या सामाजिक कार्याची माहिती दिली. यावेळी ध्वनिचित्रफितीच्या माध्यमातून सुनीता फाटक यांनी सहभाग घेतलेल्या रामजन्मभूमी आंदोलनातील कारसेवा, शिलान्यास याविषयीच्या आठवणी प्रदर्शित करण्यात आल्या. विनोद बन्सल यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाच्या कार्यातील त्यांचे योगदान अधोरेखित केले; तर शरद इनामदार यांनी आपल्या मनोगतातून, सुनीताताई यांच्याकडे अनेक गोष्टींचे सामर्थ्य होते. संघटनेच्या उभारणीसाठी त्यांनी तन, मन आणि धन समर्पित केले; तसेच जीवावर उदार होऊन विविध आंदोलनात सहभाग घेतला! असे गौरवोद्गार काढले. सुनीता फाटक यांच्या स्नुषा तन्वी फाटक यांनी सासू – सुनेच्या नात्यापलीकडील निखळ नात्याच्या हृद्य आठवणी जागविल्या. डॉ. गिरीश आफळे, ह. भ. प. शिवाजीमहाराज मोरे, आशा टाकळकर, विजय देशपांडे, भास्कर रिकामे, अनुजा वनपाळ, अशोक येलमार, महेश कुलकर्णी यांनी व्यक्त केलेल्या श्रद्धांजलीपर मनोगतातून सुनीता फाटक यांच्या चाळीस वर्षांच्या प्रदीर्घ सामाजिक कार्याविषयीचे अनेक आयाम उलगडत गेले. हर्षदा पोरे यांनी सूत्रसंचालन केले. उपस्थित सर्वांनी सुनीता फाटक यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

प्रदीप गांधलीकर



## ज्येष्ठ पत्रकार पिसे यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर

### पत्रकारितेतील योगदानाबद्दल जळगावात सन्मान

■ सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. १ : ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार पिसे यांना पुण्यातील जिव्हेश्वर प्रतिष्ठानचा पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाबद्दल जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.

खान्देशातील ज्येष्ठ पत्रकार, सहकार व राजकीय क्षेत्रातील ज्येष्ठ नेते स्व. माधवराव साळी यांच्या स्मृत्यर्थ जिव्हेश्वर प्रतिष्ठानकडून, पिसे यांनी गेली चार दशके पत्रकारिता क्षेत्रात बातमीदार, उपसंपादक आणि संपादक पदापर्यंत प्रदीर्घ प्रवास केला व आजही माध्यमात कार्यरत आहेत. या योगदानाबद्दल त्यांना पुरस्कार जाहीर केला आहे. पिसे यांनी रा.स्व. संघाच्या माध्यमातून सामाजिक,

विजयकुमार पिसे

धार्मिक व ग्रामीण क्षेत्रातदेखील आपले योगदान दिले आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत प्रबोधन मंचच्या माध्यमातून मतदान जागृतीबाबत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत विभाग सहमंत्री म्हणून सध्या त्यांच्याकडे जबाबदारी आहे.

भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे संस्थापक पद्मश्री गिरीश प्रभुणे आणि डिक्कीचे संस्थापक पद्मश्री डॉ. मिलिंद कांबळे यांच्या हस्ते पिसे यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

**हिंदूबोध संपादक मंडळ सदस्य**



## विशेष संपर्क विभाग

२ ते ६ डिसेंबर दरम्यान सांसद संपर्क अभियान दिल्ली येथे संपन्न. यावेळचा विषय होता. हिंदू मंदिरा वरील सरकारी नियंत्रण काढून टाकणे. धारा २९ आणि ३० रद्द करणे. या अभियाना दरम्यान पश्चिम महाराष्ट्रातील १३ खासदारांची आणि १ राज्यसभा खासदार यांची भेट संसदेच्या हिवाळी अधिवेशनात दिल्ली येथे घेऊन त्यांना हिंदू मंदिरे सरकारी नियंत्रणातून मुक्त करण्या विषयी माहिती देणे, त्याच्या कडून सभागृहात Zero-wars मध्ये या विषयी चर्चा घडवून आणण्या ची विनंती करणे. सरकार तर्फे जर यासंदर्भात धारा २९ आणि ३० रद्द किंवा बदल करण्या साठी सांभागृहात जर बिल आणलं तर बिलच्या बाजूने मतदान करावं. या वेळी पश्चिम महाराष्ट्रा तील मा.खा.मुरली अण्णा मोहोळ – पुणे, खा. धैर्यशील. माने – इचलकरंजी, खा.डॉ अमोल कोल्हे – शिरूर, खा.भाऊसाहेब वाघचौरे – शिर्डी, खा. राजाभाऊ वाजे – नाशिक, खा. धनंजय महाडिक – कोल्हापूर (राज्यसभा), खा. शंकर लालवाणी – इंदोर. या सर्व खासदारांची त्यांच्या दिल्ली येथील घरी जाऊन घेतली. १३ + १ पैकी फक्त ६ खासदारांच्या भेटी घेता आल्या करणं बरेच खासदार महाराष्ट्रात होते नविन मंत्री मंडळ ठरणार होते महाराष्ट्रात. या अभियाना साठी पश्चिम महाराष्ट्रतून मी स्वतः, श्रीकांत पोतनीस, अशोक रामचंदानी, राजन गुणे यांनी भाग घेतला. मार्गदर्शन श्री. किशोर चव्हाण आणि संजय जीं ढवळीकर यांचे लाभले.

**श्रीकांत पोतनीस**



## 'कुटुंब हा सामाजिक परिवर्तनाचा पहिला उपक्रम'




लोकमंथनमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पू. सरसंघचालक श्री. मोहनजी भागवत यांनी संक्षिप्त भाषण केले. आपल्या देशात कुटुंब म्हणजे योगायोग नसून नात्याच्या सुगंधाने भरलेली समन्वयाची भावना आहे. यामध्ये रक्ताचे नाते आहे. हे एक कुटुंब आहे ज्यामध्ये कुटुंबातील सर्व सदस्यांना धडे देण्याची व्यवस्था आहे. लहान पक्षी मोठे झाल्यावर वेगळे निघून जातात. माणसांमध्ये असे होत नाही. आमच्या कुटुंबात, मोठे झाल्यानंतरही, सर्वजण एकत्र राहतात. कुटुंब सामाजिकतेची भावना देते. आपलेपणा शिकवते. कुटुंब हे प्रशिक्षणाचे साधन आहे. कुटुंबाच्या पलीकडे जो कोणी आहे तो देखील कुटुंबात समाविष्ट राहतो.

उदाहरणार्थ, जेव्हा कोणी काही मागण्यासाठी घराच्या दारात येतो तेव्हा त्याला रिकाम्या हाताने परत केले जात नाही. यातून घरातील मुलाला कळते की, घराबाहेरील कोणी काही मागितले तरी त्याला ते द्यावेच लागते. कुटुंब हे समाजाचे सामाजिक एकक आहे. हे आपल्या देशातील एक पारंपारिक आर्थिक एकक आहे. स्वत:पासून कुटुंबाकडे, कुटुंबाकडून कुटुंबाकडे, कुटुंबाकडून गावाकडे, गावाकडून संपूर्ण समाजाकडे आणि समाजाकडून मानवतेपर्यंत, मानवतेपासून संपूर्ण विश्वनिर्मितीपर्यंत. ज्या नातेसंबंधातून आपल्याला याची जाणीव होते, त्याचे ज्ञान कुटुंबात आढळते. हे ज्ञान आपण नव्या पिढीपर्यंत पोहोचवले पाहिजे. आपली नवीन पिढी भारतातील असावी. आधुनिक व्हा, पण पुराणमतवादी नाही, पाश्चिमात्य नाही. आनंदाच्या वातावरणात त्यागाचा संदेश देऊ, मूल्य आणि संपत्तीही देऊ. आपण विज्ञान देखील आणू आणि खरे अंतरंग ज्ञान मिळवू. हे कुटुंबाचे कर्तव्य आहे. समाजाचा आजारही कुटुंबामुळेच बरा होईल. त्यामुळे समाजात बदल घडवून आणणाऱ्या पाच उपक्रमांपैकी पहिला उपक्रम म्हणजे कुटुंब. उर्वरित चार उपक्रम म्हणजे सामाजिक समरसता, स्वदेशी, पर्यावरण आणि नागरी शिस्त.





# नव्याने जीवनाला सुरुवात करा! - अ‍ॅड. सतिश गोरडे

पुणे (दिनांक : २७ नोव्हेंबर २०२४) एखाद्या दुर्दैवी क्षणी हातून गुन्हा घडतो किंवा चूक नसतानाही नकळत माणूस गुन्ह्यात अडकतो आणि कारागृहात खितपत पडतो; परंतु भूतकाळ विसरून कायद्याच्या साहाय्याने शिक्षेपासून सुटका अथवा सवलत मिळवून पुन्हा नव्याने जीवनाची सुरुवात करा! असे आवाहन नामांकित अधिवक्ता अ‍ॅड. सतिश गोरडे यांनी येरवडा मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांना मंगळवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी केले. भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त दर्द से हमदर्द तक ट्रस्ट, विधी प्रकोष्ठ आणि येरवडा मध्यवर्ती कारागृह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान साक्षरता उपक्रमात अ‍ॅड. सतिश गोरडे बोलत होते. याप्रसंगी दर्द से हमदर्द तक ट्रस्टच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अ‍ॅड. सुनीता साळशिंगीकर, कारागृहाचे वरिष्ठ अधीक्षक रवींद्र गायकवाड, अधीक्षक सोमनाथ पडोले, अ‍ॅड. खेतीराम सोलंकी यांची प्रमुख उपस्थिती होती. हा उपक्रम राबिवण्यासाठी मा. प्रशांत बुरडे अप्रतिम पोलीस महानिरीक्षक व महासंचालक कारागृह व सुधारसेवा महाराष्ट राज्य, डॉ. जालिंदर सुपेकर विशेष पोलीस कारागृह महानिरीक्षक, म राज्य, श्रीमती स्वाती साठे उप महा कारागृह निरीक्षक, येरवडा पुणे यांनी राबविला.

अ‍ॅड. सुनीता साळशिंगीकर यांनी आपल्या मनोगतातून, बंदिजनांच्या नातेवाईकांना ई प्रिंट द्वारे मुलाखत कशी घ्यावी याची माहिती देण्यासाठी काही कारागृहात बाहेर फिरते विधी सहाय्य केंद्र संस्थेमार्फत सुरू केले आहे. पैशांच्या अभावी व गरिबीमुळे अनेक आरोपी जेलमध्ये अडकून पडलेले असतात, काहीजणांकडे पैसा असूनदेखील केस झाल्यामुळे त्यांना नातेवाईक व मित्रमंडळींकडून वाळीत टाकले जाते अशा कैद्यांना विनामूल्य कायदेशीर मदत पुरवण्याचे काम संस्था करत असते. भारतीय संविधानाच्या कलम ३९अ नुसार सर्व नागरिकांना कायदेशीर मदत मिळण्याचा अधिकार आहे. ३ वर्षांपासून आजपर्यंत सहाशेहून अधिक गरजू आणि गरीब कैद्यांना दर्द से हमदर्द ट्रस्टने मोफत कायदेविषयक साहाय्य करून जेलबाहेर काढले आहे. वकिली पेशामध्ये असताना या समाजाचे सुद्धा आपण देणे लागतो अशी भावना नवोदित वकिलांमध्ये जागृत करण्याचे काम संस्था करते; तसेच त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींमार्फत मार्गदर्शन करते! अशी माहिती दिली.

अ‍ॅड. सतिश गोरडे पुढे म्हणाले की, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुमारे पंचाहत्तर वर्षे आपण मुक्त जीवन जगत आहोत. ०१ जुलै २०२४ पासून आपल्या देशात भारतीय न्यास संहिता २०२३ (बी.एन.एस.एस.) हा नवा कायदा लागू झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच इनह्युमन कंडिशन व्हर्सेस डायरेक्टर जनरल ऑफ प्रीझन या निवाड्यात बी.एन.एस.एस. च्या कलम ४७९ नुसार कैद्यांना विविध प्रकारचे फायदे होऊ शकतात. कलम ४७९ नुसार जन्मठेप आणि फाशीची शिक्षा वगळून अन्य गुन्ह्यातील कैद्यांनी जर ज्या कलमांतर्गत ते जेलमध्ये आहेत त्या कलमाच्या जास्तीत जास्त शिक्षेच्या अर्धी शिक्षा पूर्ण झाली असेल तर कोर्टाने जामीन द्यायचा आहे; तसेच जर तो कैदी पहिल्या गुन्ह्यासाठीच जेलमध्ये आलेला असेल व अन्य कुठल्याही गुन्ह्यांमध्ये त्याला भूतकाळामधे शिक्षा झालेली नसेल आणि जास्तीत जास्त गुन्ह्याच्या एक तृतीयांश शिक्षा पूर्ण झाली असेल तर न्यायबंदी कैद्याला जामीन द्यावा, अशी तरतूद निवाड्यात आहे. या कलमांतर्गत कुठल्याही आरोपीला त्याच्या कमाल शिक्षेच्या कालावधीपेक्षा जास्त काळ जेलमध्ये ठेवता येणार नाही, असे नमूद केले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माननीय न्यायाधीश गवईसाहेब यांनी नुकतेच महिला कैद्यांची या संदर्भातील यादी तात्काळ बनवली पाहिजे, असे सांगितले आहे. चोरी, दरोडे वगैरे सारखे जे छोटे गुन्हे असतात त्यामध्ये आरोपीने गुन्हा कबूल केल्यास न्यायालय त्यांना कमीत कमी शिक्षा देऊन मुक्त करू शकते. याबाबत आरोपीने स्वतः गुन्हा कबूल केल्यास त्याला फायदा होतो. तसेच अनेक कैद्यांना जामीन मंजूर झालेला असतो पण जामीनदाराची अट ते पूर्ण करू शकत नाही. अशा कैद्यांना रोख जामीनवर सोडण्याचा अर्ज करावा. जामीन झाल्यास आणि कैदी त्याची पूर्तता करू न शकल्यास त्याला सात दिवसानंतर वैयक्तिक जातमुचलक्यावर सोडण्याचे आदेश माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे कैद्यांनी खचून न जाता सद्वर्तन ठेवावे. संविधान आणि कायदे त्यांच्या जीवनातील अंधकार नक्कीच दूर करतील! असे विस्तृत मार्गदर्शन सुमारे १६० हून अधिक संख्येतील कच्चे आणि पक्के कैदी यांना केले. कार्यक्रमाच्या संयोजनात ड. सोहम यादव, ड. संकेत राव, अ‍ॅड. चित्रा मराठे, अ‍ॅड. ऋषिकेश शर्मा, अ‍ॅड. आशिष गोरडे, चेतन पवार यांनी सहकार्य केले.



# स्वामी श्रद्धानंद हे अस्पृश्याचे सर्वात मोठे व अत्यंत कळकळीचे कैवारी होते...

### ॲड. मृणालिनी पडवळ

संगमनेर(प्रतिनिधी) स्वामी श्रद्धानंदांच्या समोर हिंदू संघटनेचे दोन पैलू होते. नवमुस्लिमांना पुन्हा हिंदू धर्मात घेणे व दलित जातींना उन्नत करणे. शुद्धी सभेच्या माध्यमातून त्यांनी ३० हजार मुसलमानांना पुन्हा हिंदू धर्मात घेतले. त्यामुळे मुस्लिम श्रद्धानंदांवर चिडून होते. मार्च १९२६ मध्ये कराची येथील असगरी बेगम नावाची एक स्त्री आपल्या मुलांसह दिल्लीला आली. तिने आपल्याला हिंदू धर्मात घ्यावे, अशी विनंती स्वामीं श्रद्धानंदांना केली. तिची व तिच्या मुलांच्या शुद्धी केली गेली. तिचे नाव शांतीदेवी ठेवले गेले. तिच्या पतीने भरलेला खटला फेटाळला गेला. या घटनेचा सूड घेण्यासाठी अब्दुल रशिद या धर्मांधाने २३ डिसेंबर, १९२६ रोजी दिल्ली येथे श्रद्धानंदांवर गोळ्या झाडून त्यांची हत्या केली. आयुष्यभराच्या साहसाने स्वामी श्रद्धानंदांना वीर हौतात्म्य प्राप्त झाले. दलितोद्धारक चळवळीचे महत्व ओळखून त्यांनी आपले सर्व आयुष्य त्यासाठी वेचले. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांच्याबद्दल आपल्या ग्रंथात म्हणतात– स्वामी श्रद्धानंद हे अस्पृश्याचे सर्वात मोठे व अत्यंत कळकळीचे कैवारी होते ! असे प्रतिपादन ॲड. मृणालिनी पडवळ यांनी बाभळेश्वर येथे विश्व हिंदू परिषदेच्या जिल्हा बैठकीत केले. स्वामी श्रद्धानंदांचे बलिदान न विसरता देश, धर्म विरोधी मानसिकता यांचे मानमर्दन करून पुनः धर्म संस्थापना करणे, घरवापसी करविणे, हीच स्वामी श्रद्धानंदांना खरी श्रद्धांजली होईल. स्वामी श्रद्धानंद बलिदान दिन, दि २३ डिसेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान विश्व हिंदू परिषद जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात बलिदान दिवस म्हणून आयोजित करते.

ह.भ.प मस्के महाराज दाम्पत्य, ह.भ.प अनर्थे महाराज, ह.भ.प. टेके महाराज दाम्पत्य, महाराष्ट्र प्रांत सहमंत्री ॲड. सतीश गोरडे, प्रांताचे मातृशक्ती पालक विजय देशपांडे, मातृशक्ती संयोजिका प्रिया रसाळ, दुर्गावाहिनी संयोजिका सौ. नाथताई, विभागमंत्री सुनील खिस्ती, प्रांत कार्यकारणी सदस्य प्रशांत बेल्हेकर, जिल्हामंत्री विशाल वाकचौरे, सहमंत्री गोपाल राठी या मान्यवरांच्या उपस्थितीत जिल्हा बैठक घेण्यात आली.

यावेळी जिल्हा कार्यकारणीतील बजरंग दल संयोजक शुभम मुर्तडक, योगेश मखाना, प्रशांत बहिरट, कुणाल करंडे, अश्विन बेल्हेकर, शामल बेल्हेकर, विद्या वाघ, पूजा लष्करे, पुनम गांधी सदस्यांच्या हस्ते धर्मप्रसार जिल्हा प्रमुखपदी दिपक शिनगर, कोपरगाव दक्षिण विभाग बजरंग दल सह संयोजक अनिकेत घोडके, उत्तर विभाग बजरंग दल शहर संयोजक रवि आहेर, अकोले शहर संयोजक नागेश कदम, शहर सहसंयोजक साहिल साळुंके, बलोपासना प्रमुख वैभव गायकर, सुरक्षा प्रमुख सुशांत पवार, प्रसार – प्रचार प्रमुख सिद्धीराज अवचिते, बजरंग दल संपर्कप्रमुख ऋषिकेश पवार, रोहित डावरे, महाविद्यालय प्रमुख प्रेम खरात, मातृशक्ती संयोजिका सुवर्णा भुजबळ, नेवासा शहर बजरंग दल संयोजक विकास लष्करे, शाखा प्रमुख सिद्धेश कापसे, विहिंप शाखा मनोज काळे, धर्म प्रसार प्रमुख आकाश काळे, राहाता धर्मप्रसार सौरभ लहामगे आदींची नवीन पदाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली.

यावेळी कुलदीप ठाकूर, श्रीकांत मोरे, रवी मंडलिक, वैभव क्षीरसागर, संतोष चव्हाण, अमोल गायकवाड, श्रीनिवास अमृतवाड, साई बिडवे, कृष्णा डंभीर, अमोल शिंदे, वैभव मेहेत्रे, सतीश अंत्रे, प्रसाद थोरात, विकास शेळके, देवराम मुसळे, विठ्ठल रोडे, दत्तात्रय भुजाडी, उमेश पन्हाळे, राहुल ढोक, रवींद्र नजन, श्रीराम कौदरे, हेमंत बंड, अशोक वेताळ, ड. सुनील शेळके, ड. सोनाली बोटवे, सौ. संगीता बैरागी, सौ. हिना उबाळे, सौ. अनिता गोरे, भानुदास गोरे, प्रसाद बनगौवा, सागर पाटील, ऋषिकेश टिळेकर, अविनाश यादव दीपक तारडे, राजेंद्र भुजबळ आदींची उपस्थिती होती. राहाता बजरंग दल संयोजक ईश्वर टिळेकर, दिनेश राकेचा यांनी कार्यक्रमाची व्यवस्था प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली.

## ३० गोरक्षक निर्दोष मुक्त

सन २००७ मध्ये मंचर (भीमाशंकर जिल्हा) येथे गोरक्षण करताना झालेल्या दंगलीत मंचर पोलीस स्टेशनने स्वतः फिर्यादी होऊन बजरंग दलाच्या ३० कार्यकर्त्यांवर भा. दं. वि. कलम ३०७, ३३२, १४३, १४७, १४८, १४९, ३३६, ३३७, २९५ (अ) आर्म्स क्ट कलम ४, २५ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्यातून राजगुरूनगर येथील मा. सत्र न्यायालयाने सर्व ३० कार्यकर्त्यांना आज मुक्त केले आहे. सर्व वीर बजरंगींचे हार्दिक अभिनंदन

ॲड. मृणालिनी पडवळ, (प्रांत धर्मप्रसार प्रमुख)

# गो आधारित शेती, उत्पादन, विक्री व पंचगव्य औषधी वापर केल्यास देश सक्षम, निरोगी होईल.

**- अ.भा. गोरक्षा प्रमुख मा. दिनेशजी उपाध्याय.**

विहिंप, गोरक्षा आयाम, प. म. प्रांत, कार्यकर्ता बैठक दि ७/१२/२४ रोजी झाली. यावेळी अखिल भारतीय गोरक्षा प्रमुख मा दिनेशजी उपाध्याय, क्षेत्र गोरक्षा संघटंन मंत्री मा भाऊरावजी कुदळे, प्रांत मंत्री मा किशोरजी चव्हाण, प्रांत सह मंत्री ड सतिश गोरडे, प्रांत गोरक्षा प्रमुख सी ए महेन्दजी देवी, प्रांत सह प्रमुख मा कौस्तुभजी देशपांडे, सह प्रमुख मा विलास फाटक, क्षेत्र गोभक्त महिला प्रमुख सौ देशमुख ताई आदि उपस्थित होते.

सुरवातीस प्रांत कार्यालय प्रमुख कै अनंत पाठक काका यांचे धक्कादायक आकस्मिक निधन दि ६/१२/२४ रोजी झाले त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रांत सह मंत्री ॲड सतिश गोरडे यांनी त्यांच्या योगदान बद्दल माहिती देऊन श्रद्धा सुमन वाहिली. त्यानंतर संघटनेच्या परीपाठीप्रमाणे दीपप्रज्वलन, त्रिवार ओंकार, एकात्मता मंत्र व विजय महामंत्रने कार्यक्रमास सुरवात झाली. मान्यवरांचा परिचय मा कौस्तुभजी देशपांडे यांनी करून दिला तर मा. महेंद्र देवी यांनी प्रास्ताविक केले. गोरक्षा आयाम सूक्ष्म माहिती सांगत असताना आपल्या महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये आढळणाऱ्या देशी गाईंच्या प्रजाती समजावून सांगितल्या. उदाहरणार्थ गवळण मुगलाई लाल कंधाई देवणी डांगी खिल्लारी कपिला इत्यादी. ग्रामीण क्षेत्रांमध्ये शेती ही गोवंश आधारित असावी. गो आधारित पंचगव्याचे उत्पादन व्हावे. महाराष्ट्रामध्ये ६८ प्रकारची गो आधारित औषधे प्रचलित आहेत त्यांचाही उत्पादन व्हावं, व्यसनमुक्तीसाठी देखील गो आधारित उत्पादनांचा वापर करता येऊ शकतो आणि नसल सुधार असा विहिंपचा आग्रही कार्यक्रम गोरक्ष आयामाच्या माध्यमातून करावा अशी संकल्पना व भूमिका उदाहरणासह मा भाऊराव जी कुदळे यांनी पहिल्या सत्रात सांगितली. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जवळपास ११८९ गोशाळा आहेत आणि त्यापैकी पश्चिम महाराष्ट्र मध्ये ३९० गोशाळा आहे आणि या सर्वांच्या सोबत संपर्काचे काम गोरक्षा आयमाच्या माध्यमातून व्हावं असं अपेक्षित करण्यात आलं. प्रत्येक जिल्ह्याला गोरक्ष आयाम प्रमुख असावा आणि त्यांची टोळी देखील असावी असा आग्रह करण्यात आला.

जिल्हा गोरक्ष टोळीमध्ये गोभक्त महिला प्रमुख देखील असावी असा आग्रह क्षेत्राच्या गोभक्त महिला प्रमुख सौ सुनीता देशमुख यांनी सांगितले. घरातील गाईची सेवा ही घरातील माईच करत असते आणि त्यांच्या हाताला गो आधारित वस्तू उत्पादनाचे काम मिळवून त्यांना आर्थिक सशक्त कशा पद्धतीने करता येईल यासाठी विशेष प्रयत्न करावेत असं मनोगत त्यांनी व्यक्त केलं. सेना पासून तयार केलेल्या गणेश मूर्ती, सेना पासून तयार केलेले रंग, सेना पासून तयार केलेली पाणी आणि अग्निप्रतिरोधक घरांची प्रतिकृती श्री नितीन सातव यांनी चित्राद्वारे प्रस्तुत केली. आणि त्याचे प्रशिक्षण वर्ग देखील आयोजित करण्याची योजना तयार करण्यात आली. ग्रामीण भागामध्ये भरपूर उत्पादने तयार होत आहेत पण शहरी भागाचे लक्ष वेधून घेण्यात कुठेतरी ग्रामीण भागातील कार्यकर्ते कमी पडत आहेत तर शहरातील कार्यकर्त्यांनी देखील ग्रामीण भागातील अशा उत्पादकांचा संपर्क साधून त्यांना त्यांची उत्पादने विक्रीसाठी मदत करावी असे मत तुषार जी वाघ यांनी प्रस्तुत केले. गाय ही अति संवेदनशील मनुष्य प्रमाणेच प्राणी आहे तिलाही भावना आहेत आणि त्या भावनांचा परिचय हा प्रत्यक्ष अनुभवता आला हे उदाहरण देऊन शिवप्रसाद व्यास यांनी गोमातेची महिमा स्पष्ट केली.

गो संवर्धनासाठी आणि त्याची व्यापकता जन माणसांपर्यंत पोहोचावी यासाठी गोसंपदा हा केंद्रीय अंक जास्तीत जास्त प्रमाणात पश्चिम महाराष्ट्रामध्ये प्रसारित व्हावा असा आग्रह करण्यात आला. महाराष्ट्र गोसेवा आयोग याबद्दल प्राथमिक माहिती श्री भाऊराव कुदळे यांनी सांगितली. प्रांत मंत्री मा किशोरजी चव्हाण यांचे मनोगतात या आयामाचे महत्व सांगून संघटनात्मक कामाबाबत माहिती दिली.

समारोप प्रसंगी मा दिनेशजी उपाध्याय यांनी गोरक्षा आयामाच काम करत असताना वेगवेगळा दृष्टिकोन ठेवावा असे सांगितले. एखादं काम करत असताना संघटनात्मक दृष्टिकोनातून आपल्याला कार्यकर्ते मिळत आहेत का याचा विचार करावा, घेतलेल्या कार्यक्रमातून कार्यकर्ता प्रशिक्षण होत आहे का किंवा कार्यक्रमापूर्वी कार्यकर्त्याचे प्रशिक्षण व्हावे, कार्यक्रमाची व्यापकता वाढवण्यासाठी योजना तयार करणे आणि योग्य क्रियानवयनाचा दृष्टिकोन ठेवावा, आपल्या आयमाची आर्थिक बाजू कशी दर्शन करता येईल नियोजन करावे, घेण्यात येणारे कार्यक्रम प्रबोधनात्मक कितपत पोहोचवता येईल याचा दृष्टिकोन ठेवावा, केलेल्या योजनेतून कार्यक्रम कितपत यशस्वी झाला याचं मुलांकन करावं, समाजामध्ये घेतलेल्या कार्यक्रमाचा किती प्रभाव पडला अशा ७ मुद्याच्या आधारावर मांडणी केली. कार्यकर्त्यांच्या करणीय कामामध्ये त्यांनी देशी गोपालन करावे व अनेकांना प्रेरित करावे, गौ मातेला कुटुंबासोबत जोडून घ्यावे आणि अनेकांना जोडण्यासाठी प्रयत्न करावेत त्याचे माध्यम गाईचे दूध, गो आधारित उत्पादनांचा दैनंदिन जीवनामध्ये वापर उदाहरणार्थ साबण गोणाईल शॅम्पू दंतमंजन इत्यादी, विविध आजारांसाठी पंचगव्य आधारित औषधांचा वापर करणे, गो आधारित

शोती करणे, गोवंश आधारित उत्पादनाचे विक्री केंद्र गाव पातळीवर चालू करणे जेणेकरून गोपालकांना आर्थिक आधार पण भेटेल. शेतामध्ये शेणखत वापरण्यासाठी खत बनवण्याची प्रशिक्षण घेणे व देणे ज्यामुळे जमिनीचा कसही सुधारेल आणि उत्पादनही वाढेल. पंचगवे आधारित केंद्र तयार करून त्याची व्याप्ती वाढवण्यासाठी त्या केंद्राच्या प्रचार प्रसार करणे. आदर्श गोशाळा निर्माण करणे किंवा निर्माण करण्यास मदत करणे त्याचे बिंदू देखील स्पष्ट करण्यात आले, आदर्श गोआधारित गांव व्हावे यासाठी प्रयत्न करणेचे आवाहन श्री दिनेश जी उपाध्याय यांनी केले.

यावर्षी होणाऱ्या कुंभमेळ्याचे निमित्ताने अखिल भारतीय गोरक्षा संवर्धन समितीचे अखिल भारतीय अधिवेशन प्रयागराज येथे होणार आहे या अधिवेशनामध्ये चार मुद्द्यांच्या आधारित प्रस्ताव पारित करून राज्यांना अनुषंगाने केंद्राला आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी आग्रह करण्यात येणार आहे. कुंभमेळ्यातील अधिवेशनामध्ये प्रमुख चार मागण्या करणार असल्याचे सांगितले– १) गायीला राष्ट्रीय प्राणी घोषित करावं, २) गो हत्येसाठी कठोर कायदा आणावा, ३) गौ संवर्धनासाठी गौ मंत्रालय वेगळं स्थापन करावं, ४) देशातील गोचर भूमी मुक्त करावी. या अधिवेशनामध्ये सर्वनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन दिनेश जी यांनी केले. उत्तर प्रदेश येथील प्रयागराज मध्ये २० फेब्रुवारी २०२५ रोजी कुंभमेळ्यामध्ये गोरक्षाचे अखिल भारतीय अधिवेशन आहे त्याचं निमंत्रणही या निमित्ताने त्यांनी दिले. कार्यक्रमाचा समारोप परिपाठीप्रमाणे शांतीमंत्र व उद्घघोष होऊन करण्यात आला. जय गोमाता.

**मुकेश दायमा – जिल्हा सह मंत्री इचलकरंजी.**



# विश्व हिंदू परिषद - कसबा जिल्हा

दिनांक ३ डिसेंबर २०२४ रोजी विश्व हिंदू परिषद तर्फे बांगलादेशातील हिंदू, बौद्ध, जैन अन्याय अत्याचाराविरुद्ध व इस्कॉन संन्यासी चिन्मय कृष्णदास प्रभू यांना सन्मानपूर्वक बांगलादेशातील सरकार यांनी यांना समान पूरक सोडावे व तेथील स्थानिक हिंदूंच्या हत्या रोखावे या बांगलादेशी घटनांविरुद्ध लष्कर प्रखंड, संत नामदेव महाराज चौक लष्कर येथे जन आक्रोश आंदोलन करण्यात आले या आंदोलनात इस्कॉनचे श्री कृष्ण प्रभुजी श्री. विपुल चौधरी प्रभू व इतर इस्कॉनच्या महिला भक्तगणांनी सहभाग घेतला यावेळेस इस्कॉन प्रचारक श्रीकृष्ण प्रभुजी यांनी बांगलादेशातील आंदोलन शांत व्हावे याविषयी व्याख्यान केले श्री संतोषजी आंघोळकर यांनी ३ डिसेंबर १९७२ च्या आठवणी उजाळा देत बांगलादेला भारताने कसे स्वतंत्र्य मिळवून दिले व इस्कॉन मंदिरातील व्यक्त करणे बांगलादेशच्या पडत्या काळात अन्नछत्र शाळा सेवा कशाप्रकारे केली याची आठवण करून देत असता तेथील स्थानिक मुसलमानांनी व जमाती या संघटनेने हिंदूंवरती अत्याचार लवकरात लवकर थांबवा असे प्रधान करत बांगलादेशाविरुद्ध विषयी मांडला श्री विजय कांबळे भाग मंत्री यांनी बंगलादेशातील मूल्यांनी हिंदूंच्या हत्या थांबवे भारताने केलेले उपकार विसरून जाऊ नये अन्यथा गरज पडेल तेव्हा बजरंग दल या मोठ्या संख्येने सहभाग करून बांगलादेश ला जाऊ तेथील आम्ही अत्याचार थांबू असे संबोधले

सदर आंदोलन श्री. किशोरजी चव्हाण प्रांत मंत्री व श्री श्रीकांत जी चिल्लर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेआंदोलना मध्ये श्री धनंजय जी गायकवाड पुणे पूर्व विभाग मंत्री, व श्री संतोषजी अनुभोळकर सहमंत्री पूर्वी विभाग मनीषाताई शिंदे मातृ शक्ती प्रमुख हिंदू प्रबोधिनीचे युवा कार्यकर्ते श्री लोकेश जी कोंढरे , हिंदू तरुण मंडळाचे दीपक कुराडे, अतिश कुराडे, कुणाल करवते सकल अनुसूचित जनजाती संघाचे श्री प्रकाश जगधने श्री संदीप शेंडगे सिंधू महासभेचे डॉक्टर धर्मा अनिल ललवाणी लच्छु शेठ, व इतर सिंधी समाजाचे कार्यकर्ते श्री सुमित वर्मा जैन समाजाचे सुभाष ओसवाल भूपेंद्र ओसवाल व योगेश्वर वर्मा संघाचे वस्ती प्रमुख श्री रोकडे जी पुरुषोत्तम पिल्ले स्थानिक मंडळ श्री राजू पडियाल यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला होता.

सदर कार्यक्रमाची व्यवस्था स्थापना श्री शैलेश जाधव शैलेश ताटे गोपाळ शिंदे मनोज बनकर श्री विशाल रॉय श्री विक्रम घुंगरू वाले ,महात्मा फुले प्रखंड मंत्री श्रीनिवास कोळी भवानी प्रखंड मंत्री श्री विनोद खुडे श्री शंभू खंडाळे, श्रीराम पाटोळे , प्रकाश पवार, कुणाल खराडे यांनी केली

**विजय कांबळे कसबा जिल्हा भाग मंत्री**





# मंदिरांनी त्यांच्या उत्पन्नातील दहा टक्के भाग सेवाकार्यासाठी वापरावा - अनिल सांबरे

## बजाजनगर मध्ये कै.बालकृष्ण नाईक रुग्णोपयोगी साहित्य केंद्राचा लोकार्पण सोहळा संपन्न संपन्न

मंदिर हे हिंदू समाजाचे शक्ती व सेवा केंद्र असून मंदिरांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या हिंदू समाजातील लोकांसाठी संपूर्ण देशभर रुग्णोपयोगी साहित्य केंद्र वैद्यकीय उपचार केंद्र, अभ्यासिका व वसतिगृह यासारखे विविध प्रकारचे सेवा कार्य उभे राहावेत म्हणून विहिंपचा मंदिर अर्चक पुरोहित आयाम काम करतो. प्रत्येक मंदिराने आपल्या उत्पन्नातील दहा टक्के भाग अशा सामाजिक कार्यासाठी दिल्यास मंदिराचे समाजातील स्थान उंचावण्यास मदत होईल असे प्रतिपादन विहिंप मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे क्षेत्र संपर्कप्रमुख अनिल सांबरे यांनी केले. श्री. अनिलजी सांबरे श्री. साईबाबा मंदिर ट्रस्ट बजाजनगर आणि विहिंप मंदिर अर्चक पुरोहित आयाम संचालित कै.बाळकृष्ण नाईक रुग्णोपयोगी साहित्य सेवा केंद्राच्या लोकार्पण सोहळ्याच्या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध उद्योजक श्री मनोज कदम रास्वसंघाचे वाळूज जिल्हा संघचालक श्री अनिल पाटील श्री साईबाबा ट्रस्ट चे सचिव साहेबराव पाथ्रीकर मंदिर आर्चक पुरोहित आयाम प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार विभाग संपर्क प्रमुख योगेश पाठक उपस्थित होते.

रविवार ८ डिसेंबर २०२४ सायंकाळी ५ वाजता श्री साईबाबा मंदिर ट्रस्ट बजाज नगरच्या प्रांगणात संपन्न झालेल्या कार्यक्रमात श्री. सांबरे म्हणाले भारत हा मंदिरांचा देश आहे जगात सर्वात अधिक मंदिरे भारतात आहेत. मंदिरांनी त्यांच्याकडे असलेल्या जागेचा उपयोग करून विविध प्रकारची सेवाकार्य सुरू केल्यास समाजही अशा कामासाठी त्यांना मोठ्या प्रमाणात देणगी देऊ शकतो. यासाठी मंदिरांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन आणि कै. बालकृष्ण नाईक रुग्णोपयोगी साहित्य केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. विहिंप मंदिर आयामाचे प्रांत संपर्क प्रमुख राजीव जहागिरदार यांनी प्रास्ताविक केले. श्री. जहागिरदार यांनी प्रास्ताविकात देवगिरी प्रांतात चाललेल्या मंदिर अर्चक पुरोहित आयामाच्या कामाची माहिती दिली आणि श्री साईबाबा मंदिर ट्रस्टने सेवा कार्य सुरू करण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराबाबत विश्वस्तांचे अभिनंदन केले आणि या साहित्य सेवा केंद्रातून गरजू रुग्णांना अत्यंत अल्प दरात व्हीलचेअर, वॉकर, कुबड्या, फोम गादी, वॉकिंग स्टिक सलाईन स्टॅन्ड, नेब्युलायझर, कमोड चेअर, फॉलोअर बेड ,ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर व युरीन पॉट इत्यादी प्राप्त होईल असे सांगितले. प्रमुख अतिथी प्रसिद्ध उद्योजक श्री.मनोज कदम मनोगत व्यक्त करताना म्हणाले कै. बाळकृष्ण नाईक हे उच्च शिक्षित सुवर्णपदक विजेते होते असे असतानाही त्यांनी नोकरी लग्न न करता आपले संपूर्ण आयुष्य देश सेवेसाठी दिले आणि त्यांच्या नावाने हे सेवाकार्य आपण सुरू करतोय हे पाहून मला खूप आनंद झाला या माध्यमातून अडचणीत असलेल्या रुग्णांना भरपूर मदत होणार आहे. या रुग्णोपयोगी साहित्य केंद्राचा अधिकाधिक प्रचार करावा असे त्यांनी आवाहन केले आणि या साहित्य केंद्रासाठी कोणत्याही गोष्टीची आवश्यकता असल्यास मी आपल्या सोबत आहे असे आश्वासन त्यांनी दिले. याशिवाय राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वाळूज जिल्हा संघचालक अनिल पाटील श्री साईबाबा मंदिर ट्रस्ट सचिव साहेबराव पाथरीकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कै. बालकृष्ण नाईक यांची पुतणी मेधा नाईक यांनी बाळकृष्ण नाईक यांच्या कार्याविषयी उपस्थितांना माहिती दिली या माहितीनंतर नाईक कुटुंबियांच्या सामाजिक कार्यातल्या योगदानाबद्दल श्रीमती विद्याताई नाईक यांचा सत्कार करण्यात आला. लोकार्पण सोहळ्याचे सूत्रसंचालन कविता जगदाळे तर आभार प्रदर्शन मंदिर आयामाचे वाळूज प्रखंड सहप्रमुख संजीव जी तायडे यांनी केले. महर्षी पाणिनी कन्या वेदपाठ शाळेतील मुलींनी म्हटलेल्या शांती पाठानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

या लोकार्पण सोहळ्यासाठी संपूर्ण नाईक कुटुंबीय, लक्ष्मण माने दामोदरजी घुगे,कैलास चव्हाण रामकृष्ण चव्हाण,ज्ञानेश्वर लबडे देवानंद पवार, शहाजी जगदाळे सह बजाजनगर परिसरातून आणि संभाजीनगर शहरातून मोठ्या संख्येत नागरिक बंधू-भगिनी उपस्थित होते.

# मंदिर आणि हिंदू धर्म यावर ललित कथा स्पर्धा

महाराष्ट्र व गोवा राज्यातील ललित कथा लेखकांसाठी एका कथा स्पर्धेचे आयोजन मंदिर एवं अर्चक पुरोहित संपर्क आयाम, विश्व हिंदू परिषद आणि नचिकेत प्रकाशन यांनी मिळून केले आहे. पहिल्या तीन सर्वोत्तम कथांना पुरस्कार दिले जातील. अनुक्रमे १०००, ७५० आणि ५०० रू चे हे पुरस्कार राहतील. स्पर्धेत निवडलेल्या कथांचे एक ईबुक प्रसिद्ध केले जाईल जे गुगल प्ले स्टोअर वर सर्वांना निःशुल्क उपलब्ध राहील. लेखकांनी आपल्या कथा १५ जानेवारी पर्यंत पाठवाव्यात. १५ फेब्रुवारी अखेर स्पर्धेचा निकाल जाहीर केला जाईल. आणि १५ मार्चपर्यंत त्याचे ई-बुक प्रसिद्ध होईल.

**कथेसाठी विषय – खालीलपैकी एका विषयावर असावी.**

१. लव्ह जिहाद/युवतींमध्ये धर्मनिष्ठा जागरण
२. धर्मांतरण/घर वापसी
३. लोकसंख्या असंतुलन
४. मंदिर विध्वंस/मंदिर जीर्णोद्धार
५. मंदिर केंद्रित जीवन/समाज/अर्थव्यवस्था

**स्पर्धेचे नियम**

१) कथा मराठीत असावी.
२) कथा हस्तलिखित स्वरूपात किंवा कथा लिखाणाचा फोटो काढून पाठवू नये. तिचा स्वीकार होणार नाही .
३) लिखाण वर्ड फाईल मध्ये युनिकोड मध्ये किंवा व्हाट्सअप वर जसं लिहितो तसं युनिकोड मॅटर असावे.
४) कथा दिलेल्या विषयांपैकी एका विषयाला धरून असावी.
५) कथा पूर्वप्रकाशित नसावी.
६) शब्द मर्यादा १००० ते ३००० शब्द.
७) कथा स्वलिखित असावी.
८) कथेसोबत ही कथा मी स्वतः लिहिलेली आहे असे प्रकटन हवे.
९) सोबत आपला फोटो पूर्ण पत्ता आणि संक्षिप्त परिचय असावा.
१०) कथेचे कोणतेही मानधन दिले जाणार नाही.
११) कथा ई बुक स्वरूपात प्रसिद्ध करण्याचे अधिकार नचिकेत प्रकाशनाला द्यावे लागतील. तसे लेखी कळवावे लागेल.
१२) स्पर्धेतील सहभाग सर्व वयोगटासाठी खुला व निःशुल्क आहे
१३) कथा शक्यतो ई-मेल ने पाठवावी.
१४) संपादक मंडळाचा निर्णय अंतिम राहील.
१५) कथा आपण ज्या प्रांतात राहतो त्या प्रांताच्या प्रतिनिधींकडे ई-मेलवर पाठवावी आणि काही प्रश्न असल्यास त्यांच्याशी संपर्क करावा.

**संयोजन व संपादक मंडळ समन्वयक**

१) विनायक देव – vinayak.deo2007gmail.com, ९८९२३५८१४४
२) मुंबई कोकण प्रांत – वसुंधरा घाणेकर, ८८७९९७८९८० ghanekarvasundhararediffmail.com,
३) देवगिरी प्रांत – डॉक्टर सुभाष महाले, ९४२२६१८२२१
४) विदर्भ प्रांत – डॉक्टर रत्नप्रभा अंजनगावकर ratnaprabhaa09gmail.com, ७३०४२१२१४१
५) पश्चिम महाराष्ट्र प्रांत – वंदना अत्रे vratregmail.com, ९९६०८००२५८
६) गोवा – गंगाराम म्हांबरे mhambre55gmail.com, ८३९०९१७०४४



विश्व हिंदू परिषद द्वारा वर्ष में एक बार धर्म रक्षा निधि हेतु समाज से सम्पर्क कर धन संग्रह का कार्य करती है क्योंकि किसी भी संगठन को संचालित करने में धन बहुत ही महत्वपूर्ण होता है यही धर्म रक्षा निधि विश्व हिंदू परिषद द्वारा किये जा रहे सेवा के कार्य के साथ जिन्होंने संगठन के लिए घर बार छोड़कर देश धर्म समाज के लिए काम करने का व्रत लेकर पूर्णकालिक कार्यकर्ता के रूप में कार्य करते है उन्हें भी इसी से अल्प व्यय के रूप में दिया जाता है!

श्याम बाबू ने आज टाण्डा नगर में भ्रमण कर लोगो से प्रत्येक वर्षों की भांति इस वर्ष भी इश्मे बढ़चढ़ कर हिस्सा लेने की अपील कर उनसे रसीद के द्वारा संग्रह किया! और कहा कि जब जब धर्म, समाज पर कोई विधर्मी कुठाराघात करेगा संगठन के कार्यकर्ता उससे दो दो हाथ करने के लिए हमेशा आगे आते रहेंगे और देश मे जब जब बिपदा आती है तो ढाल बनकर जान पर खेलकर समाज की उम्मीदों पर खरा उतरते है ऐसे में समाज को इस मुहिम में अपना अमूल्य योगदान देना चाहिए!

आलोक चौरसिया, श्रीप्रकाश सिंह, दसरथ, जयपाल मौर्य, छोटू बारी, श्रीकृष्णा, शरद सोनी आदि आदि कार्यकर्ता समाज से सम्पर्क कर उनसे धर्म रक्षा निधि अर्पण करवाने का काम कर रहे है।



## बांगलादेशबाबत मानवाधिकारवाले गप्प का?

ऑगस्ट महिन्यामध्ये बांगलादेशात इस्लामी कट्टरवाद्यांनी कटकारस्थाने करून शेख हसीना यांचे सरकार उलथवून टाकले. इस्लामी मूलतत्त्ववादी मोहमद युनूस यांच्या खुनी गटाने एकत्र येऊन तेथील सत्ता हस्तगत केली आहे. युनूस यांचे हंगामी सरकार स्थापन होताच शेख हसीना यांच्या निवासस्थानावर हल्ला केला. तसेच ढाका शहर सरकार पुरस्कृत हिंदू हिंसाचाराचे केंद्र ठरले आहे. इस्लामी मूलतत्ववादी गटाने एकत्र येऊन तेथील हिंदू समाजाला तसेच तेथील हिंदू मठ मंदिरे, हिंदू प्रतिष्ठानास लक्ष्य करून हिंसा व रक्तपात सुरू केला आहे. गेल्या दोन तीन महिन्यापासून बांगलादेश निपराध हिंदुंच्या रक्ताने माखला आहे. रंगल्या जात असून हिंदू समाज तेथे सरकार पुरस्कृत दहशतीच्या छायेत सतत नरक यातना भोगत आहेत ज्या इस्कॉन मंदिर व्यवस्थापनाने बांगला देशात मानवी मूल्य जपून त्यांची सेवा केली त्याच बांगलादेशात इस्लामी कट्टरवाद्यांनी इस्कॉन मंदिराला सुद्धा लक्ष्य केले आहे.

शोधून शोधून हिंदुंची दुकाने लुटली जात आहे सोबतच स्वामी चिन्मय कृष्णदास यांच्या सह निपराध हिंदुंना तुरुंगात टाकून सरकार पुरस्कृत मारहाण सुध्दा होत आहे. पत्रकारांना सुध्दा प्रचंड त्रास देण्यात येत आहे. महिला पत्रकार मुन्नी साहा यांचे प्रकरण ताजे आहे आजही तेथील परिस्थिती अत्यंत बिकट असून हिंसा व रक्तपात सुरूच आहे परंतु युक्रेन–रशिया आणि इस्राईल – गाझा पट्टी मधील ग्राउंड बातम्या प्रसिध्द करणारे पत्रकार तसेच गाझा पट्टी मधील युद्ध व हिंसा यासाठी गळे काढणारे किंवा सेव्ह गाझा बॅनर घेऊन मोर्चे काढणारे मानवधिकारी सेव्ह गाझा म्हणणारी दुटप्पी जमात आता गप्प का आहेत ?

बांगला देशातील हिंदू समाजावर, महिलांवर होत असलेल्या अन्याय अत्याचारबाबत मूग गिळून बसले आहेत की, आता त्यांची दातखीळ बसली आहे? असा प्रश्न सामान्य माणसाला पडला आहे.

बांगला देशातील हिंदू अत्याचाराचा मुद्दा सामान्य माणसात मोठ्या प्रमाणात चर्चिला जात आहे.

जम्मू काश्मीरमध्ये भारतीय सुरक्षा रक्षकावर हल्ले केले जात असत शुक्रवारी सुनियोजित दगडफेक सुध्दा होत असे परंतु सुरक्षा रक्षकांनी स्वसंरक्षणार्थ केलेल्या प्रतिकाराला हिंसेची लेबल लावून किंवा छोट्या छोट्या घटनांची दखल घेऊन मानवाधिकार व पाळीव पत्रकार वळवळ करायचे.मानवाधिकाराची गळचेपी होत आहे अशा बोंबा मारून भारत सरकारची प्रतिमा मलिन करणाऱ्या टोळ्या आता गप्प का आहे? टोळ्या कोठे लपल्या आहेत. असा संतप्त प्रश्न सामान्य माणसात चर्चिला जात आहे.

पत्रकारांनी बांगलादेशात हिंदू समाजावर होत असलेल्या सरकार पुरस्कृत अन्याय, अत्याचार आणि दडपशाहीची दखल घेऊन आपले निष्पक्ष पत्रकारीतेचे कर्तव्य पूर्ण करावे. बांगला देशातील सरकार पुरस्कृत आणि इस्लामी कट्टरपंथीयांकडून हिंदुंचा छळ व नरसंहार जगा समोर आणावा. ओडिसा मधील ग्रहाम स्टेंस–दारासिंग, कंधमाल मध्ये स्वामी लक्ष्मणानंद सरस्वती यांची हत्या झाल्या नंतर तेथे जनक्षोभामुळे उसळलेली दंगली, गुजराथ मधिल साबरमती एक्स्प्रेस कारसेवक यांना जिवंत जाळल्या नंतर गोध्रा दंगल, मणिपूर हिंसाचार या सर्व घटनांमध्ये काही पत्रकार आणि मानवाधिकारी यांनी जागतिक पातळीवर भारताची हिंदू कट्टरवादी अशी प्रतिमा मलिन केली होती. आता बांगलादेशामध्ये मोहम्मद युनूस यांच्या खुनी सरकारकडून मानवी हक्क पायदळी तुडवून होत असलेल्या हिंदू नरसंहार घटनांवर विश्व मानव अधिकार दिना निमित्ताने खऱ्या मानवाधिकाऱ्याची भूमिका घ्यावी.

**अशोक राणे**

**बांगलादेशामध्ये होणाऱ्या हिंदूंवरील अत्याचारा विरोधात सकल हिंदू समाज, सोलापूर. याच्यांकडून मोर्चा तसेच प्रशासनाला दिले निवेदन.**



# एकाच वेळी १७ ठिकाणी रक्तदान

## सिंहगड भाग, पुणे

बजरंग दलाचे सेवा कार्य अतुलनीय आहे. श्री. दिनेशजी उपाध्याय (अ. भा. गोरक्षा प्रमुख) विश्व हिंदू परिषद – बजरंगदल सिंहगड भागाच्या वतीने, सिमेवरील हुतात्मा जवान आणि हुतात्मा कारसेवक कोठारी बंधू, यांच्या स्मरणार्थ भव्य रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात येत असते. यंदाच्या वर्षी, ८ डिसेंबर २०२४ रोजी, एकाच वेळी १७ ठिकाणी रक्तदान केंद्राची उभारणी करण्यात आली होती. या महायज्ञामध्ये एकूण २०५५ एकक रक्त संकलन करण्यात आले. या प्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे अखिल भारतीय गोरक्षा प्रमुख श्री. दिनेशजी उपाध्याय यांनी रक्तदान केंद्रांना सदिच्छा भेट देऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

ते म्हणाले, १९९० साली जेंव्हा रामजन्मभूमी आंदोलन शिगेला पोहोचले असताना, अयोध्येमध्ये कोणीही येऊ शकत नाही अशी दर्पोक्ती तत्कालीन मुख्यमंत्री मुलायम सिंह यादव यांनी केली होती. त्यांना आव्हान देत कारसेवा करणाऱ्या आणि बाबरी ढाच्यावर भगवा ध्वज फडकावणाऱ्या वीर बजरंगी कोठारी बंधूची, मुलायम सिंह सरकारने भर चौकामध्ये निष्ठुर पणे गोळ्या घालून निघृण हत्या केली होती. विश्व हिंदू परिषदेचे पदाधिकारी जेंव्हा, कोठारी बंधूंच्या घरी सांत्वनासाठी गेले होते तेंव्हा, त्यांच्या मातोश्रीनी आपणांस आपल्या मुलांच्या हौतात्माचा गर्व असून, आम्हाला आणखी दोन मुले असती तर ती देखील अशीच बलिदानासाठी अयोध्येत पाठवली असती. असे वीरोचित उदगार काढले होते. अश्या या वीर हुतात्मा कोठारी बंधू यांच्या स्मरणार्थ देशभर रक्तदान शिबीर आयोजित केले जात असते. या रक्तदान शिबिराच्या माध्यमातून, बजरंग दल सेवाकार्यातही अग्रेसरच असते हा संदेश समाजापर्यंत पोहोचला आहे. बजरंग दलाचे एकूणच सेवा कार्य हे अतुलनीयच आहे. या प्रसंगी विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे मंत्री श्री किशोर चव्हाण यांनीही मनोगत व्यक्त केले. किशोर चव्हाण म्हणाले रक्तदान महायज्ञामध्ये सिंहगड भागाच्या कार्यकर्त्यांचे सातत्य हे उल्लेखनीय आहे, गेली ८ वर्षे या शिबिराचे आयोजन भागातर्फे केले जाते. मागील वर्षी १३२३ एकक रक्तसंकलन या शिबिराद्वारे झाले असून यंदाच्या ९ व्या वर्षी एकंदरीत उत्साह पाहता, २००० एकक रक्तदानाचा आकडा नक्कीच पार पडेल अशी माझी खात्री आहे.

या कार्यक्रमास, विश्व हिंदू परिषदेचे, संयुक्त केंद्रीय मंत्री श्री. दादा वेदक, क्षेत्र गोरक्षा प्रमुख श्री. भाऊराव कुदळे, क्षेत्र धार्मिक पुंज प्रमुख श्री. संजय मुरदाळे, विभाग मंत्री केतन घोडके, विभाग सहमंत्री दिनेश लाड, अतुल सराफ, भाग मंत्री साईनाथ कदम, भाग संयोजक राजू कुडले, यांच्यासह स्थानिक लोकप्रतनिधी, नागरिक यांनी मोठ्याप्रमाणात उपस्थिती दर्शवली. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी, सिंहगड भागातील १५० हून अधिक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. राज्यात रक्ततुटवडा असताना येवढ्या मोठ्या प्रमाणात रक्त संकलन केल्यामुळे संघटनेच्या कार्यकर्त्यांचे समाजातील विविध स्तरातून कौतुक होत आहे.

### बजरंग दल, राजगुरुनगर प्रखंड

## स्व. कोठरी बंधू यांच्या पुण्यस्मरणानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन.

राजगुरुनगर : दि. ०९.१२.२४ रोजी आयोजित विश्व हिंदू परिषद बजरंग दलाचे स्वर्गीय कोठारी बंधू यांच्या पुण्यस्मरणानिमित्त राजगुरुनगर येथील सिद्धेश्र्वर मंगल कार्यालय हुतात्मा राजगुरू महाविद्यालय येथे रक्तदानाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात पहिल्याच वर्षी एकूण १५१ रक्तदात्यांनी रेकॉर्ड ब्रेक रक्तदान केले. यावेळी बजरंग दलाचे विभाग संयोजक श्री अविष्कार सावंत, बजरंग दल भीमाशंकर जिल्हा संयोजक श्री गणेश रौंधळ जिल्हा मातृशक्ती संयोजिका सौवैशालीताई लांडगे हे रक्तदान शिबिरास उपस्थित होते. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी राजगुरुनगर शहर प्रखंड अध्यक्ष विरेंद्र भागवत कडुस शाखा अध्यक्ष अनिल (आबा) धायबर राजगुरुनगर शहर प्रखंड मंत्री मयुर सावंत, सहमंत्री नवनाथ पाचारने सहमंत्री सुरेश माळी बजरंग दल संयोजक निखील थिगळे, सह संयोजक आदेश शिंदे, अनुप गाडे, नितीन कोळेकर सुरक्षा प्रमुख प्रतिक जगदाळे सह सुरक्षा प्रमुख आदेश मुळे मातृशक्ती संयोजिका सुरेखा ताई डूबे सहसंयोजिका शालिनी ताई गिलबिले महाविद्यालयीन प्रमुख कु महेश चौधरी दुर्गावाहिनी संयोजिका कु सृष्टी गायकवाड सहसंयोजिका कु पायल जरे कु श्रुती आरूडे बलोपासणा प्रमुख कु सिद्देश लोहोट सह प्रमुख कु ओंकार शिंदे या सर्वांनी कष्ट घेतले.

सर्व रक्तदात्यांस विश्व हिंदू परिषद बजरंग दलाच्या बजरंग दलाच्या वतीने एक आकर्षक भेटवस्तू , त्याच बरोबर वर्षभरात गरज लागल्यास लागल्यास मोफत रक्ताची पिशवी देण्यात येणार आहे. या रक्तदान शिबिरात १५१ पिशव्या रक्ताचे संकलन करण्यात आले आहे. या शिबिरात जिल्हा परिषद सदस्य मा.अतुल भाऊ देशमुख रोटरी क्लब राजगुरुनगर मिलिंद भाऊ आहेर माजी सैनिक व नगरसेवक ग्रा.सदस्य तसेच धारकरी राजगुरुनगर शहरातील व्यापारी सामजिक आर्थिक राजकिय शैक्षणिक सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रांतील प्रमूख मान्यवरांनी रक्तदान शिबिरास भेट दिली..!



## गीता जयंती निमित्त शौर्य सप्ताह, कोल्हापूर

विहिंप (बजरंग दल) तर्फे संपूर्ण भारतात दरवर्षी गीता जयंती निमित्त शौर्य साप्ताह कार्यक्रम साजरे होत असतात. त्यानिमित्ताने कोल्हापूर शहरात रविवार दि.१५/१२/२४ रोजी बजरंग दलाचे मोठ्या उत्साहात संचलन झाले.

सकाळी ११:३० वाजता मिरजकर तिकटी येथे मातृशक्ती माता, भगिनींनी संचलानाचे औक्षण केले, त्यानंतर शिस्तबद्ध संचलनास सुरुवात झाली. बिनखांबी गणेश मंदिर, महाद्वार रोडने श्री राम, श्री हनुमंत, भारत मातेच्या घोषणा देत, बजरंग दल म्हणजे सकल हिंदू समाजाला एक सुरक्षा कवच असल्याची ग्वाही देत हे संचलन पोलीस फौज फाट्याच्या सुरक्षेसह महाद्वार रोड मार्गे छत्रपती शिवाजी महाराजानां मानवंदना देऊन दसरा चौक येथे आले, राजर्षी शाहू महाराज यांचे चरणी पुष्पहार अर्पण करून अतिशय शिस्तबद्ध व शांततेत संचलन करून समारोप करण्यात आला. ठिकठिकाणी संचलनाचे स्वागत होऊन औक्षण करण्यात आले, शहरातील बजरंगीसह जिल्ह्यातील राधानगरी, गगनबावडा, पन्हाळा, करवीर, भुदरगड तालुक्यातूनही बजरंगी कार्यकर्त्यांनी यात सहभाग घेतला होता. प्रमुख उपस्थिती : विहिंप कोल्हापूरचे जिल्हामंत्री, श्री अनिल दिंडे. जिल्हा अध्यक्ष कुंदन पाटील. विभाग संयोजक सुरेश रोकडे. जेष्ठ कार्यकर्ते दिलीपजी भिवटे, जिल्हा सहमंत्री विजय पाटील शहर मंत्री उत्तम सांड्डगडे, बजरंग दल प्रखंड संयोजक निलेश शिंदे, अक्षय ओतारी, प्रदीप सूर्यवंशी, स्वप्नील कोडग, तसेच मातृशक्ती संयोजीका सौ. अश्विनीताई ढेरे, मनीषाताई रोकडे, रर्वी.पूजा ताई जोशी, वंदनाताई बम्बलवाड, यांचेसह शहरातील, लक्षचि पदाधिकारी सह सकल हिंदू संघटना प्रमुखांची उपस्थिती होती, हिंदू एकताचे गजानन तोडकर, दिपक देसाई, तसेच श्री अनिरुद्ध कोल्हापुरे, शिवसेनेचे बाबा भोसले, सनातनचे किरण दुसे, अभिजित पाटील, शिवप्रतिष्ठानचे आशिष लोखंडे, हिंदू महासभेचे मनोहर सोरप, तसेच मराठा बहुउद्देशीय उद्योग संस्थेचे प्रसन्न शिंदे, निरंजन शिंदे सह विविध संगठन प्रमुखांची उपस्थिती लक्षनीय होती.



## रक्तदान - कासारवाडी

विश्व हिंदू परिषद– बजरंग दल आयोजित कै. कोठारी बंधू यांच्या स्मरणार्थ कासारवाडी प्रखंडा मध्ये भावायर रक्तदान शिबीर आज पार पडले, या शिबिरात पुरुषासोबत महिलांनी देखील उस्फुर्त पणे रक्तदान केले आहे. एकूण ६५ लोकांनी शिबिरात रक्तदान केले. सर्वं रक्तदात्यांचे विश्व हिंदू परिषद– बजरंग तर्फे मनःपूर्वक आभार.

आपला नम्र,

वि. ही. परिषद–बजरंग दल कासारवाडी प्रखंड.



बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

## नेवाशात मूक मोर्चा, तहसीलदारांना निवेदन

### बांगलादेशातील घटनेचा निषेध : संत-महंतांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

नेवासा : बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ मंगळवारी नेवासा येथे सकल हिंदू समाजाच्या वतीने मूक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये विविध देवस्थान, आश्रम, मठातील संत-महंतांसह महिला भगिनी, हिंदू युवक, हिंदुत्ववादी संघटना सहभागी झाल्या होत्या.

बांगलादेशात हिंदूंवर होणारा अन्याय अत्याचार थांबविण्यासाठी भारत सरकारने ठोस पावले उचलावीत, अन्यथा त्यांची निर्यातबंदी थांबवावी, असे आवाहन याप्रसंगी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांनी केली. शहरातील श्री खोलेश्वर गणपती मंदिर चौकापासून मोर्चास प्रारंभ करण्यात आला.

यावेळी सामूहिक हनुमान चालीसा म्हणण्यात आला. बांगलादेशातील अत्याचाराचा निषेध म्हणून सहभागींनी काळ्या फिती लावून निषेध केला. हा मोर्चा नगर पंचायत चौक, डॉ. हेडगेवार चौक, संभाजी चौक, औदुंबर चौक मार्गे श्रीरामपूर रस्त्यावरून तहसीलदार कार्यालय गेला.

यावेळी तहसीलदार संजय बिरादार व पोलिस निरीक्षक धनंजय जाधव यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी देवगड श्री दत्त मंदिर संस्थानचे उत्तराधिकारी महंत स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज, महंत सुनीलगिरी महाराज, महंत बालयोगी ऋषिनाथ महाराज, महंत रमेशानंदगिरी महाराज, भगवान महाराज जंगले शास्त्री, महंत दीपकनाथ महाराज, ज्ञानेश्वर महाराज, गुरुनानक दरबारचे ग्रंथी किशोर सिंग यांच्यासह सकल हिंदू समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



## बजरंग दल संचलन, पर्वती भाग, पुणे

बजरंग दलातर्फे संपूर्ण भारतात दरवर्षी गीता जयंतीनिमित्त शौर्य सप्ताह कार्यक्रम साजरे होत असतात. त्यानिमित्ताने पर्वती भागात रविवार दि.१५/१२/२४ रोजी बजरंग दलाचे मोठ्या उत्साहात शौर्य संचलन झाले.

संध्याकाळी ५.०० वा. महावीर इंग्लिश मिडीयम स्कूल, गुलटेकडी मैदानावर मातृशक्ती, दुर्गा वाहिनीच्या माता, भगिनींनी संचलानाचे औक्षण केले, त्यानंतर शिस्तबध्द संचलनास सुरुवात झाली. ढोले मळा, डायस प्लॉट मशिद, इंदिरानगर, मीनाताई ठाकरे वसाहत, महर्षी नगर, रामदास मंडळ, वैष्णवी डेअरी, पी.टी कॉलनी गणेश मंदिर ते पुन्हा महावीर इंग्लिश मिडीयम स्कूल मैदान असे हे संचलन पार पडले. भारत मातेच्या घोषणा देत, बजरंग दल म्हणजे सकल हिंदू समाजाला एक सुरक्षा कवच असल्याची ग्वाही देत हे संचलन पोलीस फौज फाट्याच्या सुरक्षेसह शिस्तबद्ध व शांततेत शौर्य संचलनाचा समारोप करण्यात आला, ठिकठिकाणी संचलनाचे स्वागत होऊन औक्षण करण्यात आले जिल्हातील बजरंगीनी यात मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.

संचलनाचा समारोप विहिंपचे प्रांत मंत्री किशोर जी चव्हाण, महावीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजयकांत कोठारी, रा.स्व संघ पर्वती भाग कार्यवाह दर्शन मिरासदार, पश्चिम विभागसह मंत्री. जिल्हा पालक, जिल्हा मंत्री नाना क्षीरसागर हे मंचावर उपस्थित होते. जिल्हा मंत्री नाना क्षीरसागर यांनी प्रास्ताविक केले तर, प्रांत मंत्री किशोर जी चव्हाण यांनी शौर्य संचलन व बजरंग दलाचे कार्याविषयी माहिती देताना बजरंग दलाचे लव्ह जिहाद, गोरक्षण,तसेच बाबरी ढाचा पाडण्यात महत्त्वाची भूमिका सांगितली. ८ ऑक्टोबर १९८४ रोजी स्थापन झालेल्या बजरंग दल आज देशातील युवकांना आदर्श व राष्ट्रप्रेमी बनविण्यात यशस्वी झाले आहे.हिंदू संस्कृतीचे रक्षण व हिंदू संस्कार युवकांमध्ये रुजविण्यात आज बजरंग दल सक्रिय आहे.

संचलनात प्रमुख उपस्थिती जिल्हा सहमंत्री विनायक परेली, विजय टोणपे, बजरंग दल संयोजक महेंद्र सिंग चौहान,सह संयोजक विनायक देसाई, धर्म प्रसार प्रमुख दत्ता पोकळे,सह प्रमुख किरण विरोळे, विधी प्रमुख सचिन खंडागळे, दुर्गा वाहिनी संयोजिका आरतीताई भारती, प्रखंड मंत्री शंकर रसाळ, संयोजक अनिकेत मिसाळ, सह संयोजक सुमित शिंदे, शुभम बलगरे पद्मावती प्रखंड मंत्री देवरत कसबे,संयोजक अनिकेत पांचाळ, सावरकर प्रखंड मंत्री अजय गायकवाड,संयोजक प्रसाद यमजाल,सह संयोजक आप्पा भिसे, बिबवेवाडी प्रखंड मंत्री वैभव नागापुरे,संयोजक ओम मोहळ,सह संयोजक पवन राठोड, तसेच सौ भारतीताई माहूरकर पर्वती जिल्हा मातृशक्ती सौ अंजलीताई  देसाई पर्वती जिल्हा दुर्गा वाहिनी सहसंयोजिका, सौ सुप्रिया ताई मुजुमदार ,पर्वती जिल्हा सत्संग प्रमुख लताताई कुकेमनी पर्वती जिल्हा सह सत्संग प्रमुख सौ सोनाली ताई शिंदे पर्वती प्रखंड दुर्गा वाहिनी संयोजिका,सौ अस्मिता ताई शिंदे पर्वती प्रखंड दुर्गा वाहिनी ,सहसंयोजिका दिपाली ताई मालुसरे पर्वती प्रखंड मातृशक्ती संयोजिका  यांची होती.



बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारांच्या निषेधार्थ विश्व हिंदू परिषद आणि इस्कॉनच्या सदस्यांनी सोमवारी मुंबईत निदर्शने केली. बांगलादेशच्या उपउच्चायुक्तांची भेट घेत निवेदनही देण्यात आले.

### 'बांगलादेशातील हिंदूंना वाचवा'

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

बांगलादेशात हिंदूंवरील अत्याचाराच्या निषेधात मुंबईतील विविध संघटनांनी सोमवारी मुंबईतील बांगलादेशच्या उपउच्चायुक्तांची भेट घेऊन हिंदूच्या सुरक्षेची मागणी केली. यात 'जाग्रतो बांगला' आणि इतर संघटनांच्या माध्यमातून हे निवेदन देण्यात आले आहे.

श्री सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टचे कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी म्हणाले, 'बांगलादेशात जिहादींना मोकळे असताना, अल्पसंख्याकांच्या संतांना विनाकारण अटक केली जात आहे. हिंदू धर्मगुरुंना सोडण्याची आणि मंदिरे आणि धार्मिक स्थळांच्या संरक्षणासाठी सुरक्षा प्रदान करण्याची मागणी आम्ही बांगलादेशच्या सरकारकडे करीत आहोत.'

# श्री क्षेत्र प्रयागराज महाकुंभमेळा

## ‘सामाजिक समरसता व सामाजिक अभिसरणाचे समन्वय महापर्व स्वरूप – महाकुंभमेळा’

२०२५ च्या प्रारंभात श्री प्रयाग क्षेत्रात परंपरेनुसार ‘महाकुंभमेळा’ व पर्वस्नानांचे विशेष स्वरूपाचे आयोजन होत आहे. देश परदेशातून या तीन शाही स्नानांच्या निमित्याने साधारणतः ५० कोटींहून अधिक हिंदू धर्मावलंबी, विविध पंथ–संप्रदाय–परंपरांचे अनुसरण करणारे भाविक या निमित्ताने एकत्रित येणार आहेत.

धार्मिक–वैचारिक–शैक्षणिक–सामाजिक–आर्थिक–राजकीय–प्रशासकीय व्यापार विशेष इ. सर्वच क्षेत्रातील अनेक उलाढालींचा हा महाकुंभमेळा !

हा सुव्यवस्थितरुपाने संपन्न व्हावा , यासाठी सर्वच क्षेत्रातील जबाबदार घटक, अधिकारी वर्ग विशेष रुपाने प्रयत्नशील आहेत. साधारणतः ४०० कि.मी. परिसरात विस्तारलेल्या या कुंभग्रामाचे रस्ता आखणी, पाणी व विद्युत व्यवस्था , धान्य व इंधन पुरवठा, शौचालये , स्नानगृहे , सांडपाणी व्यवस्थापन , निवारा व निवास व्यवस्था, यातायात, आपत्कालीन व्यवस्था इ. युद्धपातळीवर केल्या जात आहेत.

भारत व भारताबाहेरून हिंदू धर्मांतर्गत असणार्या १५० हून अधिक संप्रदाय परंपरा व तितक्याच नवसंप्रदाय परंपरेचें श्रद्धाळु – पाईक यात सक्रिय सहभाग घेत असतात.

नाना प्रकारचे लोक, भिन्न भिन्न भाषा–वेष– खानपानादि व्यवहार, अनेक प्रकारच्या स्वभावाचे, आवडीनिवडीचे, विविध प्रकारच्या उद्देश्याने ह्या महाकुंभमेळा पर्वात सम्मिलित होत असतात.

संपूर्ण भारताचे, ‘माँ भारती’ चे हे ‘विराट स्वरुप’ दर्शन आहे. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला एकदाच आपले विराट स्वरुप दर्शन घडवले. परंतु भारताच्या सनातन–हिंदू धर्म परंपरेने हे विराट पुरुषाचे दर्शन घडविण्यासाठी प्रति तीन वर्षांनी श्रीक्षेत्र हरिद्वार–श्रीप्रयागराज–श्रीक्षेत्र उज्जैन, श्री त्र्यंबकेश्वर–नाशिक या चार ठिकाणी या विराट महाकुंभमेळ्याच्या माध्यमातून ही व्यवस्था कायमस्वरूपी केली.

आमच्या क्रांतदर्शी ऋषी, मुनी, संतांची ही अखंड हिंदुस्थानाच्या एकात्मतेची असणारी ही आध्यात्मिक सामाजिक दृष्टी आहे.

परंपरागत लोकवाङ्मय, संतवाङ्मय, इतिहास, पुराणग्रंथ यांच्या माध्यमातून हा ‘वसुधैव कुटुंबकम्।’ चा समन्वय विचार प्रत्यक्षात अनुभवण्याचे एक विशाल व्यासपीठ यातून सर्वांसाठी, सर्वसहभागातून महाकुंभपर्वाच्या निमित्ताने निर्माण केले गेले.

स्थानिकांना रोजगार निर्मिती, तीर्थक्षेत्र विकासाला वेग, आर्थिक उलाढालीतून अर्थव्यवस्थेला दिली जाणारी चालना, विविध संप्रदायिकांचा होणारा सत्समागम, विद्वानांची–संतांची होणारी ङ्कदेव, देश, धर्म, संस्कार, संस्कृतीफइ. संबंधाने होणारी चिंतने, संमेलने! त्यातून होणारा सर्वांचा समावेश व सर्वांना समान अधिकार असे व्यापक समरसतेचे दर्शन या महाकुंभाच्या निमित्ताने होते.

समुद्रमंथनाच्या प्रसंगातून पुराणांनी याचे महत्त्व प्रकट केले आहे. देवासुर संग्रामाच्या प्रसंगात भागवत कथेच्या माध्यमातून ही कथा समोर येते. देवांचा राजा इंद्राकडून ऋषी दुर्वासांचा अवमान घडतो.

संत, साधु, महात्मे, ज्ञानी, श्रीगुरु यांना पद–पैसे याची अपेक्षा नसते, परंतु सन्मानाची असते. सत्ता व संपत्तीच्या अभिमानामुळे मदोन्मत्त इंद्राने आपला अपमान केला हे जाणून ऋषी दुर्वासांनी शाप दिला. त्यातून पुढे देवासुर संग्राम घडला. या प्रसंगाचे वर्णन करतांना पुराणकथा सांगितली जाते.

ऋषी दुर्वास व देवराज इंद्राच्या भेटीच्या वेळी ऋषीश्वर दुर्वासांनी प्रत्यक्ष वैकुंठाधिपती श्रीविष्णुंनी त्यांना दिलेली प्रसाद पुष्पमाला देवेंद्राला दिली. इंद्राने ती ऐरावताच्या मस्तकावर ठेवली. ही खाण्याची वस्तू नाही, म्हणून ऐरावताने ती त्याच्या पायाखाली

चुरगाळली. फुलांमध्ये श्रीलक्ष्मीचा निवास असतो. इंद्राने हे सर्व पाहूनही प्रतिबंध केला नाही. हे पाहून या इंद्राला संपत्ती व सत्तेचा अभिमान झाला आहे हे जाणून, सर्व स्वर्गीय संपत्ती समुद्रात पडेल असा शाप ऋषी दुर्वासांनी दिला. संपत्ती व सत्ता गेल्यावर शहाणपण येते. तसे झाले.

स्वर्गातील संपत्ती १४ रत्नांसह समुद्रात पडली. त्यावेळी विरोचन पुत्र बली हा दैत्यांचा राजा होता. त्याने स्वर्गावर आक्रमण केले. देवराज इंद्र राज्य–लक्ष्मीभ्रष्ट झाला. बलीला स्वर्गाचेही राज्य मिळाले. देवमाता आदिती व देवता दुःखी झाले. देवर्षी नारदांनी या सर्वांना दैत्यांशी मित्रत्व करायचा सल्ला दिला. समुद्र मंथन केल्यावरच अमृतासह चौदा रत्न प्राप्त होतील असेही सांगितले. पूर्ववैभवासाठी प्रसंगी शत्रूबरोबर ही मित्रत्व करावे, हे सांगितले.

त्याचबरोबर देवर्षी नारदांनी राजा बलीला स्वर्गीय अमृताशिवाय, चौदा रत्नांनी युक्त असणार्या संपदेशिवाय, हे स्वर्गीय राज्य निरर्थक आहे. असे सांगितले. त्यासाठी राजा बलीने देवांना सोबत घेवुन, दैत्य व देवांनी मिळून समुद्र मंथन केले पाहिजे, असा सल्लाही दिला. नागराज वासुकीची दोरी, मेरु पर्वताची रवी करुन देवदैत्यांनी समुद्र मंथन सुरु केले त्यातून विष व अमृतासह चौदा रत्ने प्रकट झाली. या प्रसंगात विष्णूंना ‘अजित’ अर्थात कुर्मरुप, ‘मोहिनी’ रुप व ‘धन्वंतरी’ या अवताराने प्रकट व्हावे लागले.

सर्पमाता कद्रुच्या वचनातून आपली आई विनुता हिला सोडविण्यासाठी पक्षीराज गरुडाने हा दिव्य ङ्गअमृतकुंभफपळविला. तो नेत असताना त्यातील चार थेंब सांडले. काही जमिनीवर, दर्भावर पडले ते सर्पांनी चाटले. ते द्विजीव्ह झाले. अमृतकुंभातून सांडलेले हे चार थेंब जिथे पडले ती, १. हरिद्वार क्षेत्र–ब्रह्मकुंड, २. प्रयागराज–त्रिवेणीसंगम , ३. उज्जैन– क्षिप्रानदी ,४. नाशिक–त्र्यंबकेश्वर क्षेत्रात गोदावरीत चक्रतीर्थ ही होत. पुढे शैव–वैष्णव संप्रदायाच्या वादातून तत्कालीन पेशव्यांनी दिलेल्या निर्णयानुसार त्र्यंबकेश्वरी कुशावर्त व नासिकला श्री रामकुंड तीर्थ येथे कुंभपर्व शाही स्नानाची व्यवस्था झाली.

श्रीक्षेत्र प्रयागराज मध्ये गंगा–यमुना व गुप्तसरस्वतीच्या त्रिवेणीसंगमात महाकुंभ स्नान होते. प्रयागक्षेत्राचा माघ महिन्यातील माघी मेळाही प्रसिद्ध आहे. या कालावधीत अर्थात उत्तर भारतातील माघमास व आपला पौष वद्य प्रतिपदा ते माघी पौर्णिमा हा तो कालावधी. जो ‘कल्पवासा’चा ही पर्वकाळ मानला जातो. या महिनाभरात जवळजवळ दोन कोटीहून अधिक लोक येतात. तर साधारणतः दोन ते तीन लाख संत व भाविक महिनाभर येथे असतात.

महाकुंभ पर्वकाळाच्या या दीड महिन्यांच्या कालावधीत होणार्या शाही पर्वस्नानास, यंदा पन्नास कोटी भाविक येतील असा पूर्वांदाज आहे. २५ ते ३० लाख साधुसंत येथे उपस्थित राहतील.

पूजा, अनुष्ठान, विविध यज्ञांचे आयोजन, धर्मसंसद, धर्म व संतसंमेलने, रामकथा, शिवपुराण, श्रीमद्भागवतकथा यांचे आयोजन, धार्मिक कर्मकांड, अन्न–वस्त्रांचे दान, भंडारा–महाप्रसाद, रामलीला–रासलिला यांचे, विविध संतांच्या मंडपात, खालशांमध्ये, आखाड्यांतून आयोजन होते.

या ठिकाणी ‘जाती–पाती पुछे न कोई। हरिको भजे सो हरिका होई।।’ असे सर्व समभावाचे दर्शन होते.

साधुंचे गोत्र एकच ‘अच्युत’ गोत्र. अखंड नामधून, रामधून, रामचरितमानस पाठ, भजने यांचा केवळ गदारोळ सर्वत्र असतो. स्वतःला विसरायला लावणारे असे हे वातावरण असते.

श्रीमद् जगद्गुरु आद्य श्रीशंकराचार्यांनी दशनाम नागा संन्यासी परंपरेची स्थापना व व्यवस्था केली. चारही दिशांना शंकराचार्य पीठांची स्थापना करुन, धर्मप्रचार व रक्षणासाठी या दशनाम नागा संन्यासींना त्या त्या पीठांशी अनुबंधित केले. पुढे त्यातूनच, श्री जुना आखाडा, श्री आवाहन आखाडा, श्री अटल आखाडा, श्री अग्नि आखाडा, श्री निरंजनी आखाडा, श्री आनंद आखाडा, श्रीमहानिर्वाणी आखाडा व नंतर नया उदासीन आखाडा, बडा उदासीन आखाडा, निर्मल आखाडा असे एकूण १० संन्यासी अखाडे आहेत. १०–१२ वर्षांपूर्वी किन्नर आखाडाही यात संलग्न केला गेला.

या आखाडा परंपरेत ‘नाथ आखाडा’ नाथ पंथियांचा स्वतंत्र असतो. बैरागी परंपरेत १. श्री दिगंबर आखाडा, २. श्री निर्वाणी आखाडा, ३. श्री. निर्मोही आखाडा असे तीन प्रमुख आखाडे आहेत. यातही बाराभाई डांडिया, खाकी, तेरह भाई त्यागी, भक्तमाली, इ. अनेक आखाडे आहेत. परंतु हे सर्व वैष्णव परंपरेचे अखाडे आहेत. ही नागा बैरागी साधुंची परंपरागत व्यवस्था श्री रामानंदजी व श्री बालानंदजी यांनी केली ,त्या व्यवस्थेतून चालतात.

‘श्री’ संप्रदायात अर्थातच श्री रामानंद व श्री रामानुज संप्रदायाचे साधु येतात. ‘विष्णुस्वामी’ संप्रदायात, श्रीवल्लभाचार्य व वारकरी तसेच बैरागी साधु येतात.

‘मध्व’ संप्रदायात श्री मध्वाचार्य व गौडीय चैतन्यमहाप्रभु परिवारातील साधु तर ‘निम्बार्क’ संप्रदाय परंपरेत निम्बाकाचार्य परंपरेतील विरक्त साधु असतात.

या चारही संप्रदायाचा मिळून ‘चतुःसंप्रदाय आखाडा’ जो या चारही संप्रदाय व तीनही आखाड्यांत काही विवाद निर्माण झाले तर ते सोडवतो. याला साधूंचे (बैरागी) हायकोर्टही म्हणतात.

‘महंत’ हा त्याच्या स्थानाचा व खालशाचाही प्रमुख असतो. त्याच्या आश्रमात व कुंभात येणाऱ्या भाविकांची व्यवस्था राखणे, संतांना निवास, भोजन, वाटखर्ची दक्षिणा देणे ही जबाबदारी त्यांच्यावर असते. यातील काहींना जमिनींचे, शेतींचे उत्पन्न, मंदिरात भक्तांद्वारे येणारे उत्पन्न तर काही आकाश किंवा भिक्षा वृत्तीने स्थानाचा निर्वाह करतात. आचार्य महमंडलेश्वर, महामंडलेश्वर, मंडलेश्वर, श्रीमहंत, कोठारी, भंडारी, या सर्व जबाबदाऱ्याआहेत.

मंडलाचे महंत हे अर्थात त्या जिल्हा, विभाग, क्षेत्राचे प्रमुख असतात. विवाद निर्माण झाल्यास हे सर्व आपआपसात एकत्र येवून मिटवतात.

संन्यासी परंपरेतही अशीच व्यवस्था थोड्याफार फरकाने असते. प्रत्येक आखाड्याची स्वतंत्र देवता आहे. भगवान दत्तात्रेय, कार्तिकस्वामी, श्रीगणेश, श्रीसुर्य नारायण, श्री कपिलभगवान, श्रीचंद्र भगवान, इ. देवतांना पालखीत बसवून त्या तीर्थस्थानी हे नागासाधू निशाणांसह स्नानास नेतात. देवतांचे व तीर्थाचे पुजन करुन मग पुरोहित, प्रमुख संतासोबत देवाला स्नान घालतात. मग इतर साधू व भाविक स्नान करतात. यासाठी सर्व लवाजम्यासह मिरवणुकीने जातात. यालाच ‘शाही’ असे म्हणतात.

वैष्णव बैरागी आखाडेही शस्त्र–अस्त्र, ध्वज, पताकांसह, निशाणदेवता घेवून शाही स्नानाला जातात. ध्वजस्थित हनुमानजींचे व त्या त्या संप्रदायांचे जगद्गुरुंनी व प्रमुख संतांनी स्नान केल्यावर अन्य साधु व इतर नागरिक स्नान करतात. यातही प्रत्येकाचा स्नान क्रम असतो. कोणीही मर्यादा ओलांडित नाहीत, हे विशेष आहे.

याच संन्यासी व बैरागी संतांनी धर्मरक्षणासाठी व श्रीरामजन्मभूमी मंदिर संघर्षात लाखोंच्या संख्येने संघर्ष करून आत्मबलिदान दिले. धर्म, देव व देश रक्षणाबरोबर स्वतःची उपासना, आचारशुद्धता, अभ्यास व अनुभूती, त्याग, समर्पण, समाजसेवा, गोसेवा, विद्यार्थी शिक्षण, वेदविद्यालय, अर्चक पुरोहितांना आश्रय, व सेवा– संस्कार–संस्कृत भाषा व संस्कृतीचा सांभाळ या साधुसंतांनी अव्याहतपणे व शुद्ध परंपरेने, शास्त्रानुसार चालविलेला आहे.


या सर्वांचे व्यापक दर्शन आपणास या महाकुंभातून होते. या सर्वात कोणीही, कुठेही कुणाची जात, वर्ण, लिंग, कुल, देश याचा विचार करीत नाहीत. ङ्गवसुधैव कुटुंबकम्फ चे व्यापक व सम्यक दर्शन यातूनच घडते.

सामाजिक समरसता व सामाजिक अभिसरण प्रक्रियेचे व राष्ट्रोत्थनासाठीचे हे भव्य दिव्य आयोजन म्हणजेच हा साधू–संत–माहात्मे व भक्तांसह सामान्यांचा ङ्गमहाकुंभ मेळाफ होय.

**माधवदासमहाराज राठी, नाशिक.**

**धर्माचार्य संपर्क प्रमुख, विहिंप, पश्चिम महाराष्ट्र प्रांत.**

◈ ◈ ◈



# मकरसंक्रांत
# खगोलीय महत्त्व सांगणारा एक हिंदू सण

आपल्या भारत देशात साजरे केले जाणारे सण उत्सव ह्यांचे कायम आध्यात्मिक आणि पुराणकालीन महत्त्व अधोरेखित केले आहे. परंतु भारत देशातील खगोलशास्त्र व विज्ञान हे किती प्राचीन काळापासून समृद्ध आहे हे सांगणारेही काही सण आपण साजरे करतो. त्यातीलच एक हिंदू सण म्हणजे मकरसंक्रांत!

आपल्या सौरमान वर्षामध्ये खरे तर बारा संक्रांती येतात. संक्रांतीचे चार वर्गांमध्ये वर्गीकरण केले जाते. अयान, विषुव, विष्णुपदी व षडशिमुखी. मकरसंक्रांतीला उत्तरायण असेही म्हटले जाते. कारण, सूर्याचे मकर राशींमध्ये त्याचे खगोलीय संक्रमण सुरू होते आणि सूर्याचा विषुववृत्त ओलांडून उत्तरेकडचा प्रवास सुरू होतो, ह्या हालचालींमुळे उत्तर गोलार्धात सूर्य प्रकाशाचे प्रमाण वाढते आणि वसंत ऋतूकडे वळण घेऊन तो पुढे प्रवास करतो व हा कालावधी सहा महिन्यांचा असतो.

खरे पाहता, २२ डिसेंबर ला उत्तरायण चा काळ सुरू होतो परंतु, खगोलीय परिस्थिती पाहता १४/१५ जानेवारी ला सूर्य हा मकर राशीत प्रवेश करतो म्हणून ह्याला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे आणि पुराणातील काही कथांमुळे हा सण साजरा करण्यासाठी विशेष पुष्टी मिळते. पुराणकाळातही मकर संक्रांती एक महत्त्वाचा सांस्कृतिक दिवस म्हणून साजरा केला जात असे. सूर्यदेव मकर राशीचा स्वामी असलेले आपला मुलगा शनि देव याच्या घरी भेट देतात. असे म्हटले जाते की, ह्या वडील आणि मुलामध्ये चांगले जमत नाही, परंतु सूर्यदेव सर्व मतभेद बाजूला ठेवतात आणि या दिवशी आपल्या मुलाला भेटण्याचा निर्णय घेतात. भगवान श्री कृष्णाशी देखील ह्या सणाशी आध्यात्मिक संबंध असल्याने, या दिवसाला हिंदू धर्मात खूप महत्त्व दिले जाते. भगवान विष्णूंनी असुरांच्या सतत वाढत जाणाऱ्या शक्तींचा ह्याच दरम्यान अंत केला आणि त्यांना पराभूत करून त्यांचे मस्तक मंदाराचल पर्वताखाली दफन केले. तसेच, महाभारत युद्धादरम्यान भीष्म पितामहा यांनी या दिवशी आपले नश्वर शरीर सोडले कारण ह्या दिवशी मरण आल्यास मोक्षप्राप्ती होते. एका पौराणिक कथेनुसार राजा भगीरथ यांनी भगवान शिवाच्या कृपेने गंगा नदीला पृथ्वीवर आणले आणि भगीरथचे आजोबा महाराज सागर यांच्या ६०००० पुत्रांना मुक्ती दिली. त्यामुळे गंगा भागीरथी प्रसिद्ध झाली. या आणि अशा अनेक घटना संक्राती साठी सांगितल्या जातात.

त्याचप्रमाणे मकर संक्रांतीला आध्यात्मिक महत्त्व देखील आहे. ह्याचा उल्लेख भगवतगीतेत सापडतो. भगवान श्रीकृष्ण म्हणतात,

**अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसम्भवः ।**
**यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ।।**
**अन्नाद भवन्ति भूतानी पर्जन्याद अन्न-संभवः।**
**यज्ञद भवति पर्जन्यो यज्ञः कर्म-समुद्भवः।।**
**(भगवद्गीता ३.१४)**

याचा अर्थ असा की, सर्व जीव अन्नावरच निर्वाह करतात आणि अन्न पावसाने निर्माण होते. त्यागाच्या कर्तृत्वाने पाऊस पडतो आणि विहित कर्तुत्वामुळे त्यागाची निर्मिती होते.सर्वसाधारण अर्थ असा की, पावसानंतर हिवाळी हंगामातील मुबलक धान्य उपलब्ध करून झाले आता निष्क्रियता दूर सारून पुन्हा नवीन जोमाने कापणीचे कामे करण्याचे महत्त्व जाणून सूर्यनारायणाची पूजा करावी.

मकर संक्रांतीच्या दिवशी, संपूर्ण भारतामध्ये भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मीसोबत हिंदू सूर्य देवताची पूजा केली जाते. मकरसंक्रांतीला वेगवेगळ्या राज्यात विविध नावाने ओळखले जाते. आंध्र प्रदेशात पेड्डा पांडुगा किंवा मकर संक्रांती, कर्नाटक, तेलंगणा आणि महाराष्ट्रात मकर संक्रांती, गुजरात मध्ये उत्तरायण, तामिळनाडूमध्ये पोंगल, आसाममध्ये माघ बिहू, मध्य आणि



उत्तर भारतातील काही भागांमध्ये माघ मेळा, मकर संक्रांती म्हणून ओळखले जाते. पश्चिम, केरळमध्ये मकर संक्रांती किंवा शंकरांती! वेगवेगळ्या राज्यांतील लोक या दिवशी प्रार्थना करून, गंगेत पवित्र स्नान करून, दानधर्म करून, पारंपारिक तीळ–गुळाच्या मिठाईचे वाटप करून, पतंग उडवून, लोकनृत्य आणि संगीताचा आनंद लुटून मकर संक्रांतीच्या मेळ्यांना भेट देऊन हा सण साजरा करतात.

महाराष्ट्रातील विविध भागात या दिवशी सुवासिनी महिला वेगवेगळ्या सौभाग्य गोष्टींचे संक्रांतीचे वाण म्हणून एकमेकींना भेट देतात. या दिवशी सुगडी पूजन करतात. त्या सुगडीमध्ये नवीन धान्याचे कोंब, बोरं, हरबरा, ऊसाचे तुकडे असे वेगवेगळे कापणीचे प्रकार घालून त्यांची पूजा करून ते एकमेकींना औसा म्हणून देतात तर संक्रातीच्या दुसऱ्या दिवशी ह्याचीच ओटी भरली जाते व किंक्रांत साजरी केली जाते. किंक्रांतीच्या दिवशी लहान मुलांना बोरन्हाण घातले जाते. विविध ठिकाणी हळदीकुंकू समारंभ आयोजित करून तीळ गूळ वाटून हा सण सामाजिक बांधिलकी देखील जपतो. तसेच तीळ म्हणजे स्निग्धता आणि गूळ म्हणजे गोडवा हे वाटून आपण एकमेकांप्रती मतभेद दूर करून नात्यांमध्ये आपुलकी व समन्वय साधण्याचा प्रयत्न करतो.

तेव्हा येथे कवीकेशवांच्या ह्या ओळींची येथे सांगड घालावी वाटते की, या सणाच्या निमित्ताने आपल्या मध्ये एकी जपली तरच भारतातील हिंदुत्व जोडलेले राहील.

**बंधुतेचे श्रेष्ठ नाते, हृदय हृदया जोडते।**
**भेदभाव तोडूनिया, ऐक्य येथे नांदते।**
**एकतेची ही तुतारी केशवांचा मंत्र बोले।**

मकर संक्रांत हा सण भारतीय हिंदू संस्कृतीतील शुभ पर्वाची सुरुवात मानली जाते. म्हणून याला 'संक्रमणाचा पवित्र टप्पा' असे ही म्हटले जाते. त्यामुळे या दिवशी हिंदू कुटुंबियांमध्ये कोणत्याही प्रकारचे केलेले कृत्य हे शुभ आणि पवित्र मानले जाते. म्हणूनच ह्या सणाला हिंदू धर्माप्रमाणे धार्मिक व सामाजिक बाजू असली तरीही खगोलीय शास्त्राप्रमाणे सुद्धा त्याला अनोखे महत्व प्राप्त झाले आहे, हे नक्की!

**ॲड. स्वाती जेरे**
**विधी प्रकोष्ठ नाशिक शहर प्रमुख**

◈ ◈ ◈

● विनम्र आवाहन ●

## संघ अनुभवताना...

### ग्रंथासाठी आठवणी पाठवण्याचे आवाहन

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त संघकार्यातील संस्मरणीय आठवणी, प्रसंग यांचे संकलन करून या आठवणी ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्याची योजना पुण्यातील 'कौशिक आश्रम' आणि 'अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान' यांनी तयार केली आहे. 'संघ अनुभवताना' या नावाने दोन खंड प्रसिद्ध केले जाणार आहेत. या ग्रंथासाठी आठवणी संकलित करण्याचे काम सुरू झाले आहे.

प्रत्येक खंडामध्ये अडीचशे आठवणींचे संकलन असेल. संघकार्य करत असताना अनेकविध प्रसंग घडतात. अशा संस्मरणीय आणि प्रेरणादायी आठवणींचे संकलन करून त्या प्रकाशित करण्याची योजना आहे. संघस्वयंसेवक, कार्यकर्ते, प्रचारक, मातृशक्ती यांनी लिहिलेल्या अशा पाचशे प्रेरक प्रसंगांच्या आठवणी प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. ही आठवण वा प्रसंग इतरांसाठी प्रेरणादायी असावा, ही अपेक्षा आहे.

हे लेखन पाठवण्याची मुदत २६ जानेवारी ही आहे. त्यापूर्वी आपले लेखन पाठवावे. लेखन पाठवण्यासाठी तसेच **संपर्कासाठी पत्ता – श्री. सुनील राऊत, १७ ब सेनादत्त हौसिंग सोसायटी, बाळा राऊत पथ, दत्त मंदिराजवळ, अनामिका अपार्टमेंट समोर, नवी पेठ, पुणे – ४११०३०. (मोबाईल – ९९२१६६९५५१)**

लेखन ई मेलवरही पाठवता येईल. **anubhav500.pustakgmail.com** या मेलवर लेखन पाठवावे.

# महाराष्ट्र निवडणूक

- **महाराष्ट्रात हिंदुत्ववादी शक्तींनी एनडीएची बाजू कशी मजबूत केली.**

२३ नोव्हेंबर २०२४ हा हिंदू समाजासाठी अंतर्गत परिवर्तनाचा दिवस ठरला आहे, कारण भाजप आणि मित्रपक्षांनी संकटात सापडलेल्या परिस्थितीत महाराष्ट्रात दणदणीत विजय मिळवला. हिंदू समाजाच्या जागृतीने केवळ या निवडणुकीसाठीच नव्हे, तर भविष्यातील निवडणुकांसाठी आणि सनातन तत्त्वे लक्षात घेऊन राजकीय पक्ष विकासासाठी कसे कार्य करू शकतात याची व्याख्या केली आहे. अकल्पनीय स्ट्राइक रेटने भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांच्या अभूतपूर्व यशात कोणत्या घटकांचा हातभार लागला? बघू या.

आयडिया ऑफ इंडिया आणि भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारांच्या विरोधात डीप स्टेट शक्तींचे खोटे विमर्श, तसेच राहुल गांधी आणि इंडी आघाडीला डीप स्टेट शक्तींचा भक्कम पाठिंबा, यामुळे हिंदू मतदारांचे विभाजन त्यामुळे लोकसभेत मोठा फटका बसला होता. जात, संविधान आणि आरक्षणाच्या आधारावर त्यांच्यात मोठी फूट निर्माण झाली होती. पंतप्रधान मोदींनी पुन्हा केंद्रात सरकार स्थापन केले, पण यावेळी स्वबळावर बहुमत न मिळवता. खोट्या कथनांचा फायदा घेऊन डाव्या उदारमतवादी शक्तींनी आणि हिंदुत्वविरोधी राजकीय शक्तींनी सनातन धर्म आणि मोदी सरकारवर भयंकर वैचारिक हल्ला चढवला. हे हिंदुत्वाला अधिक मारक असल्याचे सिद्ध झाले आहे, परंतु रा. स्व. संघ, वीहिप सारख्या हिंदुत्ववादी शक्ती, हिंदू धार्मिक आणि अध्यात्मिक संत आणि त्यांच्या संघटना हिंदुत्वासाठी हिंदूंना एकत्र करण्यासाठी एकत्र आल्या आहेत.

- **हिंदुत्ववादी शक्ती जमिनीस्तरावर कसा बदलावं आणत आहेत.**

संघ, विश्व हिंदू परिषद आणि इतर हिंदुत्ववादी संघटनांच्या मदतीने धार्मिक आणि अध्यात्मिक गुरूंनी एकत्र येऊन वक्फ बोर्ड कायदा, लव्ह जिहाद, शरिया कायदा, व्होट जिहाद, मदरसा द्वेषयुक्त शिक्षण आणि त्याचा निधी, हिंदूंचे धार्मिक धर्मांतर आणि त्याचे घातक परिणाम यांच्या धोक्यांबद्दल जागरुकता वाढवली. त्यांनी हिंदूंच्या मोठ्या मेळाव्याला संबोधित करून एकजुटीने हिंदूंनी संविधानाला विध्वंसक शक्तींपासून कसे वाचवता येईल यासाठी मानसिकता तयार करण्यास सुरुवात केली. या प्रबोधनाने हिंदू समाजात मोठी सकारात्मक लाट निर्माण झाली आणि एकता किती महत्त्वाची आहे हे त्यांनी ओळखले, त्यामुळेच २०१९ आणि सध्याच्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी मतांची टक्केवारी वाढली.

- **विशेष घोषणांचा निवडणुकीवर कसा प्रभाव पडतो.**

पीएम मोदी आणि मुख्यमंत्री योगी यांच्या एक है तो सेफ है आणि बटेंगे तो कटेंगे या घोषणांनी हिंदूंमध्ये प्रचंड जागरण निर्माण केले. श्रेष्ठत्व आणि कनिष्ठतेच्या मर्यादित जातीय वृत्ती तुटल्या आहेत आणि हिंदू आता एकजुटीने मतदान करत आहेत. मुस्लिम नेते सज्जाद नोमानी आणि इतर मौलवी आणि मुस्लिम संघटनांनी मविआ ला मतदान करण्याचा फतवा जारी केल्याने हिंदू ऐक्य देखील वाढले आहे. धुळे, महाराष्ट्र लोकसभा जागेवरील वोट जिहादबाबत हिंदूंना समजले की, जर वोट जिहादच्या परिणामी महाराष्ट्र धर्म आणि सनातन धर्माच्या विरोधात मुस्लिमांच्या १७ मागण्या पूर्ण करणारे सरकार स्थापन झाले, तर ते संपूर्ण समाजासाठी किती घातक ठरेल. हिंदू समाजासाठी धोकादायक ठरेल. हिंदुत्ववादी शक्तींच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हिंदू एकता बळकट झाली आणि सर्व राजकीय पक्षांना, विशेषतः हिंदुत्वाला विरोध करणाऱ्या आणि शरियाचे समर्थन करणाऱ्यांना, हिंदूंना गृहीत धरले जाऊ शकत नाही आणि त्यांना द्वितीय श्रेणीचे नागरिक मानले जाऊ नये, असा मजबूत संकेतही दिला. आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी आपल्या भाषणाने आणि रॅलीने जोरदार प्रभाव पाडला, विशेषतः लोकसभा निवडणुकीत मोदी सरकारच्या विरोधात मतदान करणाऱ्या मराठवाड्यात.

- **खोट्या कथनांचा कसा पर्दाफाश केला जात आहे.**

समाजाच्या सर्व स्तरांतील बुद्धिजीवींच्या वैचारिक शक्तीचा उपयोग करून खोट्या विमर्षांचे निर्मूलन करणे आणि गावातल्या

शेवटच्या व्यक्तीपर्यंत अचूक माहिती किंवा खरा विमर्श पोचवणे खूप प्रभावी ठरले आहे. राहुल गांधी आणि इंडी आघाडीने मांडलेले प्रत्येक खोटे कथन तथ्ये आणि आकडेवारी वापरून पूर्णपणे उद्ध्वस्त केले आहे. राज्यघटना, आरक्षण, व्यापार, उद्योग, उद्योगपती, अर्थव्यवस्था, महाराष्ट्राचे गुजरातशी असलेले संबंध आणि शेतकऱ्यांच्या अडचणींशी संबंधित खोट्या कथनांचा मुकाबला सत्याने केला जात असल्याची जाणीवही लोकांमध्ये वाढली आहे.

लोकसभा निवडणुकीत मराठा आरक्षण घटकामुळे भाजपचे मोठे नुकसान झाले. मराठा आणि ओबीसी जातीच्या राजकारणामुळे भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांचे खूप नुकसान झाले होते. कोण आपल्या बाजूने आहे आणि कोण विरोधात काम करत आहे याची वस्तुस्थिती मांडून मराठ्यांची मानसिकता बदलणे अवघड होते. तसेच ओबीसींच्या भावना जपणंही तितकंच महत्वाचं होत. सर्वांनी हिंदुत्वाच्या ध्वजाखाली एकत्र का व्हावे याविषयी तथ्ये आणि आकडेवारीसह जागरूकता पसरवत हे गुंतागुंतीचे काम हिंदुत्ववादी शक्तींनी सहजतेने पार पाडले. याचा फायदा भाजप आणि मित्रपक्षांना झाला आहे. मराठा आणि ओबीसी मतदारांनी जातीचे राजकारण बाजूला ठेवून महान आणि बलाढ्य महाराष्ट्राच्या बाजूने मोठ्या संख्येने मतदान केले.

- **विजयाकडे नेणारी धोरणे.**

राज्यातही भाजपचे सरकार असल्याने मध्यमवर्गीय, नवमध्यमवर्गीय, गरीब कुटुंबे, शेतकरी, मजूर यांच्यासाठी मोदी सरकारच्या विविध योजना यशस्वीपणे राबविण्यात आल्या. भाजपच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र सरकारने भगिनींसाठी जाहीर केलेला सर्वात मोठा आणि सर्वात प्रभावी उपक्रम, लाडकी बहीण योजना ने भाजप आणि त्यांच्या युतीच्या भागीदारांच्या बाजूने एक मजबूत सकारात्मक लाट निर्माण केली आहे. भाजप आणि मित्रपक्षांना मतदान करण्यासाठी महिला मोठ्या संख्येने बाहेर पडल्या.

- **या विजयाचा केंद्र सरकारवर काय परिणाम होईल?**

झारखंडमध्ये भाजपचा विजय झाला नसला तरी, हरियाणा आणि महाराष्ट्रातील विजयाने विरोधी पक्षांसह सर्वांची विचारसरणी पूर्णपणे बदलली आहे, ज्यांना वाटत होते की भाजपचे अधःपतन सुरू झाले आहे. केंद्र सरकार अधिक मजबूत होईल आणि राष्ट्रहितासाठी अधिक ठोस निर्णय घेईल. उलट इंडी आघाडी लवकरच तुटताना दिसेल! अस्थिरतेचा मुद्दाही मागे पडला आहे. वक्फ बोर्ड दुरुस्ती कायदा, यूसीसी आणि इतर महत्त्वाच्या विधेयकांचा संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये जोरदार पाठपुरावा केला जाईल. इतर पक्षांचाही पाठिंबा वाढेल. इंडी आघाडीतून पक्ष आता बाहेर पडायला सुरुवात होईल.

- **भविष्यातील निवडणुकांवर विशेषत: दिल्लीत होणाऱ्या निवडणुकीवर प्रभाव.**

महाराष्ट्राच्या निकालाने अरविंद केजरीवाल यांच्या तिसऱ्यांदा दिल्ली जिंकण्याच्या आशांना मोठा धक्का बसला आहे. पुढील वर्षी होणाऱ्या दिल्लीच्या निवडणुका निःसंशयपणे हिंदुत्व शक्ती आणि हिंदू ऐक्याचा प्रभाव दिसून येईल. अशी एकजूट कायम राहिली आणि ती अधिक मजबूत झाली, तर पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू आणि तेलंगणा जिंकून या राज्यांचा सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकास करणे सोपे होईल. प्रत्येक हिंदूने खंबीरपणे उभे राहून डीप स्टेट, राहुल गांधी आणि इतर विरोधी पक्षांकडून पसरवलेल्या खोट्या विमर्षांना विरोध करण्याची वेळ आली आहे. हिंदू ऐक्याचा या अद्भुत राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने फायदा होईल.

**पंकज जगन्नाथ जयस्वाल**

◈ ◈ ◈



# आता फक्त जनसेवा

सर्वप्रथम देवेंद्र फडणवीस यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

महाविकासआघाडीचे सरकार असताना आणि महायुतीचे सरकार आल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी जे भोगले, त्याची तुलना बारा वर्षांचा वनवास भोगणाऱ्या धर्मराजाशी करावी लागेल. परम पूजनीय श्रीगुरूजी आणि श्रद्धेय पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या संकल्पनेतील आदर्श राजकीय स्वयंसेवक कार्यकर्त्याचे दर्शन घडले आहे. परमेश्वर त्यांच्या या शक्तीचे सदैव रक्षण करो, अशी आम्ही सर्वजण प्रार्थना करीत आहोत.

मुख्यमंत्री म्हणून पुढील पाच वर्षांचा कालखंड हा सोपा आहे, असे समजण्याचे कारण नाही. महाराष्ट्रात भाजपची एकहाती सत्ता नाही. शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित पवार) यांना बरोबर घेऊन सरकार चालवायचे आहे. एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि भाजपची हिंदुत्वाची विचारधारा यांच्यात खूप साम्य आहे. दोन्ही पक्षांना एकत्र बांधून ठेवणारा तो समान दुवा ठरण्यास काही हरकत नाही. राष्ट्रवादी कॉँग्रेस हा कॉँग्रेस संस्कृतीतून जन्म झालेला पक्ष आहे. आणि शरदराव पवार यांच्या सर्वनाशक राजकारणाचा वारसा त्या पक्षाला लाभलेला आहे. अजित पवार हे या दोन्ही वारशांपासून स्वतःला किती दूर करू शकतील, हे येणारा काळ सांगेल. आणि त्यावरच त्यांचे आणि भाजप-शिवसेनेचे मनोमिलन अवलंबून राहणार आहे.

आगामी काळात भाजप आणि युतीविरूद्ध अनेक प्रकारची खोटी कथानके रचली जातील. अदाणी हा विषय आहेच, संविधान हा विषय काही संपलेला नाही, निवडणूक आयोग हा नवीन विषय पुढे आलेला आहे, ईव्हीएम मशीन हा सुद्धा एक विषय पुढे आणण्यात आलेला आहे. याला जोडून महिला वर्गाची सुरक्षा, शेतकऱ्यांचे प्रश्न, याचीदेखील वेगवेगळ्या प्रकारची कथानके रचली जातील. हे युतीचे सरकार राहणार असल्यामुळे हा नाराज तो नाराज, त्याने अशी नाराजी व्यक्त केली, तशी नाराजी व्यक्त केली आणि त्याला कोणती पदे पाहिजे होती, ती का दिली गेली नाहीत, वगैरे विषय रंगवून रंगवून सांगितली जातील. विकत घेतलेले अनेक पत्रकार आणि वृत्तवाहिन्या ही कथानके प्रामाणिकपणे चालवतील.

युतीतील घटक पक्षांविषयी आपण काही सांगू शकत नाही, पण भाजपतील सर्व लोकप्रतिनिधींनी याबाबतीत चोवीस तास सावध राहिले पाहिजे. आपण आता निवडून आलो, पुढील पाच वर्षांची निश्चिती झाली, या भ्रमात राहू नये. कोण काय बोलत आहे, कोठे बोलतो आहे, कोणती खोटी कथानके चालू आहेत, याविषयी निरंतर जागरूक असले पाहिजे. निरंतर जागरूकता ही सत्तेची हमी आहे.

निवडून आलेल्या सर्व आमदारांनी काही गोष्टी उत्तम प्रकारे समजून घेण्याची गरज आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेत सत्तेचा उगम प्रजेतून होतो. निवडून येणे म्हणजे प्रजेने आपल्या सार्वभौम शक्तीचा प्रतिनिधी म्हणून उमेदवाराला निवडून दिलेले असते. प्रजा ही मालक असून आपण त्या मालकाचे सेवक आहोत, याचे विस्मरण अजिबात होऊ देता कामा नये. जनसेवा हाच त्यांचा राजकीय मंत्र असला पाहिजे. सुदैवाने जनसेवक म्हणून आदर्श ठरावे असे असंख्य आमदार भाजप आणि पूर्वीच्या जनसंघाने दिलेले आहेत. रामभाऊ म्हाळगी, हशु अडवाणी, विष्णु सावरा, रामभाऊ नाईक, डॉ. श्रीधर नातू, अशी ही पार मोठी प्रचंड यादी आहे. जो सेवक झाला तो विजयी झाला, हा विजयाचा मंत्र आहे.

युती शासनाचा एकच मंत्र असला पाहिजे आणि तो म्हणजे 'आता फक्त जनसेवा.' संसदीय पद्धतीच्या राजवटीत निवडून आलेले सरकार विधिमंडळाला जबाबदार असते. विधिमंडळ जनतेच्या इच्छा आणि आकांक्षाचे प्रतिनिधीत्व करते. याचा अर्थ असा झाला की, शासन आपल्या कामासाठी अंतिमतः जनतेला जबाबदार असते. ही जबाबादारीची जाणीव होणाऱ्या सर्व मंत्र्यांनी सतत बाळगली पाहिजे. संसदीय राज्यप्रणालीच्या विरूद्ध म्हणजे बेजबाबदारीने जर वागू लागले तर जनता ते सहन

करणार नाही. पाच वर्षे सहन केल्याशिवाय पर्याय नसतो, हे जरी खरे असले तरी जनतेकडे पाच वर्षांनंतर हाकलून देण्याचा पर्यायदेखील असतो. जनतेद्वारे दूर लोटण्याचा पर्याय स्विकारायचा की असेच राज्यकर्ते आम्हाला अनेकवेळा लाभो, अशी आर्शीवचने स्वीकाराची. हे शासनकर्त्यांच्या कतृत्वावर अवलंबून राहील.

'जनसेवा हीच ईश्वरभक्ती, बोध यातला उमगूया', ही संघगीतीतील ओळ आहे. ईश्वराची आराधना मनोभावे केली की ईश्वर प्रसन्न होतो आणि भक्ताचे कल्याण करतो, अशी आपली धर्मश्रद्धा आहे. लोकशाही धर्माच्या परिभाषेत सांगायचे तर लोकसेवा म्हणजे लोकांच्या जगण्याच्या प्रश्नांसंबंधी जागरूकता, सहृदयता, अनुकंपा, आणि तात्काळ क्रिया असे विषय येतात. हे सर्व विषय जेवढे मंत्रीपदावर बसलेल्या लोकप्रतिनिधींना लागू होतात तेवढेच हे विषय मंत्रीपद न मिळालेल्या लोकप्रतिनिधींनाही लागू होतात. या मार्गाने जनताजनार्दनाची सेवा निरंतर केली की, जनता अशा सेवकाला दूर करीत नाही. आणि जे विपरीत वागतात, त्यांच्या मस्तकावर जनता कृपेचा आर्शीवाद ठेवीत नाही.

आणखी एका गंभीर विषयाला स्पर्श करूया. वृत्तपत्रीय लेखात याविषयी फार खोलात चर्चा करता येत नाही, त्या विषयाला केवळ स्पर्श करून पुढे जावे लागते. तो विषय असा की, राज्यसत्तेचा अंतिम हेतू कोणता आणि दुसरा विषय प्रजेने शासनाप्रति एकनिष्ठ का राहिले पाहिजे. राज्यशास्त्रातील हे दोन सैद्धांतिक विषय आहेत. राज्यशासनाचा अंतिम उद्देश न्यायाची प्रस्थापना करण्याचा आहे. न्यायाची तीन अंगे आहेत. १) सामाजिक, २) आर्थिक आणि ३)राजकीय. सामाजिक न्यायाचा अर्थ – जातिगत विषमतेचे निर्मूलन, आर्थिक न्यायाचा अर्थ 'अन्न, वस्त्र, संस्कार, लाभही सहजपणे सर्वा व्हावा' आणि राजकीय न्याय म्हणजे प्रत्येकाला विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, मतदानाचा हक्क, निवडणूक लढविण्याचा अधिकार इत्यादी येतात. राज्यकर्त्यांना या विषयावर भाषणे करून चालणार नाही, ते काम प्राध्यपकांचे आहे. राज्यकर्त्यांना कृती करावी लागते. म्हणून राज्यसंस्था याचा अर्थच असा होतो की, न्यायाची प्रस्थापना करण्यासाठी समाजाने निर्माण केलेली शक्तीमान संस्था याचे भान सर्व राज्यकर्त्यांना निरंतर असावे लागते. राज्य जेव्हा न्यायाची प्रस्थापना करण्यासाठी प्रामाणिकपणे झटत राहते, तेव्हा प्रजा अशा राजवटीशी आपोआप एकनिष्ठ राहते. छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य याचे आदर्श आहे.



आपल्या परंपरेने राज्यकर्ता हा सत्तेचा उपभोग शून्य स्वामी असला पाहिजे, असे विधान केलेले आहे. सत्ता उपभोगण्यासाठी नसून जनसेवेसाठी आहे. कोरोना काळात सा. विवेकने देवेंद्र फडणवीस यांच्या कोरोना कार्याबद्दल एक विशेषांकच केला होता, या विशेषांकाचे शीर्षक संपादकीय विभागाने वेगळे केले होते, देवेंद्रजींनी ते बदलून 'जनसेवक' असे केले. देवेंद्र फडणवीस यांची ही भावना सर्व मंत्रिमंडळाची भावना बनावी, अशी अपेक्षा केल्यास ती फार मोठी आहे असे कुणाला वाटू नये.

**रमेश पतंगे**

◈ ◈ ◈

# भारतीय संस्कृती व १६ संस्कार

पूजनीय साने गुरुजींनी भारतीय संस्कृतीची व्याख्या करताना हृदय व बुद्धीची पूजा करणारी, उदार भावना व निर्मळ ज्ञान यांच्या योगाने जीवनाला सुंदरता आणणारी आपली थोर संस्कृती असे वर्णन केले आहे. ज्ञान–विज्ञान तसेच कर्म–ज्ञान–भक्तिला हृदयाची जोड देणारी व जगातले जे जे सत्य शिव सुंदर आहे ते स्विकारून वाढणारी वर्धिष्णु अशी आपली संस्कृती आहे.

संस्कार हे संस्कृतीचे कृतीरूप उन्मेष म्हणले जातात. सर्वच संस्कृतींमध्ये कौटुंबिक जीवनात जन्मापासून ते अंतापर्यंत अनेक घटना या संस्कारांनी बांधलेल्या दिसतात. अत्यंत उदार व मनोरम आशय संस्कारात व्यक्त केलेला दिसतो. हिंदु जीवनपद्धतीत अशा अनेक संस्कारांची गुंफण दिसून येते. चाळीस संस्कार व आठ आत्मगुण असे अठ्ठेचाळीस संस्कारांचा उल्लेख काही धर्मग्रंथात आहे. पुढे कालौघात ही संख्या कमी होत होत सध्या १६ मुख्य संस्कार मानले जातात यांचे सामान्यपणे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले जाते.

१) जन्मपूर्व संस्कार : गर्भाधान, पुंसवन, सीमन्तोन्नयन
२) बाल्यकालीन : जातकर्म, नामकरण निष्क्रमण, अन्नप्राशन, चूडाकरण, कर्णवेध
३) शैक्षणिक : विद्यारंभ, उपनयन, वेदारंभ, केशान्त, समावर्तन
४) विवाह ५) अंत्येष्टी

या संस्कारांसोबतच वयाच्या विशिष्ठ्य टप्प्यानंतर साठीशांत, अमृतमहोत्सवी शांत, सहस्रचंद्रदर्शन असेही संस्कार कार्यक्रम योजले जातात. या सर्व संस्कारांचे आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. अत्यंत गांभीर्यपूर्वक व समजून–उमजून व सर्वांना सहभागी करून हे संस्कार केले गेले तर आपले जीवन घडवणारे बदलवणारे व अविस्मरणीय होतील यात शंकाच नाही. जीवनाला कलाटणी देऊ शकणारे हे संस्कार आपण क्रमशः समजून घेणार आहोत.

संस्कार म्हणजे सकारात्मक परिवर्तन. अधिक चांगले, अधिक शुद्ध, अधिक उपयोगी व मूल्यवान बनणे. आजच्या आधुनिक भाषेत Value addition. जसे खाणीतून खनिज काढल्यावर त्यावर अनेक प्रक्रिया करून धातू प्राप्त होतो. तसेच दूधावर अनेक संस्कार करून औषधी व बलवर्धक तूप प्राप्त होते तसे हे संस्कार अधिक चांगली व्यक्ती होण्यासाठी करणे अत्यावश्यक आहे. व्यक्तिमत्त्व विकसनाचा हा अत्यंत प्रभावी असा मार्ग आहे. पशुत्वाकडून मनुष्यत्वाकडे व मनुष्यत्त्वाकडून देवत्वाकडे प्रवास संस्कारांमुळे सहज व सुलभ होतो.

दुर्दैवाने आताचे आपले संस्कार कार्यक्रम फारच दिखावू, खर्चिक, भपकेबाज व प्राणहीन झालेले दिसतात. विधींकडे लोकांचे लक्षच नसते केवळ कर्मकांड म्हणून त्याकडे पाहिले जाते. काही सन्माननीय अपवाद वगळता पोटार्थी गुरुजीही यजमानांची कुवत पाहून या विधींचे अवडंबर वाढवतात वा आखडते करतात. ही विटंबना आपल्याच ऱ्हासाला कारणीभूत होत आहे याचे आज भानही दिसत नाही !

या लेखमालेद्वारा आपण या सर्व संस्कार धर्मविधींचे अंतरंग समजून घेण्याचा प्रयत्न करूयात. ज्ञान प्रबोधिनी सारख्या काही संस्थांनी या संस्कारांचा आशय जपण्याचा व त्यात कालसुसंगत भर घालण्याचा अत्यंत स्तुत्य प्रयत्न केला आहे. या सर्व विचारांचा मागोवा घेत टप्प्या टप्प्याने हे संस्कार आपण आपलेसे करूयात.

वाचकांनाही आवाहन आहे, आपण या विषयात सक्रीय सहभाग घ्यावा. आपले भले–बुरे अनुभव मोकळेपणे मांडावेत, प्रश्न उपस्थित करावेत, काही उणीवा आढळल्या तरी सांगाव्यात ही नम्र विनंती आहे.

**यशवंत लिमये**

लेखक धातुशास्त्र अभियंता, व्यवस्थापन विशारद व भूतपूर्व लघुउद्योजक आहेत. सध्या ज्ञान प्रबोधिनी निगडी येथे सल्लागार, चिखली येथील वृद्धाश्रम व गुरूकुलाचे संचालक व महिला सबलीकरणाचे काम करणाऱ्या तळेगाव येथील दिशा संस्थेचे उपाध्यक्ष आहेत.

◈ ◈ ◈

# फाळणीची घोषणा व सत्तेची समीकरणे

- **स्वयंसेवकांनी वाचविले काँग्रेसी नेत्याच्या मुलींना**

अमृतसर शहरातील काँग्रेसी नेते सेठ रामकृष्णांच्या हवेलीला मुस्लिम लीगच्या गुंडांनी आग लावून दिली. घरातील चार तरुण कन्या सोडून बाकी सर्वजण बाहेर पडण्यात यशस्वी झाले. स्वयंसेवकांना याचा पत्ता लागताच, ते धावून आले आणि जळत्या हवेलीत शिरून त्या मुलींना वाचविले. काँग्रेसी तोपर्यंत संघाला हिंसेवर विश्वास असलेल्या, आवारा मुलांची संघटना आहे असेच समजत होते. सेठ रामकृष्ण हेही त्यातीलच एक! परंतु या प्रसंगानंतर मात्र त्यांचे संघाविषयीचे मत बदलले.

पं. नेहरूंसमोर संघाची बाजू परखडपणे मांडताना सेठ रामकृष्ण म्हणाले, संघ डोके फिरलेल्या तरुणांचे नव्हे, तर देशभक्त आणि राष्ट्ररक्षा करण्यासाठी कटिबद्ध असलेल्या युवकांचे एक सुदृढ संघटन आहे.

- **वीरेंद्र हसत हसत हुतात्मा झाला : सरीन मुहल्ल्यावरील दुसरा हल्ला**

(१६ मे १९४७)

'पंजाब रिलीफ कमिटी'च्या कार्यालयात स्वयंसेवक अहोरात्र राबत होते. पडेल ते काम करत होते. १६ मे १९४७ च्या रात्री दूरभाषची घंटी खणखणली. हल्ला झाला आहे. ताबडतोब मदत पाठवा. सरीन मोहल्ल्याच्या शेजारील पटपटिया की गली– येथून मदतीसाठी हाक आली होती. पोलिस तर लीगी गुंडांनाच मदत करत होते व स्वसंरक्षण करणाया हिंदूंनाच ठार करत होते. अशा वेळी स्वयंसेवक रुग्णवहिकेतून मदतीसाठी निघाले. तेथील सर्व नियोजन करून ते परतही आले. तेवढ्यात दुसरा निरोप आला की, आता प्रत्यक्ष सरीन गल्लीवरच हल्ला झाला आहे. मुस्लिम लीगच्या गुंडांच्या मदतीला बलुची मिलिटरीसुद्धा होती. कुप्रसिद्ध मॅजिस्ट्रेट चीमा स्वतः मुस्लिम लीगच्या गुंडांचे नेतृत्व करीत होता. तेथील स्वयंसेवक वीरेंद्रच्या मार्गदर्शनाखाली मोर्चे सांभाळत होते. बी.कॉम.ची परीक्षा उत्तीर्ण झालेला वीरेंद्र हा सरीन मोहल्ल्याचा पूर्णकालिक कार्यकर्ता होता. तो व त्याचा मित्र राजकुमार खन्ना हे त्या दिवसांत सरीन मोहल्ल्याचे आधारस्तंभच बनले होते. काबुलीमलची हवेली ज्या भागात होती तेथे सगळ्यात भीषण हल्ला झाला होता. वीरेंद्रच्या रिव्हॉल्व्हरने आता काली मातेचेच रूप धारण केले होते. मुस्लिम लीगचे गुंड हताश होत होते. तेव्हा मुस्लिम पोलिसच पुढे सरसावले. अनेक गोळ्या शरीरात घुसल्याने वीरेंद्र घायळ झाला होता. एवढ्यात रिलीफ कामिटीने पाठविलेले कार्यकर्ते आले. जखमी वीरेंद्र व त्याच्या अन्य साथीदारांना गंगाराम रुग्णालयात नेण्यात आले. शरिरात घुसलेल्या सर्व गोळ्या यशस्वीपणे काढण्यात आल्या. पण विधात्याच्या मनात काही वेगळेच होते. अर्ध्या तासानंतर त्याची प्रकृती अचानक गंभीर झाली. तरीही तो वारंवार एकच प्रश्न विचारीत होता, मुहल्ला सुरक्षित आहे ना?

कार्यालयाकडून वेळेवर मदत आली आणि मोहल्ल्याचे सर्व लोक सुरक्षित आहेत. हे सांगितल्यावरच त्याच्या चेहयावर हसू उमटले आणि त्याची प्राणज्योत मालवली. भारतमातेच्या चरणी अजून एक पुष्प समर्पित झाले!

- **स्वा. सावरकरांनी काँग्रेसला उद्देशून केले तळमळीचे आवाहन**

दिल्लीत चाललेली सत्तेची जुळवाजुळव, पंजाबात चालू असलेली हत्याकांडे आणि इंग्रजांचे लीगच्या गळ्यात गळा घालून



चालू असलेले डावपेच या सर्वांच्या पार्श्वभूमीवर, २९ मे १९४७ला स्वा. सावरकरांनी काँग्रेसला उद्देशून एक तळमळीचे आवाहन केले त्यात ते म्हणतात,

फाळणीच्या प्रश्नावर तुम्ही निवडून आलेला नाही. तेव्हा अशा प्रकारची योजना विचारात घेण्याचाही तुम्हाला अधिकार नाही. त्यागपत्र द्या व पाकिस्तान की अखंड हिंदुस्थान या प्रश्नावर नव्याने निवडणुका लढवा. देशाचे जीवन-मरण आणि भावी पिढ्यांचे भवितव्य ज्यावर सर्वथा अवलंबून आहे, अशा महत्त्वाच्या प्रश्नावर काँग्रेसच्या नेत्यांनी सार्वमत घेण्याची मागणी करावी अशी माझी सूचना आहे.

- **...पण फाळणी स्वीकारायला आता काँग्रेसचे नेतेच उतावीळ झाले होते**

भारतातील वातावरण आता स्फोटक बनत चालले होते. हिंदुस्थानच्या फाळणीच्या योजनेवर १ ब्रिटिश मंत्रिमंडळाचा अखेरचा हात फिरवून घेण्यासाठी १८ मे १९४७ला माऊंटबॅटन विमानाने लंडनला गेले. पं. नेहरूंच्या खास विनंतीवरून बिहारमध्ये असलेले महात्मा गांधी दिल्लीला आले. फाळणीच्या योजनेची कुणकुण बाहेरही लागली होती.

योजनेला शेवटची रंगसफेदी करून १ जूनला माऊंटबॅटन दिल्लीला परतले. दुसऱ्याच दिवशी २ जूनला त्यांनी काँग्रेसचे पुढारी व मुस्लीम लीगचे पुढारी यांच्याबरोबर बैठक करून त्यांना फाळणीची योजना समजावून सांगितली. ही बैठक संपल्यावर म. गांधीजी माऊंटबॅटन २ यांना भेटायला आले. त्यांनाही माऊंटबॅटन यांनी फाळणीची योजना समजावून सांगितली. तो दिवस गांधीजींच्या मौनाचा होता. त्यांनी कागदाच्या कपट्यावर लिहून विचारले, मी काही बोलावे अशी तुमची खरोखर इच्छा नाही - खरे की नाही? (You do not want me to say anything, do you?) त्यामुळे गांधीजी फाळणीला अडथळा करणार नाहीत याची माऊंटबॅटन यांना खात्री पटली.

- **३ जून १९४७ ला झाली फाळणीची घोषणा**

३ जून १९४७ ला सायंकाळी सात वाजता व्हाईसरॉय लॉर्ड माऊंटबॅटन यांनी आकाशवाणीवरून दिल्लीत आणि पंतप्रधान ॲटली यांनी लंडनमध्ये फाळणीच्या नव्या योजनेची घोषणा केली. त्या घोषणेनुसार ३० जून १९४८ हा सत्तांतराचा दिनांक मागे घेऊन तो १५ ऑगस्ट १९४७ करण्यात आला होता. या दिनांकापर्यंत दोन स्वायत्त राज्यांची (डोमिनियन) निर्मिती होणार होती. दोन वेगवेगळ्या घटना समित्या त्या त्या राज्याच्या घटना ठरणार होत्या. पंजाब आणि बंगाल यांची फाळणी करण्यात येणार होती आणि बलुचिस्तान, वायव्य सरहद्द प्रांत व आसाममधील सिल्हेट जिल्हा या ठिकाणी सार्वमत घेऊन, हे प्रदेश पाकिस्तानात जातील का भारतात राहतील ते ठरवण्यात येणार होते. यानंतर आकाशवाणीवरून पं. जवाहरलाल नेहरू, जिन्ना व बलदेव सिंग यांची देशाला उद्देशून केलेली भाषणे प्रक्षेपित झाली.

- **माऊंटबॅटन यांनी म. गांधीजींना चक्क पटवले!**

४ जून १९४७ला सकाळी भारतीय आणि विदेशी पत्रकारांबरोबर लॉर्ड माऊंटबॅटन ३ यांनी दिल्लीतील लेजिस्लेटिव्ह असेंब्ली भवनात पत्रकार परिषद घेतली व योजना सांगितली. हिंदुस्तान समाचार या वृत्तपत्राचे संपादक व महात्मा गांधीजींचे लाडके पुत्र देवदास गांधी आणि माऊंटबॅटन यांच्यामध्ये तेथेच काही शाब्दिक झटापट झाली. माऊंटबॅटन यांनी अंदाज बांधला की, आजच्या सायंकाळच्या प्रार्थना-प्रवचन सभेत म. गांधी या योजनेची कठोर आलोचना करणार आहेत. म्हणून प्रार्थना सभेला जाण्यापूर्वीच त्यांनी महात्माजींना व्हाईसरॉय भावनावर भेटीचे निमंत्रण दिले. गांधीजी खरोखर दुःखी होते. त्यांना धक्का बसला होता की, हिंदू मुस्लिम एकतेसाठी त्यांचे जीवन वरचे सारे प्रयत्न पाण्यात गेलेत असे त्यांना वाटत होते. माऊंटबॅटन यांनी आपली पटवण्याची सर्व शक्ती पणाला लावून ते महात्मा गांधीजींना म्हणाले की, या सरकारी घोषणेला 'माउंटबॅटन योजना' न समजता 'गांधी योजना' समजावी. माउंटबॅटन जिंकले.

- **प्रार्थना-प्रवचन सभेत केली फाळणीची भलामण!**

आता म. गांधीजींनीही फाळणीची भलामण करायला सुरुवात केली. ४ जून १९४७च्या माउंटबॅटनबरोबरच्या या बैठकीनंतर म. गांधीजी ४ परस्पर प्रार्थना-प्रवचन सभेत गेले. तेथे ते म्हणाले,

...मी तुम्हाला सांगितले होते की, आम्ही धाकदपटशाने पाकिस्तान म्हणून एक इंच जमीनही देणार नाही. वेगळ्या शब्दात धमकी देण्यात आल्यामुळे पाकिस्तान मान्य करू नये...

काँग्रेस कार्यकारिणी ठामपणे सांगते की, आम्ही घाबरून काहीही दिलेले नाही. किती लोक मेले आणि संपत्ती बेचिराख झाली, यामुळे ते घाबरलेले नाहीत. हिंसेला घाबरून त्यांनी पराभव स्वीकारला यात तिळमात्र सुद्धा सत्य नाही. मी त्यांना भित्रे मुळीच म्हणणार नाही. त्यांनी हा मार्ग स्वीकारला कारण दुसऱ्या कोणत्याही मार्गाने मुस्लिम लीगचे मन वळवता येऊ शकत नाही असे त्यांना वाटले. आम्ही त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांनी घटना समितीत यायला नकार दिला. लीगला पाठिंबा देणार्यांचे म्हणणे होते की, आम्ही जर घटना समितीत आलो, तर हिंदूंच्या बहुमताची आम्हाला भीती वाटते. अशा परिस्थितीत व्हाईसरॉय काय करू शकतात? काहीही झाले तरी आम्हाला जून १९४८ पूर्वी जायचंच आहे असे त्यांचे म्हणणे आहे. माझे त्यांच्याशी बोलणे झाले, त्यावरून मी तुम्हाला सांगू इच्छितो की, व्हाईसरॉयचा यात कोणताही हात नाही. विचार विनिमयात सामील असलेल्या नेत्यांनी हा निर्णय घेतला आहे. यांचे म्हणणे आहे की, सात वर्षे आम्ही देश अविभाजित राहावा असा आग्रह धरला. कॅबिनेट मिशनने सुद्धा विचारपूर्वक निर्णय दिला. परंतु लीग तिच्या आश्वासनावरून परत फिरली आणि यामुळे हा मार्ग पत्करावा लागला... व्हॉइसरायचे म्हणणे आहे की, फाळणी व्हावी असे त्यांना कधीही वाटले नव्हते. काँग्रेसतर्फे जवाहरलालचे म्हणणे आहे की, त्यांचीही फाळणीला मान्यता नव्हती; परंतु त्या सर्वांना भीतीमुळे नाही, तर परिस्थितीमुळे फाळणी मान्य करणे भाग पडले.

- **शिखांनी मारल्याशिवाय मरणे शिकायला पाहिजे. म. गांधीजी**

आपल्या याच प्रवचनात म. गांधीजी पुढे म्हणाले,

...आज मला भेटण्याकरता मास्टर तारासिंग आले होते. मी त्यांना सांगितले की, तुम्ही एकांडे शिलेदार राहू नका, तर सव्वा लाखाच्या बरोबरीचे व्हा. शिखांनी मारल्याशिवाय मरणे शिकायला पाहिजे आणि असे झाले, तर पंजाबचा इतिहास पूर्णपणे बदलून जाईल आणि त्याचबरोबर हिंदुस्थानचा इतिहासही बदलेल. संख्येने कमी आहेत, परंतु ते शूर आहेत. खालसाचे राज्य संपूर्ण जगात पसरले.

- **परंतु माझे कोण ऐकतो? ... म. गांधीजींचे वैफल्य**

आपल्या वरील प्रवचनात पुढे ते असेही म्हणाले,

मी आधीच म्हणालो आहे की, तुम्ही अराजकाची फिकीर करू नका. अखेरीस मी जुगारी आहे. परंतु माझे कोण ऐकतो? तुम्ही माझे ऐकत नाही. मुसलमानांनी मला टाकून दिले आहे. काँग्रेसला मी माझा दृष्टिकोन पूर्णपणे पटवून सुद्धा देऊ शकत नाही.

**डॉ. गिरीश आफळे**

◈ ◈ ◈

**विचारधन**

आपण आनंदी, मोकळ्या वातावरणात राहिलो तर आपल्याला बरे वाटते. पण वातावरण जर कंटाळवाणे असेल तर मनावर मेंदूवर ओझे येते. मानवी शरीराला मेंदू नावाचा अब्जावधी पेशी असलेला अवयव मिळालेला आहे. पण त्याची पुरेशी जाणीव आपल्याला नसते. त्यामुळे मेंदूकडे आपण हवे तेवढे लक्ष देत नाही. आपला चेहरा, पेहराव यांची जेवढी काळजी घेतो, त्यापेक्षा मेंदूची अधिक काळजी घ्यायला हवी. त्यासाठी योग्य व समतोल आहार घेणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे ताणाला रामराम करणे गरजेचे आहे. आपण आनंदी, मोकळ्या वातावरणात राहिलो तर आपल्याला बरे वाटते. पण वातावरण जर कंटाळवाणे असेल तर मनावर, मेंदूवर ओझे येते. एखाद्याच्या सहवासात अर्धा तासही नकोसा वाटतो, कारण तो सहवास कंटाळवाणा असतो. ज्या ठिकाणी प्रेम नाही तिथे राहणे थांबणे नकोसे वाटते. बंदिस्त वातावरण असेल तर तिथून लगेच निघून जावे वाटते.

**मी कोणापेक्षाही चांगलं करेन**
**यापेक्षा**
**मी कोणाचेतरी चांगले करेन**
**हे वाक्य जास्त आनंद देतं.**

## ॥ श्रीनाथ म्हस्कोबा प्रसन्न ॥

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि; श्रीनाथनगर,

पाटेठाण, पो. राहू, ता. दौंड, जि. पुणे – ४१२२०७

कारखाना साईट : EXABX No. ९९२३००२९२४ / ८५५१८५८८९९

ईमेल : smskl@rediffmail.com, smskl@shreenathsugar.com

### कारखान्याची ठळक वैशिष्टे

- ✻ १० MW क्षमतेचा पॉवर प्लँट
- ✻ ४५०० TCD ऊस गाळप क्षमता
- ✻ ८० KLPD क्षमतेचा डिस्टीलरी व इथेनॉल प्लँट
- ✻ १० मे. टन प्र. दिन क्षमतेचा CNG प्रकल्प
- ✻ ३० टन प्र. क्षमतेचा $CO^2$ प्रकल्प
- ✻ शेतकरी बांधव व समाज सेवेसाठी कटिबद्ध
- ✻ ३ KLPD क्षमतेचा बायोमास पासून इथेनॉल निर्मिती (2G R & D) प्लँट

---

मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत
अध्यक्ष व कार्यकारी संचालक

मा. ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर
कार्याध्यक्ष

---

### संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. महेश संभाजीराव करपे | श्री. हेमंत संभाजीराव करंजे | श्री. योगेश दत्तात्रय ससाणे |
| श्री. अनिल जयवंतराव भुजबळ | श्री. किसन दिनकर शिंदे | श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम |
| श्री. अनिल लक्ष्मण बधे | श्री. प्रदिप दत्तात्रय लांडगे | श्री. माधव पांडुरंग राऊत |
| सौ. लता सतिष केंढे | श्री. हनुमंत बबन शिवले | श्री. भगवान दशरथ मेमाणे |

श्री. दत्ताराम मारूती रासकर (मुख्य कार्यकारी अधिकारी) व सर्व प्रवर्तक मंडळ

---

### – मुख्य कार्यालय –

मेघदुत बिल्डींग, २ रा मजला, स. नं. १२/२, भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला, जुना लोखंडी पूल रस्ता
आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे २८

**EPABX : 8551868899, 9923002924; Super Fax No. 011-43850261**

**Email : smsklho@rediffmail.com; smsklho@shreenathsugar.com**

# चौथी मिती (Fourth Dimension)
# लेखांक - १०

### कल्पतरूच्या राज्यात

मी नुकताच कॉलेज जीवनात सामील झालो त्यावेळची गोष्ट आहे. आमच्या मोठ्या बंधूंना मराठीबरोबरच इंग्रजी पुस्तक वाचनाचे वेड होते. त्यांनी सांगितलेले प्रत्येक पुस्तक हे अद्वितीय दर्जाचे असे हे मला बऱ्याच वर्षांनंतर उमगले. कारण तोपर्यंत मी त्या शिफारशी फारशा मनावर घेतल्या नव्हत्या. पण पुढे गूढांचे आकर्षण जसे वाढले तसतसे मी सर्वसमावेशक वाचक झालो. त्यावेळी भावाने सांगितलेले एक पुस्तक म्हणजे जेम्स हिल्टन या लेखकाचे The lost horizon वाचले आणि एका वेगळ्या विश्वात बुडून गेलो. यातील कथेत मोजक्या लोकांना घेऊन जाणारे एक छोटेखानी विमान भरकटते व अज्ञात निर्जन प्रदेशात उतरते. 'कुठे आलो' हे विचारण्यासाठी ते प्रवासी पायलटच्या केबिनमधे जातात तेंव्हा धक्का बसतो. पायलट मृतावस्थेत आढळतो. सर्व जण तेथून दरमजल करत जात राहतात व एका चमत्कारी प्रदेशात पोचतात. तेथील अनुभव गुंग करतात. तुम्ही स्वतः पुस्तक वाचा. असो.

पृथ्वीवर काही रहस्यमय जागा आहेत की जिथे आपल्याला ज्ञात असलेल्या वैज्ञानिक नियमांवर तो भोवताल चालत नाही. आपले विज्ञान थिटे पडते. तुम्ही म्हणाल की असे कसे शक्य आहे? पण विचार करा. विश्वाचा विस्तार किती प्रचंड आहे ते अजून शोधता आलेले नाही. अब्जावधी ब्रह्मांडे व तारे आहेत. त्यांच्या तुलनेत पृथ्वी रव्याच्या कणाएवढा ठरेल. प्रत्येक विश्वात परत लघुविश्वे सामावलेली असतात. मागे म्हटल्याप्रमाणे काळ हा जीवसापेक्ष आहे. मुंगीला दोन दिवस १०० वर्षांसारखे भासते. त्यांच्या विश्वाचा आकार आपल्याला टीचभर वाटेल पण त्यांच्यासाठी तो प्रचंडच असतो. जीव जेवढा प्रगत तर त्याचे विश्वही मोठे व शक्तीसामर्थ्यही अविश्वसनीय होत जाते. ही उतरंड व चढण खरोखरच विस्मयकारक आहे. मग याच पृथ्वीवर असे दुसरे प्रगत विश्व व सामर्थ्यशाली जीव का असणार नाहीत जे स्वतःपुरते वेगळ्या प्रभावाचा प्रदेश निर्माण करू शकतील?

गेली अनेक वर्षे चीन, रशिया व जगातील अजून काही देशांनी कैलास पर्वताचा वेध घेण्याचा प्रयत्न केला पण त्या मोहिमेत येणाऱ्या चमत्कारिक अडचणींनी हाती काही लागलेले नाही. फक्त अपयश व अनाकलनीय मृत्यू! या विशिष्ट विश्वाबद्दल फक्त अज्ञात महान तपस्वीच जाणतात. तिबेट, हिमालय तसेच पृथ्वीवर अन्य काही ठिकाणी या जागा अस्तित्वात आहेत. यापैकी हिमालयात हा प्रदेश 'शांग्रीला घाटी' म्हणून ओळखला जातो. वरील विज्ञानवाद्यांनी जंग जंग पछाडूनही त्या जागांचा शोध त्यांना लागलेला नाही.

त्याचे कारण त्यांचे अस्तित्व वेगळ्या मितीत (Dimension) आहे. मनाप्रमाणे सूक्ष्म किंवा प्रचंड आकार घेऊन त्यात जाता येते पण त्याचा दरवाजा बंद आहे. कारण विशिष्ट आध्यात्मिक पातळीवर गेल्यावाचून आपल्यासारख्यांना तिथे प्रवेश आपोआप नाकारला जातो. या प्रदेशात तुम्ही इच्छिता ते तत्काळ मिळू शकते व मिळवता येते. म्हणून त्याला 'कल्पतरूचे राज्य' असे मी संबोधले आहे. उच्च कोटीचे तिबेटी भिक्खू, तपस्वी व साधक यांनी तिथे संचार केलेला आहे व अद्यापही करत असतात. पूर्वपुण्याईने काही सामान्य पण भाग्यवान जीवांना तेथील अद्भुततेची चुणूक पाहण्यास मिळाली आहे. त्या प्रदेशात गेल्यावर मन, प्राण व शक्ती यांच्यात अद्भुत व अकल्पित वाढ होते. एवढेच नव्हे तर काळ रोखला जातो. रोखता येतो. उच्च कोटीच्या साधकांच्या सांगण्यानुसार अरुणाचल प्रदेश आणि तिबेट दरम्यान हा प्रदेश आहे. काही जण म्हणतात त्यानुसार तुम्ही तिथे आत जाऊ शकता पण (अभिमन्यूप्रमाणे) परतीचा रस्ता बंद होतो कारण चौथ्या मितीतील प्रदेशातून आपल्या त्रिमितीत शिरण्याचा दरवाजा बंद होतो. हिमालय हा पूर्णत: आध्यात्मिक, गूढ व पावित्र्याच्या आवरणात आहे. पौराणिक तपशील पाहता या प्रदेशाला सिद्धाश्रम म्हणून ओळखले जाते. तो भाग पृथ्वीचा आध्यात्मिक केंद्रबिंदू आहे असे म्हणतात. शांग्रीला घाटी कैलास पर्वतराजीत आहे असेही साधक सांगतात. अतिदूरच्या अंतरिक्षात जाण्याचा मार्ग तेथून आहे. चौथ्या मितीत गेल्यावर प्रकाशाच्या

वेगाने प्रवास करता येतो. अणूंचे हवे तसे एकत्रीकरण करून इच्छित वस्तू तत्काळ प्राप्त होऊ शकते. तिबेटी योग्यांच्या 'कालविज्ञान' ग्रंथात ह्या प्रदेशाचा उल्लेख आहे. त्यात म्हटल्यानुसार या प्रदेशात चंद्र-सूर्य दिसत नाहीत तर केवळ एक गूढ रहस्यमय प्रकाश सर्वत्र व्यापून असतो.

'चौथी मितीच्या' दहा लेखांच्या मालिकेत काळाची कल्पना व सलगता, युगे, कालमापन, भविष्याचा मागोवा अशा गोष्टींचा वेध घेतला. यातीलच काही नियमांच्या व गृहीतकांच्या आधारे आता भूतकाळाचा मागोवा घेण्यासाठी आपल्याकडे लिहिली गेलेली पुराणे महत्वपूर्ण दुवा आहे. ती पुराणे वाचून कळते की हा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने लिहिलेला अब्जावधी वर्षांचा इतिहास आहे. हेकट व हिंदूद्वेषी पुरोगामींनी चालवलेल्या पुराणे म्हणजे भाकड काल्पनिक कथा या अपप्रचाराला बळी पडू नये यास्तव या विषयाचा सविस्तर धांडोळा घेणारा पुराणातील इतिहास आणि इतिहासातील पुराण ही नवी लेखमाला पुढील महिन्यापासून सुरू करणार आहे. ती वाचून आपल्याला पुराणांचे नव्याने आकलन होईल. सद्य चौथी मिती मालिका आपणास आवडली असेल अशी आशा करतो. तर नव्या मालिकेसह पुन्हा भेटू.

**हणमंत नाडगौडा**

◈ ◈ ◈




## अंमली पदार्थांचे विक्रीसाठी आळा घालणेसाठी पोलीसांनी स्टिंग ऑपरेशन राबवावे!

दि. १८ डिसेंबर २०२४ नववर्षाच्या स्वागतोत्सवात अंमली पदार्थांवर आळा घालावा व अंमली पदार्थांचे विक्रीला आळा घालणेसाठी पोलीसांनी स्टिंग ऑपरेशन राबवावे असे आवाहन ज्येष्ठ विधिज्ञ आणि विहिंप विधी प्रकोष्ठाचे वतीने, प. म. प्रांताचे प्रांत सहमंत्री **अॅड. सतिश गोरडे** यांनी मंगळवार, दि. १७ डिसेंबर २०२४ रोजी पोलीस आयुक्त, पुणे व पिंपरी चिंचवड यांना केले.


शिक्षणाचे माहेरघर असा लौकिक असलेल्या पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील अल्पवयीन तरुण-तरुणींना अगदी सहजपणे अंमली पदार्थ उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर येत्या २०२५ या नववर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने महाविद्यालयातील तरुण आणि तरुणी कुतूहल अन् आकर्षणापोटी अंमली पदार्थांच्या वाट्याला जातात. ही बाब हेरून तरुण पिढीला अंमली पदार्थ सहज उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न म्हणून अंमली पदार्थांची निर्मिती, विक्री आणि वाहतूक करणाऱ्या ड्रग्ज पेडलर (Drugs Paddler) इसमांद्वारे होण्याची दाट शक्यता आहे. यावर आळा घालण्यासाठी पुणे पोलीस प्रशासनाने स्टिंग ऑपरेशन (Sting Operation) राबवावे अशी विनंती पोलीस आयुक्त, पुणे कार्यालयाला मंगळवार, दि. १७ डिसेंबर २०२४ रोजी लेखी पत्राद्वारे करण्यात आली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील बालेवाडी हाई स्ट्रीट, कोरेगाव पार्क, पुणे स्टेशन, इराणी वस्ती, शिवाजीनगर स्टेशन, डॉ. डी. वाय. पाटील आणि एम. आय. टी. महाविद्यालयांचे परिसर, अप्पर सुपर इंदिरानगर मस्जिद, सॅलिसबेरी पार्क ही अंमली पदार्थ संवेदनशील ठिकाणे आहेत, असेही या पत्रात नमूद करण्यात आले आहे. दि. २५ डिसेंबर ते १ जानेवारी या कालावधीत शोध मोहीम राबवून या संदर्भातील दोषी व्यक्तींवर कारवाई करावी, असे विनंतीवजा आवाहन करण्यात आले असून या पत्राच्या प्रती नागपूर हिवाळी अधिवेशन २०२४ मुख्यमंत्री कार्यालय नागपूर, महाराष्ट्र राज्य गृहमंत्री कार्यालय-मुंबई, पोलीस महासंचालक कार्यालय-मुंबई, एन सी बी ऑफिस- मुंबई येथे पाठविण्यात आल्या आहेत.

अॅड. सतिश गोरडे यांनी याबाबत अधिक माहिती देताना, भारतीय संविधानातील कलम ४७-अ मध्ये अंमली पदार्थांच्या विक्री आणि वाहतुकीवरील निर्बंधांविषयी तरतुदींनुसार राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा ऊहापोह करण्यात आला आहे, असे सांगून विहिंपतील विधी प्रकोष्ठ याविषयी सामाजिक जाणिवेतून जागरूकता निर्माण करीत आहे, असेही सांगितले. सदरहू लेखी पत्रावर अॅड. सतिश गोरडे यांच्यासह विधी प्रकोष्ट संयोजक अॅड शैलेश भावसार, सह संयोजक अॅड. सोहम यादव, अॅड. संकेत राव, अॅड कृष्णा वाघमारे, अॅड. आशिष गोरडे, अॅड. सुशांत गोरडे, अॅड. महेश सोनवणे, अॅड. सौरभ साठे, अॅड. प्रसाद पवार, अॅड. ऋतुजा रणपिसे, अॅड. चित्रा मराठे आणि अॅड. आदित्य कोळपकर यांनी स्वाक्षरी केली आहे.

# वाचनशिल्प

## हा अपमान त्यांच्या जिव्हारी लागला

एकदा असे झाले की, श्रीदासगणूमहाराजांचे चुलतबंधू (जनार्दनपंतांचे चिरंजीव) श्री बाबूराव यांच्या विवाहप्रसंगी वधूपक्षाकडील भोजनसमारंभास वरपक्षाची मंडळी जमली होती. श्रीदासगणूंची स्थिती बेताची. ते एक जुना मळकट मुकटा नेसून भोजनास गेले. आणि साधारण लोकांच्या पंक्तीत जाऊन बसले. त्या वेळी एकाने म्हटले, तुम्ही वर जा. व्याहीमंडळींची विशेष व्यवस्था माडीवर केली आहे. त्याप्रमाणे श्रीदासगणू मांडीवरील पंक्तीत आले. खाशा स्वाऱ्या अद्यापि आल्या नव्हत्या. नवरदेवाचे आणि त्याच्या बंधूचे अशी पहिली दोन पाने सोडून तिसरे पान त्यांनी धरले. सख्या चुलतभावाच्या मानाची जागा निश्चितपणे तीच होती.



तेथील व्यवस्थापकाने श्रीदासगणू कोण ते ओळखले नाही. साधा जुनवट मुकटा पाहून हा कोण आगांतुक ब्राह्मण असला पाहिजे, असे तो समजला आणि रागाने म्हणाला, ही व्याह्यांची पंगत आहे. भटभिक्षुकाची पाने खाली मांडली आहेत, आपली योग्यता काय, कुठे बसावे हे सुद्धा कळण्याची अक्कल नाही? माणूसच आहात ना? उठा. खाली व्हा. इतकेच म्हणून न थांबता त्या उतावळ्या गृहस्थाने हात धरून त्यांना ओढले, श्रीदासगणूंचा स्वभाव अत्यंत मानी नी तापट हा अपमान त्यांच्या जिव्हारी लागला. ते तेथून निघाले ते थेट पुंडलिकाच्या विठ्ठलमंदिरात आले आणि देवाच्या पायावर हात ठेवून सदगदित स्वरात म्हणाले – विठोबा, आजपासून कोणाच्या लग्नमुंजीला जाईन तर तूझ्या पायाची शपथ.

मागाहून श्रीदासगणू हे जावयाचे बंधू असे कळल्यावर वधूपक्षातील प्रमुख गृहस्थांनी व्याह्यांची नाना प्रकारे क्षमा मागितली. घरच्या मंडळींनीहि पुष्कळ समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ! श्रीदासगणूंचा निश्चय ढळला नाही. ते शांत होऊन म्हणाले, मला राग आला होता, पण आता तो गेला आहे. त्या भरात केलेली शपथ मात्र मला मोडता येत नाही. माझ्या पांडुरंगाची ती शपथ आहे. ही शपथ श्रीदासगणू महाराज शेवट पर्यंत अत्यंत कसोशीने पाळीत आले. त्यांच्या स्वतःच्या मुलीचेही लग्न दुसऱ्यांनीच लावले. माझ्या लग्नाच्या वेळीही श्री. ती. दादा (श्री दासगणू महाराज) पंढरपूरास दत्तघाटावरील दत्ताच्या देवळात जाऊन राहिले होते. धान्य भाजीसुद्धा त्यांनी स्वतंत्रपणे बाजारातून आणून शिजविली. लग्नाच्या कोठीतील कशासहि त्यांनी स्पर्श केला नाही.

गोरोबाकाकांच्या चरित्रामध्ये शपथेसाठी हात तोडून घेतल्याची कथा आहे. श्रीदासगणूंचा निश्चय आणि पांडुरंगावरील निष्ठा ही त्या जातीतीलच होती, यात शंका नाही.

संदर्भ ग्रंथ – संतकवि श्रीदासगणू महाराज चरित्र आणि काव्यविवेचन

स्वामी वरदानंद भारती

संग्रहातून –

श्रीगुरूपदाश्रित

**सतीश निरंतर**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषद व हिंदुबोधच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा**

**डॉ. गायत्री सतिश गोरडे, नेत्रतज्ञ (MBBS, M S (Ophthamology) Fellowship in CORNEA)**


# कृष्णायन भाग १७
# श्रीकृष्ण - सुदामा भेट

परीक्षिताला शुकदेव श्रीकृष्ण, बलरामाच्या पराक्रमाच्या कथा ज्याप्रमाणे सांगतात. त्याप्रमाणे इतर कथाही सांगतात. ते परीक्षिताला कृष्ण सुदामाच्या मैत्रीची कथा सांगू लागले. सुदामा नावाचा महाज्ञानी, जितेंद्रिय, निष्कांचन व परमपवित्र ब्राह्मण हा श्रीकृष्णाचा परममित्र होता. सुदामा अतिशय गरीब होता. त्याची पत्नी ही साध्वी स्त्री होती. सुदामा, बलराम, श्रीकृष्ण हे गुरु सांदिपनी यांच्या आश्रमात एकत्र शिकून बाहेर पडले होते. सुदामा आपल्या ज्ञानाचा उपयोग भोगासाठी नव्हे तर भगवंतासाठी करत असे. त्याची पत्नी सुशीला ही महान प्रतिव्रता होती. नेसण्याला वस्त्र नाही खायला अन्न नाही तरीही आनंदाने त्याच्याबरोबर संसार करीत होती. सुशीला सुदाम्याच्या मुखातून हरिकथा ऐकत असे. कित्येक वेळा त्यांच्या मुलांना खाण्यालाही काही मिळत नसे. तिला मुलांची होणारी उपासमार बघवे ना. एके दिवशी व्याकुळ होऊन ती सुदाम्याला म्हणाली, आपला मित्र हा प्रत्यक्ष लक्ष्मीपती यादव श्रेष्ठ श्रीकृष्ण आहे. आपण कथेत नेहमी सांगत असता, तो ब्राह्मणांविषयी अत्यंत कनवाळू आहे. त्याचे त्याच्या मित्रांवर अपार प्रेम आहे. श्रीकृष्ण सध्या द्वारकेत राहतो. मग त्याला भेटून आपण आपले दुःख दूर का करू नये?

सुदामा म्हणाला आपण आहोत दरिद्री! मी तेथे गेलो तर लोक म्हणतील हा ब्राह्मण भिक्षा मागण्यास आला आहे. माझा तर निश्चय आहे मी देवा जवळ काहीही मागायला जाणार नाही. त्यावर सुशीला म्हणाली, देव तर सर्वच जाणत असतो. ते न सांगता सर्व समजून घेतील. तुम्ही फक्त त्यांचे दर्शन करून या. सुदामा म्हणाला, मला तर त्याचे रोजच दर्शन होत असते. त्यावर त्याची पत्नी त्याला श्रीकृष्णाला भेटण्याचा आग्रह करू लागली. श्रीकृष्ण परमात्मा आहेत. त्यांचे द्वार सर्वांसाठी सर्वकाळ खुले असते. तेथे जाण्यास संकोच कशाला?

सुदामा पत्नीच्या सांगण्यावरून द्वारकेस जाण्यास निघाला. तो म्हणाला, मित्राला भेटायला जाताना रिक्त हाताने कसे जावे? घरात काहीच नव्हते म्हणून सुशीलाने शेजारून दोन मुठी पोहे मागून आणले. घरात पोह्याचा एकही दाणा न ठेवता ते सर्व पोहे एका फाटक्या कपड्यात बांधून ती पुरचुंडी तिने आपल्या पती जवळ दिली. त्याला म्हणाली, अशा प्रकारची भेट देताना तुम्हाला संकोच वाटत असेल तर त्यांना सांगा हे तुमच्या वहिनीने पाठवले आहेत. आपल्या पत्नीच्या आग्रहास्तव व कृष्णाच्या दर्शनाच्या ओढीने तो द्वारकेच्या दिशेने चालू लागला. नेसलेले फाटके धोतर हातात काठी अंगावर फाटके मलीन जीर्ण कपडे व बगलेत पोह्याची पुरचुंडी.

असे सांगतात सुदामा त्यावेळी पोरबंदरला रहात होता. तो पौष शुक्ल सप्तमीला द्वारकेला पोहोचला. अतिशय थंडीने त्याचे शरीर कापत होते. त्याच सात दिवसाचा उपाशी अशक्त सुदामा दोन मैल चालण्याने थकून गेला. त्याला वाटू लागले आपल्या



प्रिय मित्राचे श्रीकृष्णाचे दर्शन होईल का नाही? अशक्तपणा व काळजीने त्याला मृच्छा येत होती. तिकडे कृष्णाला कळले सुदामा येत आहे. त्याने गरुडा तर्फे सुदामाला आकाश मार्गे द्वारकेत पोहोचवले. सुदाम्याला प्रथम काही कळलेच नाही. त्यांनी लोकांना विचारले त्यावेळी त्याला समजले की तो द्वारकेत येऊन पोहोचला त्यामुळे द्वारका फार दूर आहे असे त्याला वाटलेच नाही. सुदामा भगवंताचे स्मरण करीत कृष्णाच्या महालाशी येऊन पोहोचला. भिकारी समजून त्याला अडवीत द्वारापाल म्हणू लागले, तू आत जाऊ शकत नाहीस.

सुदामा म्हणाला, मला द्वारकाधीश यांना भेटायचे आहे ते माझे मित्र आहेत. मी त्यांच्याकडे काही मागायला आलो नाही आहे तर त्यांचे दर्शन घेण्यास आलो आहे. तुम्ही श्रीकृष्णाला सांगा तुमचा मित्र सुदामा तुम्हाला भेटण्यास आला आहे.

खरंतर प्रभूच्या दर्शनासाठी कुणालाही मज्जाव नसतो. द्वारपालाने आत जाऊन श्रीकृष्णाला सांगितले, द्वारावर एक भिकाऱ्यासारखा दिसणारा दुर्बल माणूस आला आहे. त्याचे डोळे खोल गेले आहेत. सर्व हाडे दिसत आहेत. पण चेहऱ्यावर तेज मात्र नाही. तो म्हणतो की तो तुमचा मित्र सुदामा आहे.

सुदामा हे शब्द ऐकले मात्र श्रीकृष्ण दाराकडे धावत गेला. सुदाम्याच्या मनात आले आजवर त्याला आपल्या ज्ञानाचा, तपाचा कुणाच्याही दारात न जाण्याचा अभिमान होता. तो क्षणात दूर झाला. त्याच्या पत्नीने तो दूर केला. सुदामाचे कपडे मळके होते, पण हृदय अत्यंत स्वच्छ व पवित्र होते. सुदाम्याला हाक मारत कृष्णद्वारावर येऊन पोहोचला. त्याला हृदयाशी कवटाळले व कडकडून आलिंगन दिले. आपल्या मित्राची ही दुर्दशा बघून त्याला अत्यंत दुःख झाले. आत्तापर्यंत त्याचे विस्मरण झाल्याचे त्याला दुःख झाले. तो म्हणाला, मित्रा! चांगले झाले तू मला भेटावयास आलास. सुदाम्याला कळून चुकले की वैभव प्राप्त होऊनही कृष्ण त्याला विसरलेला नाही.

श्रीकृष्णाने त्याला मंचकावर बसवले, त्याचे पाय धुतले, सुदामाच्या पायात जोडे नव्हते त्यामुळे त्याच्या पायात बरेच काटे रुटले होते. तो ते काढू लागला. रुक्मिणी त्याला चवरीने वारा घालू लागली. आपण परमात्मा आहोत हेच तो विसरून गेला. सुदाम्याचे स्नान झाल्यावर श्रीकृष्णाने त्याला पितांबर नेसण्यास दिले. सुग्रास जेवण झाले मग श्रीकृष्णाने सुदाम्यास मंचकावर झोपवले व तो त्याचे पाय दाबू लागला. मग ते गुरुगृहीच्या आठवणी काढू लागले. कृष्णाने त्याची चौकशी केली. सुदाम्याने सर्व माहिती सांगितली, मात्र स्वतःच्या गरिबी बद्दल काहीच सांगितले नाही. श्रीकृष्ण त्याला म्हणाला मग आमच्या वहिनीने आम्हाला काहीतरी पाठवले असेलच की! सुदाम्याने पोह्याची पुरचुंडी संकोचाने श्रीकृष्णाला दिली.

लौकिक दृष्ट्या ती मूठभर पोह्यांची पुरचुंडी होती. पण त्यात त्याचे सर्वस्व होते. आपले दारिद्र्य लपवून पोह्यांच्या रूपाने आणलेली भक्ती, मित्र प्रेम होते. सुशीलाने मुलांना त्यातला एकही कण नेता पाठवलेली प्रीती आदरपूर्वक भक्ती होती. श्रीकृष्णाने हे सर्व जाणले. त्यातले मूठभर पोहे कृष्णा ने खाल्ले. दुसरी मूठ खाऊ लागणार तोच रुक्मिणीने त्याचा हात धरला. ती म्हणाली, हे परमात्म्या! पोह्याची एक मूठ या ब्राह्मणाला सर्व वैभव देण्यास पुरेशी आहे.

श्रीकृष्ण म्हणाला, तू आणलेली भेट मला परमप्रिय अशी आहे. गोकुळात माझी आई याप्रमाणे मला पोहे खाऊ घालत असे. हे पोहे मला तृप्त करतील.

दुसऱ्या दिवशी उजाडल्यावर सुदामा घरी जाण्यास निघाला. निरपेक्ष व पवित्र असा सुदामा आपले जुने धोतर नेसून घरी जाण्यास निघाला. श्रीकृष्णाने त्याला आलिंगन देऊन निरोप दिला. दोघांच्याही डोळ्यात अश्रू जमा झाले होते.

सुदामा परतताना विचार करू लागला या वैभव सिद्ध असणाऱ्या श्रीकृष्णाने मला थोडेही द्रव्य दिले नाही. त्याला वाटले असेल की हा ब्राह्मण दारिद्री असल्यामुळे याला द्रव्य मिळाले तर हा मत्त होईल. माझे स्मरण करणार नाही.


सुदामपुरी ला पोहोचल्यावर सुदामा आपली झोपडी शोधू लागला. तिथे त्याला नामनिशाणही नव्हते. मोठा वाडा उभा राहिला होता. सुदामा आल्याची वार्ता सुशीलेच्या कानावर आली. ती धावतच बाहेर आली. पतीचे स्वागत करत ती म्हणाली,आपल्या मित्राच्या कृपेनेच हे सारे घडले आहे. तो मनोमन म्हणाला– मला धनाची अपेक्षा नाही. माझी तर एकच इच्छा आहे मला जन्मोजन्मी कृष्ण भक्ती करण्याची संधी मिळो.!

सुदाम्याच्या या गोष्टीतील सार म्हणजे परमात्मा जीवमात्राचा निस्वार्थी मित्र आहे. जर मैत्री करायची झाली तर परमेश्वराशी करावी. ही सख्य मैत्रीच खरी मैत्री आहे. सुदाम्याने त्या ईश्वराजवळ निरपेक्ष प्रेम केले म्हणून परमेश्वराने त्याला वैभव शाली केले. भक्ताला देव प्रत्यक्ष देत नाही अपरोक्ष देतो.

**उल्का खळदकर**

◈ ◈ ◈

# स्मरण क्रांतिवीरांचे



**सरस्वती राजमणी**

**(जन्म : ११जानेवारी १९२७ – मृत्यू : १३जानेवारी २०१८)**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे उलटून गेली आहेत. आजच्या पिढीला स्वतंत्र भारताचा अभिमान आहे. पण केवळ स्वातंत्र्यदिन किंवा प्रजासत्ताक दिनाच्या प्रसंगीच लोकांना या देशाच्या हुतात्म्यांची आठवण येते. ज्यांनी या देशासाठी सर्वस्व अर्पण केले त्या सर्वच शूर क्रांतिवीरांची आपल्याला माहिती नसते. त्यामुळेच पहिली भारतीय महिला गुप्तहेर म्हणून ओळख असलेल्या सरस्वती राजमणी यांचेही नाव अज्ञात क्रांतिकारकांच्या यादीत गेले आहे. जीव धोक्यात घालून इंग्रजांच्या अनेक गुप्त वार्ता नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यापर्यंत पोचवणाऱ्या देशाच्या पहिल्या महिला गुप्तहेर सरस्वती राजमणी यांची ही रोमांचकारी कहाणी.

सरस्वती राजमणी यांचा जन्म ११ जानेवारी १९२७ या दिवशीरंगून, बर्मा (सध्याचे म्यानमार) येथे तमिळ भाषिक भारतीय कुटुंबात झाला. तिच्या वडिलांकडे सोन्याची खाण होती. ते रंगूनमधील सर्वात श्रीमंत भारतीयांपैकी एक होते. त्यांचे कुटुंब भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे कट्टर समर्थक होते. त्यासाठी ते मोठ्या प्रमाणावर आर्थिक साह्य करत होते. सरस्वती दहा वर्षाची असताना महात्मा गांधी त्यांच्या घरी आले होते. तेव्हा ती लहान मुलगी बंदूक घेऊन शूटिंगचा सराव करत होती. सरस्वतीचा तो सराव पाहून गांधींना आश्चर्य वाटले. अहिंसेचा धडा शिकवणाऱ्या गांधींनी राजमणीचा शूटिंगचा सराव पाहिल्यावर त्यांनी तिला हा मार्ग सोडण्यास सांगितले. हिंसेने कुणालाही फायदा होत नाही, असं तिला सांगितले. त्यावर दहा वर्षांच्या सरस्वती हिने त्यांना उत्तर दिले की, घरावर दरोडा टाकण्यासाठी आलेल्या दरोडेखोरांना मारले जाते. इंग्रज हे सुद्धा आपल्या देशात दरोडेखोर म्हणून आले आहेत. त्यांना शूट करणे आवश्यक आहे. सरस्वतीची प्रतिक्रिया ऐकून महात्मा गांधी अवाक झाले.

हा तो काळ होता जेव्हा नेताजी सुभाषचंद्र बोस आझाद हिंद फौजेच्या उभारणीत सक्रिय होते. नेताजी सुभाषचंद्र बोस भारतीय स्वातंत्र्य परिषदेत सहभागी होण्यासाठी रंगूनला आले होते. त्यावेळी झालेल्या सभेमध्ये नेताजींनी लोकांना स्वातंत्र्य लढ्यासाठी आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले. त्या सभेला १६ वर्षांची सरस्वती देखील उपस्थित होती. ती नेताजींच्या भाषणाने इतकी प्रभावित झाली की, तिने आपल्या अंगावरील सर्व दागिने काढून दान केले. जेव्हा नेताजींना माहिती मिळाली की एका मुलीने आपले सर्व दागिने येथे दिले आहेत, तेव्हा नेताजी स्वतः ते दागिने घेऊन त्यांच्या घरी पोहोचले. नेताजींनी ते दागिने परत केले तेव्हा सरस्वतीने दागिने परत घेण्यास स्पष्ट नकार दिला. हे दागिने देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील माझे छोटेसे योगदान म्हणून मी स्वेच्छेने दिले आहेत, असे तिने सांगितले. त्या मुलीची जिद्द पाहून नेताजी खूप प्रभावित झाले. सरस्वतीचे देशाप्रती असलेले प्रेम आणि समर्पण भावना पाहून नेताजींना खूप आनंद झाला. नेताजींनी सरस्वती हिचा आझाद हिंद फौजेच्या गुप्तचर विभागात समावेश केला. सरस्वती राजमणी यांनी वयाच्या १६ व्या वर्षी भारतासाठी एक तरुण गुप्तहेर म्हणून स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाल्या. लहान वयातच त्यांनी मोठी जबाबदारी स्वीकारली. माहिती मिळवण्यासाठी सरस्वती या मुलाच्या वेशात इंग्रजांसाठी काम करत असत. त्यांच्यासोबत अन्य सदस्यही होते. इंग्रजांची गुप्त माहिती गोळा करून नेताजींकडे पाठवणे ही सरस्वती यांची जबाबदारी होती. आझाद हिंद फौजेबाबत इंग्रजांना कोणतीही माहिती कळू नये यासाठी कठोर नियम होते. एखाद्या

कामगिरीत इंग्रजांनी पकडल्यास तर शत्रूला कोणतीही माहिती मिळू नये, यासाठी गुप्तहेराने स्वतःला गोळी झाडून बलिदान द्यावे लागेल, असे या गुप्तहेरांना सांगण्यात आले होते. दुसऱ्या महायुद्धादरम्यान, इंग्रजांची गुप्त माहिती मिळवण्यासाठी सरस्वती यांना कलकत्ता येथील ब्रिटिश लष्करी तळावर कामगाराच्या वेषात गुप्तहेर म्हणून पाठवण्यात आले होते. तिथे काम करत असताना १९४३ मध्ये नेताजींच्या हत्येचा ब्रिटिशांचा कट उघड करण्यात सरस्वती यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. नेताजी जेव्हा भारतीय सीमांना गुप्त भेट देतील तेव्हा त्यांची हत्या करायची, इंग्रजांची योजना अशी होती.

सुमारे दोन वर्षे, सरस्वती आणि तिच्या काही महिला सहकाऱ्यांनी मुलांचा वेश धारण करून इंग्रजांच्या तळावर काम करून तेथील हालचालींची माहिती नेताजींपर्यंत पोचविण्याचे काम केले. यावेळी सरस्वती यांनी आपले नाव 'मणी' केले होते. एकदा त्यांच्या एका साथीदाराला ब्रिटिश सैनिकांनी पकडले. त्यावेळी स्वत:वर गोळी झाडून घेण्यासाठी तिच्याकडे पिस्तूल नव्हती. अशा स्थितीत इंग्रज आपल्यावर अत्याचार करतील आणि आझाद हिंद फौजच्या मिशनची माहिती मिळवतील, अशी सर्वांना धास्ती वाटत होती. यावेळी सरस्वती यांनी आपल्या साथीदाराला सोडवण्याचा निर्णय घेतला. त्यांनी नर्तिकेचा वेश धारण केला आणि इंग्रजांच्या छावणीत गेल्या. तेथे सैन्याच्या अधिकाऱ्यांच्या मद्यात अंमली पदार्थ मिसळून सर्वांना बेशुद्ध केले आणि आपल्या सहकाऱ्याची सुटका केली. तेथून पळून जात असताना मात्र, गेटवर असलेल्या एका सैनिकाने त्यांच्यावर गोळीबार केला. त्यातील एक गोळी सरस्वती यांच्या पायाला लागली. जखमी अवस्थेत त्या आपल्या साथिदारासह एका झाडावर बराच काळ लपून राहिल्या होत्या. इंग्रजांची शोध मोहीम संपल्यानंतर अतिशय कष्टाने त्या दोघी आपल्या कॅम्पपर्यंत पोचल्या. पायाला गोळी लागून बराच काळ गेल्याने सरस्वती यांचा पाय अधू झाला. त्यामुळे नंतर त्यांना लंगडत चालावं लागलं. त्यांच्या या शौर्याची दखल घेऊन नेताजींनी त्यांना आझाद हिंद फौजेच्या 'चीफ ऑफ स्टाफ' म्हणून नियुक्ती केली. ते काम ही त्या निष्ठापूर्वक करत राहिल्या. दरम्यान, दुसऱ्या महायुद्धानंतर, राजमणीच्या कुटुंबाने रंगून मधील सोन्याच्या खाणीसह त्यांची सर्व संपत्ती इतरांना दिली आणि ते भारतात परतले होते. सरस्वती यांची नेताजींवर त्यांची अपार श्रद्धा होती. त्यांच्यामुळेच सरस्वती यांना देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्यासाठी प्रेरित केले. आझाद हिंद फौजेची आणि भारताची पहिली महिला गुप्तहेर म्हणून महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सरस्वती राजमणी यांचे नंतरचे आयुष्य अज्ञातवासात गेले. खूप संघर्ष केल्यानंतर त्यांना स्वातंत्र्य सैनिकांचे पेन्शन मिळू लागले. जे त्यांनी नंतर त्सुनामी ग्रस्तांच्या मदत निधीसाठी दान केले. देशाच्या या धाडसी पहिल्या महिला गुप्तहेराने १३ जानेवारी २०१८ या दिवशी अखेरचा श्वास घेतला. सरस्वती राजमणी यांनी त्यांचे आत्मचरित्र लिहिले आहे. त्यांचे आत्मचरित्र 'हार नही मानुंगी' या नावाने हिंदीत प्रकाशित झाले आहे.

~ ~ ~



**विष्णू गणेश पिंगळे**

**(जन्म : २ जानेवारी १८८८ – फाशी : १६ नोव्हेंबर १९१५)**

ब्रिटिशांच्या विरोधात सशस्त्र बंड करण्यासाठीच्या गदर पार्टीच्या कटात क्रांतिकारक विष्णू गणेश पिंगळे सामील होते. गदर कटातील सक्रिय सहभागाबद्दल त्यांच्या विरोधात देशद्रोहाचा खटला दाखल करण्यात आला. या कटातील सहभागी क्रांतिकारकांवर लाहोर षडयंत्राचा खटला चालवण्यात आला. ब्रिटिश राजवट उलथून टाकण्याचा कट रचल्याचा आरोपाखाली त्यांना १६ नोव्हेंबर १९१५ या दिवशी लाहोर सेंट्रल जेलमध्ये त्यांना फाशी देण्यात आलं.

विष्णू गणेश पिंगळे यांचा जन्म २ जानेवारी १८८८ या दिवशी पुणे जिल्ह्यातील तळेगाव ढमढेरे गावातील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण कुटुंबात झाला.

नऊ भावंडांमध्ये ते सर्वात लहान होते. त्यांनी सुरुवातीचं शिक्षण पुण्यातील महाराष्ट्र विद्यालयातून घेतलं. महाराष्ट्र विद्यालयात शिकत असताना ते राष्ट्रीय चळवळीच्या प्रभावाखाली

आले. त्यांनी विनायक दामोदर सावरकरांच्या नेतृत्वाखालील चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. निधीच्या कमतरतेमुळे १९०८ मध्ये महाराष्ट्र विद्यालय बंद पडल्याने तेतळेगाव दाभाडे येथील समर्थ विद्यालयात जाऊ लागले.

त्या काळी देशात ब्रिटिशांच्या विरोधात असंतोष वाढत होता. राष्ट्रीय शिक्षण हे स्वातंत्र्यप्राप्तीचं एक साधन होतं. अशा शाळा ब्रिटीश सरकारला धोकादायक वाटत होत्या. त्यामुळं राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा बेकायदेशीर ठरवून १९१० मध्ये त्यांनी त्या बंद केल्या. त्यात समर्थ विद्यालयही बंद झाले. मात्र, स्वातंत्र्य चळवळीतील विष्णू यांनी घेतलेल्या सहभागाचा त्यांच्या मनावर कायमचा ठसा उमटवला होता. नंतर १९१० मध्ये ते मुंबईला रवाना झाले. शिक्षण घेत असतानाच माहीम येथील गोविंदराव पोतदार यांच्या अल्कली वर्क्स मध्ये नोकरीला लागले.

पोतदार हे राष्ट्रीय विचारांचे आणि स्फोटकांचे तज्ञ होते. त्यांनी विष्णू यांची त्यांच्या साथीदारांशी ओळख करून दिली. त्यापैकी एक वसईचे वकील हरी लक्ष्मण पाटील होते, ज्यांच्याशी विष्णू यांची घट्ट मैत्री झाली. स्वदेशी चळवळीनं जोर धरलेला असताना जपानी हातमाग उद्योगाने प्रेरित होऊन, विष्णू यांनी लातूरजवळील औसा येथे स्वतःचा स्वदेशी हातमागाचा व्यवसाय सुरू केला. मात्र, त्यांची यांची अभियंता होण्याची महत्त्वाकांक्षा होती.

अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या इतिहासाचा विष्णू यांच्यावर प्रभाव होता. उच्च शिक्षणासाठी म्हणून १९११ मध्ये विष्णू औसा सोडून अमेरिकेला गेले. भारत सोडण्यापूर्वी त्यांनी फक्त त्यांचे मोठे बंधू केशवराव यांना आपल्या योजना सांगितल्या.

हाँगकाँग मार्गे ते अमेरिकेत पोहोचले. १९१२ मध्ये वॉशिंग्टन विद्यापीठात मेकॅनिकल इंजिनीअरिंगसाठी प्रवेश घेतला. अमेरिकेत असताना विष्णू गदर पक्षाशी जोडले गेले. ते पक्षाचे सक्रिय सदस्य झाले. ते सत्येंद्र भूषण सेन, कर्तारसिंग सराभा आणि इतर गदर नेत्यांच्या संपर्कात आले. गदर पक्षाच्या सदस्यांसोबतच विष्णू इतर भारतीय क्रांतिकारकांच्या जवळ आले. गदरच्या सशस्त्र लढ्याच्या कटाचा एक भाग म्हणून, सत्येंद्र भूषण सेन, कर्तारसिंग सराभा, विष्णू आणि शीख क्रांतिकारकांची तुकडी ऑक्टोबर १९१४ मध्ये अमेरिकेतून भारताकडे रवाना झाली. भविष्यातील योजनांसाठी गदर चेतहलसिंग आणि अन्य नेत्यांना भेटण्यासाठी सत्येंद्र आणि विष्णू काही दिवस चीनमध्ये थांबले होते. नोव्हेंबर १९१४ मध्ये विष्णू हे गदरच्या इतर सहकाऱ्यांसह कलकत्ता येथे पोहोचले. त्यांनी जतीन मुखर्जी त्यांच्याशी दीर्घ चर्चा केली. नंतर जतीन यांनी गदरच्या योजनेवर चर्चा करण्यासाठी डिसेंबर १९१४ च्या तिसऱ्या आठवड्यात विष्णू यांना बनारस येथे रासबिहारी बोस यांच्या भेटीसाठी पाठवलं. विष्णू यांनी रासबिहारी बोस यांना गदर पक्षाचे सुमारे ४००० सदस्य कलकत्त्याला पोचल्याची माहिती दिली. नंतर विष्णू आणि सचिन सन्याल अमृतसरला रवाना झाले. शांघायहून आलेल्या मुलासिंग यांच्याशी सशस्त्र बंडाबाबत तपशीलावर चर्चा केली. विष्णू हे रासबिहारी यांचे अत्यंत विश्वासू सहकारी होते. रासबिहारी बोस, सचिन सन्याल आणि कर्तारसिंग सराभा यांच्यासमवेत विष्णू हे ही १९१५ मध्ये करायच्या गदरच्या सशस्त्र बंडाच्या मुख्य संयोजकांपैकी एक बनले. ते बंडाच्या प्रचारात गुंतले. मार्च १९१५ मध्ये त्यांनी मेरठ आणि अंबाला येथील लष्करी छावण्यांना भेट दिली. तेथील भारतीय सैनिकांना भारताच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटीशांच्या विरोधात उठाव करण्याचं आवाहन केलं. मात्र, २३ मार्च १९१५ ला फितुरीमुळं त्यांचा विश्वासघात झाला. विष्णू यांना त्यांच्या ताब्यात असलेल्या स्फोटकांसह ब्रिटिश पोलिसांनी अटक केली. विष्णू गणेश पिंगळे आणि कर्तारसिंग सराभा इतर गदर क्रांतिकारकांवर लाहोर षड्यंत्राचा खटला दाखल करण्यात आला. त्यांच्यावर सैन्यात असंतोष निर्माण करण्याचा, ब्रिटिश राजवट उलथून टाकण्याचा कट रचल्याचा आणि राजद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला. न्यायालय नेत्यांना दोषी ठरवून फाशीची शिक्षा सुनावली. अखेर विष्णू गणेश पिंगळे आणि त्यांचे सहकारी कर्तारसिंग सराभा या दोघांना १६ नोव्हेंबर १९१५ या दिवशी लाहोर सेंट्रल जेलमध्ये फाशी देण्यात आली.

**राजन वडके, ज्येष्ठ पत्रकार, प्रचार विभाग प्रमुख,**

**विद्या भारती, प. म. प्रांत.**

◈ ◈ ◈


Janaseva Sahakari Bank Ltd. Hadapsar, Pune
तुमच्या स्वप्नांचे पंख आणि प्रगतीतला सोबती!
जनसेवा बँक
ज्ञानगंगा शैक्षणिक कर्ज
भारतातील व परदेशातील सर्व प्रकारच्या उच्च शिक्षणासाठी रु. ५० लाखांपर्यंत कर्ज
मार्जिनः१० ते १५% प्रोसेसिंग फीःरु.१०००+GST
मुदतःMax.१४४ महिने (Including Moratorium Period)
जनसेवा सोलर कर्ज
रुफटॉप सोलर इलेक्ट्रिक, सोलर वॉटर हिटरसाठी (वैयक्तिक : रु. ५ लाख, व्यावसायिक रु. २५ लाख)
मार्जिन : १५% मुदत : ७२ महिने
प्रोसेसिंग फी : १ % जामीनदार : १
जनसेवा वैयक्तिक कर्ज
ग्रुप कर्जासाठी विशेष सवलत
वैयक्तिक अडीअडचणींसाठी रु. ५ लाखांपर्यंत कर्ज
शेअर्स : ५% मुदत : ६० महिने
प्रोसेसिंग फी : ० % जामीनदार : २
एमएसएमई / स्टार्टअप कर्ज
कॅश क्रेडीट, मुदत कर्ज व मशिनरी, औद्योगिक जागा खरेदी व बांधकामासाठी कर्ज
प्रोसेसिंग फीः१% शेअर्सः २.५%
मुदतः१२० महिने (Including Moratorium Period)
उद्योग वास्तू कर्ज
दुकान, ऑफिस, औद्योगिक शेड, जागा खरेदी अथवा बांधण्यासाठी कर्ज
मार्जिन : १५-२०% मुदत : १२० महिने
प्रोसेसिंग फी : १ % जामीनदार : १
कॅश क्रेडिट कर्ज
व्यवसायाच्या अखंड नियोजनासाठी खेळते भांडवल यासाठी कर्ज
मार्जिन : २५-४०% मुदत : १२ महिने
प्रोसेसिंग फी : ०.७५% जामीनदार : १
ज्ञानगंगा विनातारणी शैक्षणिक कर्ज
देशांतर्गत कॉलेज व नामांकित कोचिंग क्लासेस करिता रु. ५ लाखापर्यंत कर्ज उपलब्ध.
प्रोसेसिंग फी : ०% मार्जिन : १०%
मुदत : ४८ महिने जामीनदार : १
प्रोसेल्फ कर्ज
CA
प्रोफेशनल्सः डॉक्टर्स, डेंटीस्ट,सर्व्हेअर्स, वकील, CA, CS, ICWA, इंजिनिअर, आर्किटेक्ट सर्व्हिस प्रोव्हायडर्स
प्रोसेसिंग फीः१% शेअर्सः २.५% मार्जिनः२०%
मुदतः१२० महिने (Including Moratorium Period)
वाहन कर्ज
वैयक्तिक वापरासाठी कार व टु व्हिलर कर्ज
कारः रु.५० लाख व टु व्हिलरः रु.५ लाखांपर्यंत
प्रोसेसिंग फीः१% शेअर्सः २.५% मार्जिनः१०%
मुदतः६० म. जामीनदारः 2W: No, Car: 1 (Above 25L)
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर,पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.
व्हॉट्सअप नंबर : 89565 47595 www.janasevabankpune.net

वार्षिक वर्गणी रू. २००/- फक्त
Date of Publication : 26/12/2024 and
Date of Posting : 28/12/2024 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2024-2026
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध (मासिक)

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचणारे एकमेव मासिक म्हणजे **'हिंदुबोध'.**

- मासिक मुल्य रू. २०/- ● वार्षिक वर्गणी रू. २००/- ● त्रैवार्षिक वर्गणी रू. ५००/-

(पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.)

oooo

## ❊ हिंदुबोध जाहिरात दरपत्रक ❊

मासिक पाने ४४ (रंगीत पानांसह)

| | |
|---|---|
| रंगीत पूर्ण पान | रू. १.५ लाख |
| साधे पान | रू. १ लाख |
| साधे अर्धे पान | रू. ५०,०००/- |
| साधे १/४ पान | रू. २५,०००/- |
| साधे १/८ पान | रू. १२,०००/- |
| साधे १/१६ पान | रू. ६,०००/- |
| सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) | रू. २,१००/- |
| हिंदुबोध अंक मुल्य | रू. २०/- |
| वार्षिक वर्गणी | रू. २००/- |
| त्रैवार्षिक वर्गणी | रू. ५००/- |

## ❊ हिंदुबोधची वर्गणी ❊

जनता सहकारी बँक लि. शनिवार-नारायण पेठ शाखा, पुणे - ४११०३०.

**Account Name : Hindubodh**

A/C No : 015220100024473 IFSC Code : JSBP0000015

**HINDU BODH**

Scan QR Code below with your PSP App

Or Pay to VPA
hindubodh@jsb

**कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध**

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१

**Email : hindubodh.pmp@gmail.com**

**हिंदुबोध**

द्वारा : रविकांत कळंबकर, ९८२२२६१६६२
विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,
भारत भवन, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी : ०२०-२४४७१७०१